CMYK


# सोलापूर तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | सोमवार, ११ ऑगस्ट २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक २७३ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com


**विचारपुष्प**

शिस्त आणि आत्मनियंत्रणाशिवाय संघटन घडत नाही. संघशिस्त म्हणजे आत्मसंयम, त्याग आणि एकात्मता. केवळ शारीरिक शाखा पुरेशी नाही. विचारांची स्पष्टता आणि इतिहासाची समज आवश्यक आहे.

**- कृ. सूर्यनारायण राव**

**रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. सेवा प्रमुख**




**सोलापूर** – **भवानी पेठ** – राठी सिमेंट, **नई जींदगी** – एस.ए.बडेपीर, **वि.डी घरकुल** – वैष्णवी स्टील, **न्यु पाच्चा पेठ** – हारूण स्टील, **होटगी रोड** – एम.आर.सेल्स, **शेळगी** – शहा ट्रेडर्स, **सिध्देश्वर पेठ** – बेसकर अॅण्ड कंपनी, **कुर्डुवाडी** – श्री.गणेश स्टील, **सांगोला** – महालक्ष्मी स्टील सेंटर, **माढा** – तांबोळी स्टील अॅण्ड हार्डवेअर, **नातेपुते** – पोतेकर एंटरप्रायजेस, **पंढरपूर** – दुर्गा स्टील, **मांडवे** – बालाजी ट्रेडर्स, **टेभुंर्णी** – श्री साई ट्रेडर्स, **बार्शी** – भराडीया स्टील, **करमाळा** – शिवम स्टील, **अक्कलकोट** – माशाळे स्टील, **मोहोळ** – तलफदार स्टील, **कुरूल रोड** – श्री.भैरवनाथ स्टील ट्रेडर्स, **अकलुज** – चकेंश्वरा स्टील, **वैराग** – गांधी एजन्सी, **दहिटने** – एस. एस. मकंदर स्टील कॉर्पोरेशन, **मरवडे** – सह्याद्री ट्रेडर्स, **मोडलिंब** – शिवाई ट्रेडर्स, **मंगळवेढा** – महालक्ष्मी ट्रेडर्स, **बेगमपूर** – सिध्दनाथ ट्रेडर्स, **टाकळी** – गुरूकृपा ट्रेडर्स, **कंदलगाव** – श्री.केदारेश्वर हार्डवेअर अॅण्ड सिमेंट, **मुळेगाव** – आदित्य ट्रेडर्स, **महुद** – शेवाळे हार्डवेअर, **हुन्नूर** – लक्की ट्रेडर्स, **माळशिरस** – अभिनंदन टाईल्स्, **मैंदर्गी** – खलील ट्रेडर्स, **वसंत विहार** – पूजा स्टील, **श्रीपुर** – शक्ती स्टील अँड किसान मॉल, **कुरुल** – जगदंबा हार्डवेअर, **सोड्डी** – ओम ट्रेडर्स, **तडवळ** – स्वामी समर्थ ट्रेडर्स, **टाकळी सिकंदर** – लक्ष्मी टाईल्स, **नरखेड** – राहुल एंटरप्रायझेस, **जवळा**– आंद्रेश्वर स्टील सेंटर, **तांदुळवाडी**– साईराज ट्रेडींग कंपनी, **कोंडी**– तिरूपती बिल्डींग मटेरियल्स, **बाळे**– वर्धान ट्रेडर्स, **करकंब** – जगदंबा ट्रेडर्स, **वेळापूर**– सदगुरू ट्रेडर्स, **खर्डी** – भगवती स्टील.

**आयकॉन स्टील**

टीएमटी बार


# भारताला विकासापासून रोखण्यासाठी टॅरिफचा डाव

## राजनाथ सिंह यांचा घणाघात | आम्हीच सर्वांचे बॉस | प्रगतीला अडथळा आणणारे तोंडघशी पडणार

◆ **रायसेन, १० ऑगस्ट**

काही देश स्वतःला जगाचे बॉस समजतात परंतु त्यांना माहित नाही की भारत सर्वांचा बॉस आहे. भारताला विकासापासून रोखण्यासाठी व्यापार शुल्क अर्थात् टॅरिफचा डाव आखण्यात आला. कितीही प्रयत्न केले तरी भारताला महाशक्ती होण्यापासून कोणीही रोखू शकत नाही. आमच्या प्रगतीला अडथळा आणणारेच तोंडघशी पडतील, असा निशाणा संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी रविवारी अप्रत्यक्षपणे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर साधला.

मध्य प्रदेशातील रायसेन येथे १८०० कोटी रुपये खर्चून बांधल्या जाणाऱ्या देशातील पहिल्या ग्रीनफील्ड रेल्वे डब्ब्यांच्या उत्पादन प्रकल्पाची पायाभरणी केल्यानंतर जाहीर सभेला संबोधित करताना राजनाथ सिंह ट्रम्प यांचे नाव न



घेता त्यांच्यावर निशाणा साधता म्हणाले, काही लोक भारताच्या विकासावर खूश नाहीत. त्यांना भारताचा विकास होत असलेला आवडत नाही. भारतीय वस्तूंवर शुल्क लादून भारताच्या विकासाला रोखण्याचा प्रयत्न केला जात आहे. परंतु भारत इतक्या वेगाने प्रगती करत आहे की, आता जगातील कोणतीही शक्ती भारताला महाशक्ती होण्यापासून रोखू शकत नाही. २०१४ मध्ये नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले तेव्हा भारताच्या संरक्षण उत्पादनांची निर्यात ६०० कोटी होती, आजच्या घडीला ती २४००० कोटींच्या पार आहे. हा नवा भारत सामर्थ्यवान आणि कुणाच्या दबावात येणारा नाही.

भारताची अर्थव्यवस्था जगातील इतर देशांप्रमाणे एका घटकावर अवलंबून नाही. शहरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्था एकमेकांच्या हातात हात घालून कार्य करीत असल्याने जागतिक मंदीतही आपण तग धरून होतो. त्यामुळे भारताला होणारा त्रास हा अल्पकाळ आहे. पण अमेरिकेचे होणारे नुकसान दीर्घकाळ चालणारे असेल, असे सिंह म्हणाले.

◂ *(वृत्तसंस्था)*

### धर्म पाहून नव्हे कर्म पाहून मारतो

» पहलगाम घटनेनंतर शत्रूने गृहीत धरले की, भारत शांत बसेल. मात्र पंतप्रधानांनी केलेल्या संकल्पानुसार आम्ही त्यांना अद्दल घडवली. आम्ही जगाला संदेश दिला की, आम्ही कोणाला छेडत नाही, पण जर कोणी आम्हाला छेडले, तर त्याला सोडत नाही. आम्ही धर्म विचारून नव्हे, कर्म पाहून मारतो. ■

### प्रकल्पामुळे पाच हजार तरुणांना रोजगार

» रायसेन येथील दसरा मैदानावर देशातील पहिल्या रेल्वे आणि मेट्रो डब्ब्यांचे उत्पादन होणार आहे. १८०० कोटींच्या प्रकल्पातून पाच हजार तरुणांना रोजगार मिळणार आहे. भोपाळ, रायसेन, सिहोर आणि विदिशा यासारख्या जिल्ह्यांना प्रकल्पाचा फायदा होईल, असे राजनाथ सिंह म्हणाले. ■

# सीमेवरील संघर्ष बुद्धिबळाचा पट

## ऑपरेशन सिंदूरमध्ये आखलेल्या रणनीतीवर लष्करप्रमुखांची टिप्पणी

**चेन्नई, १० ऑगस्ट**

ऑपरेशन सिंदूर पारंपरिक युद्धाची रणनीती नव्हती, तर बुद्धिबळाच्या चालीप्रमाणे 'ग्रे झोन'मधील कारवाई होती. सीमेवरील संघर्ष बुद्धिबळाचा पट होता आणि चालीप्रमाणे निर्णय घेत होतो. कारवाईसाठी आम्हाला पूर्ण मोकळीक देण्यात आली, असे देशाचे लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी सांगितले. आयआयटी मद्रास येथे अग्निशोध उपक्रमांतर्गत इंडियन आर्मी रिसर्च सेल अर्थात् आयएआरसीच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना लष्करप्रमुख म्हणाले, ऑपरेशन सिंदूरमध्ये आपण आणि शत्रू दोघेही एकमेकांच्या चाली समजण्याचा प्रयत्न करत




होतो. काही ठिकाणी आपण शत्रुला चेकमेट केले, तर काहीवेळा जोखमीचा निर्णय घेतला. मोठ्या मोहिमेच्या यशामध्ये राजकीय स्पष्टता आणि स्वातंत्र्य खूप महत्त्वाचे असते, आम्हाला ऑपरेशन सिंदूरमध्ये कारवाईची पूर्ण मोकळीक होती, असे त्यांनी सांगितले.



### हल्ल्यासाठी २५ एप्रिलला लक्ष्य निर्धारित

जनरल उपेंद्र द्विवेदी पुढे म्हणाले, २५ तारखेला आम्ही सात ते नऊ लक्ष्य निर्धारित केले होते. त्याबद्दल योजना तयार केली आणि त्याप्रमाणे लक्ष्य भेद केला. तत्पूर्वी २९ एप्रिल रोजी आम्ही पंतप्रधान मोदींना भेटलो. या मोहिमेला ऑपरेशन सिंदूर हे नाव देण्याचे ठरले. या नावाने संबंध देशाला प्रेरणा मिळाली.







सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे...



### म्हैसगावात माजी आमदार संजय शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर

**कुर्डूवाडी, दि. १० ऑगस्ट-**

म्हैसगाव (ता. माढा) येथील विठ्ठल कार्पोरेशन लि. चे संस्थापक चेअरमन व माजी आमदार संजयमामा शिंदे यांच्या ५७ व्या वाढदिवसानिमित्त विठ्ठल कार्पोरेशन लि. म्हैसगाव येथे माजी आमदार विनायकराव पाटील, यशवंत (भैय्या) शिंदे, वामन भाऊ उबाळे, विजयकुमार पाटील, आप्पासाहेब उबाळे, लक्ष्मणभाऊ पाटील, हर्षल बागल, गणेश बागल, भास्कर उबाळे, शंकर उबाळे, धर्मा उबाळे व ओंकार ग्रुपचे जनरल मॅनेजर सुनील बंडगर या मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. तसेच रक्तदान शिबिर राबवून २५५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. कार्यक्रमास येणाऱ्या सर्व पाहुण्यांना व सर्व कामगार यांना स्नेहभोजन देऊन कार्यक्रम साजरा करण्यात आला. यावेळी विठ्ठल कार्पोरेशन चे टेक्स्टाईल विभागाचे जनरल मॅनेजर चितळे साहेब, प्रोडक्शन मॅनेजर पाटील, फायनान्स मॅनेजर भास्कर गव्हाणे, लॅब इन्चार्ज मुकणे, मेन्टेनन्स मॅनेजर घाडगे, इंजिनीयर खाडे, परचेस ऑफिसर कल्याण पाटील, प्रशासकीय अधिकारी प्रदीपकुमार पाटील, सुहास वेदपाठक, एच आर मॅनेजर परमेश्वर माळी, सुरक्षा अधिकारी सचिन शिंदे यांच्यासह विठ्ठल कार्पोरेशन मधील विविध विभागातील अधिकारी , कर्मचारी उपस्थित होते.




### व्हॅलेंटाईन स्कूलमध्ये रक्तदान शिबिराच्या आयोजनातून जपले समाजहीत

**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मिडीयम स्कूलच्या वर्धापन दिनानिमित्त रक्तदान शिबिरांचे आयोजन केले होते. या शिबिरांचे उद्घाटन ॲड. राजेंद्र खोले यांच्या हस्ते झाले. रक्तदानाची सुरुवात संस्थेचे सचिव संतोष गड्डम व सहसचिव नागेश शेंडगे यांच्यापासून सुरू झाली. यावेळी मेडीकेअर ब्लड सेंटर चे अध्यक्ष डॉ.शशांक शेरला, संस्थेचे अध्यक्ष उमाकांत मेंढापूरे, उपाध्यक्ष यमुना दिड्डी, सचिव संतोष गड्डम, सहसचिव नागेश शेंडगे व मुख्याध्यापिका जी. एच. कल्याणी, उपमुख्याध्यापिका मिना दुधनीकर, पर्यवेक्षिका सुनिता मंद्रुपकर, नागमणी पेगडा, सुप्रिया बोम्मा भगतलाल सुतार, इंद्रजीत चव्हाण, क्रीडा विभाग प्रमुख संतोष पाटील आदी उपस्थित होते. या कार्यक्रमास १०० जणांनी रक्तदान केले आहे. शिबिराच्या समारोपाला सर्व रक्तदात्यांना प्रमाणात देऊन सन्मानित करण्यात आले. मेडीकेअर ब्लड सेंटर यांच्या मदतीने हे शिबीर संपन्न झाले.




### श्री सिद्धेश्वर फाउंडेशनकडून अवयवदान माहितीपत्रकाचे प्रकाशन

**सोलापूर, दि. १० ऑगस्ट -**

श्री सिद्धेश्वर फाउंडेशनने राष्ट्रीय अवयवदान पंधरवडा निमित्त समारंभ साजरा केला. यानिमित्ताने अवयवदान माहितीपत्रकाचे प्रकाशन केले. या माहितीपत्रकाच्या ५००० प्रति श्री सिद्धेश्वर फाउंडेशनकडून वितरित करण्यात आल्या. तसेच अवयव दान केलेल्या नातलगांचा सन्मान केला. या समारंभाचे अध्यक्ष व्ही. एम. मेडिकल कॉलेजचे शरीरशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संजय फुलारी होते. धाराशिवचे शिवशंकर कोळी यांच्या हस्ते हा प्रकाशन सोहळा संपन्न झाला. आठवीतल्या मुलाचे ब्रेनडेड झाल्यानंतर त्याचे अवयवदान शिवशंकर कोळी यांनी केले. मेडिकल कॉलेजची संख्या वाढत चालल्याने अवयवदान, देहदानाचे महत्त्व आणखी वाढले आहे. देह व अवयवदान करणाऱ्यांची संख्या वाढली पाहिजे असे विचार डॉ. फुलारी यांनी याप्रसंगी मांडली. एका मुलाचे सहा अवयव दान करून अवयव दात्याला सहा मुले मिळाली. त्यांच्या दानाचा आनंद सहापट वाढला असे गौरवोद्गार डॉ. अनिल सर्जे यांनी याप्रसंगी काढले. देहदान दात्यांची संख्या अजून वाढली पाहिजे अशी अपेक्षा प्रमुख अतिथी अवयवदान प्रचारक नारायण दुमालदार यांनी मांडली. याप्रसंगी अवयवदान केलेल्या नीता अविनाश कुलकर्णी, सोमनाथ कोमठाळे यांच्यासह नातलगांचा सन्मान करण्यात आला. दधिची अवयवदान प्रचारक संघाचे रामभाऊ जोडमोडे, उदय आळंदकर, स. दि. शिरवळकर, काशीनाथ सर्जे, छत्रपती शिवाजी रुग्णालयाचे विकास लिंगराज, सिद्धाराम कोरे, काशीनाथ गवसणे, यशवंत हिरापुरे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री सिद्धेश्वर फाउंडेशनचे अध्यक्ष सिद्धार्थ सर्जे, सूत्रसंचालन श्री सिद्धेश्वर फाउंडेशन आरोग्य विभाग प्रमुख ममता कुलकर्णी व आभार प्रा. संजय बनसोडे यांनी मानले.

**अवयवदात्यांच्या नातलगांचा केला सन्मान**

# कबुतरांसाठी प्रसंगी हातात शस्त्र घेऊ : जैन मुनींचा इशारा

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि. १० ऑगस्ट-**

कबुतरांना सार्वजनिक ठिकाणी खाद्य पदार्थ घालण्याबाबत उच्च न्यायालयाचा मनाई आदेश असताना जैन समाजाचा या निर्णयाला विरोध कायम आहे, त्यामुळे या विषयावर तणाव कायम असून आता या वादात जैन मुनींनी उडी घेतली आहे.

मुंबई महापलिका व पोलिसांच्या कारवाई विरोधात १३ ऑगस्टपासून आंदोलन करण्यात येणार आहे, गरज पडल्यास कबुतरांना वाचविण्यासाठी हातात शस्त्र घेऊ' असा इशारा जैन मुनी निलेशचंद्र विजय यांनी रविवारी दिला. मुंबई उच्च न्यायालयाने दादर येथील कबुतरखाना परिसरात पक्ष्यांना खाद्य देण्यावर निर्बंध घातले आहेत. त्याविरुध्दची पुनर्विचार याचिका फेटाळून लावताना दादर कबूतर खाण्याजवळील ताडपत्री हटविणाऱ्यावर व कबूतरांना दानापानी घालणाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश महापालिका व पोलिसांना दिले आहेत. त्यानुसार महापालिकेकडून दंडात्मक कारवाई सुरु आहे.त्यामुळे जैन समाज अधिक आक्रमक झाला आहे. न्यायालयाच्या आदेशानंतरही जैन समाजातील काही व्यक्तींनी दादर कबुतरखान्याजवळ कबुतरांना अन्न टाकले होते. पोलिसांनी तातडीने कारवाई करून त्यांना थांबवले. यामुळे समाजाने १३ तारखेपासून कबुतरखाना बंद करण्याच्या निर्णयाविरोधात उपोषण सुरू करण्याचा इशारा दिला आहे.



जैन मुनी निलेशचंद्र विजय यांनी रविवारी कबुतर खान्याजवळ भेट देऊन या निर्णयाविरुद्ध लढणार असल्याचे म्हटले ' ते म्हणाले की, कबुतरे जगली पाहिजेत, यासाठी आम्ही शांततापूर्ण मार्गाने सत्याग्रह आणि उपोषण करू. जैन समाज शांतताप्रिय आहे आणि शस्त्र उचलणे आमचे काम नाही, पण गरज पडली तर धर्माच्या रक्षणासाठी आम्ही शस्त्रही हाती घेऊ शकतो. आम्ही भारताचं संविधान मानतो ना, कोर्टाला मानतो ना, देवेंद्र फडणवीसला मानतो ना. पण आमच्या धर्माच्याविरोधात असेलतर आम्ही कोर्टालाही मानत नाही. असा इशारा देऊन ते म्हणाले,हे प्रकरण सध्या न्यायालयात आहे आणि कबुतरे मरता कामा नयेत. सरकारच्या आदेशानंतर पक्ष्यांना खाद्य देणे सुरू झाले आहे. निवडणूक डोळ्यांसमोर ठेऊन हा सगळा प्रकार सुरु आहे. आमचे पर्युषण पर्व संपल्यानंतर आम्ही पुढचा निर्णय घेऊ. आता आम्ही शांत बसणार नाही. १३ तारखेला आम्ही उपोषण सुरु करु. देशभरातली जैन बांधव आंदोलनासाठी इथे येतील. जीव दया आमच्या धर्मात आहे, जैन धर्माला का लक्ष्य केले जात आहे? मी एकटा आंदोलनाला बसणार नाही. देशभरातली १० लाख जैन बांधव इकडे उपोषणाला बसतील, असा इशारा निलेशचंद्र विजय यांनी दिला.

दारू आणि कोंबड्या खाऊन किती लोक मरतात, हेही दाखवावे. आम्ही पालिकेकडे कबुतरांना खाद्य द्यायला परवानगी मागितली आहे. मुंगीपासून ते हत्तीपर्यंत कोणताही जीव मरता कामा नये, हे आमच्या धर्मात लिहिलं आहे, असेही त्यांनी सांगितले. त्यांच्या या वक्तव्यामुळे आता नवा वाद पेटण्याची शक्यता आहे. यावर आता मनसे आणि ठाकरे गट काय भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## दिशा अभियानात महाराष्ट्र देशात अग्रस्थानी : मुख्यमंत्री

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १० ऑगस्ट-**

बौद्धिक अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांसाठी एकसमान आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाची दिशा दाखवणारे 'दिशा अभियान' महाराष्ट्रात यशस्वीपणे राबविण्यात आले असून विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अभूतपूर्व बदल घडवून आणला आहे. जय वकील फाउंडेशनने विकसित केलेला आणि नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर दि एम्पॉवरमेंट ऑफ पर्सन्स विथ इंटेलेक्च्युअल डिसॅबिलिटीज मान्यताप्राप्त हा नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम राज्यातील ४५३ विशेष शाळांमध्ये लागू झाला आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

ते म्हणाले, 'दिव्यांगांसाठी स्वतंत्र विभाग सुरू करणारे ही महाराष्ट्र पहिले राज्य असून दिशा अभियानामुळे विशेष विद्यार्थ्यांना समान संधी देणारे गुणवत्तापूर्ण शिक्षण शक्य झाले आहे. हा उपक्रम 'विकसित भारत २०४७' या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या समावेशक व स्वावलंबी समाजाच्या दृष्टिकोनाशी सुसंगत आहे. सन १९४४ मध्ये स्थापन झालेल्या जय वकील फाउंडेशनने संशोधनाधारित आणि सार्वत्रिक पद्धतींवर आधारित अभ्यासक्रम विकसित केला. २०१९ मध्ये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आणि जय वकील फाउंडेशन यांच्यात सामंजस्य करार झाला. त्यामुळे महाराष्ट्रातील सर्व शासकीय अनुदानित व विनाअनुदानित विशेष ओळखपत्र शाळांमध्ये हा अभ्यासक्रम राबविण्यास सुरुवात झाली. सहा वर्षांत दिशा अभियानाची ४५३ शाळांमध्ये अंमलबजावणी झाली असून २,६७३ विशेष शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले असून या अभियानाचा लाभ १८,४३१ विद्यार्थ्यांना थेट लाभ मिळाला आहे.

महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमध्ये हे अभियान पोहोचले आहे. या कामगिरीमुळे बौद्धिक अक्षमता असलेल्या मुलांसाठी राज्यव्यापी अभ्यासक्रम असलेले महाराष्ट्र हे देशातील पहिले आणि एकमेव राज्य ठरले आहे. सन २०२५-२०२८ पर्यंत हा सामंजस्य करार वाढविण्यात आला आहे.

## वाहतूक कोंडीत ॲम्ब्युलन्स अडकल्याने पतीच्या डोळ्यासमोर पत्नीचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई दि. १० ऑगस्ट-**

महामार्गबरोबरच शहरातील वाहतूकीची समस्या दिवसोदिवस बिकट होत चालली आहे. महानगरातील ठाणे घोडबंदर महामार्गावर खड्ड्यांमुळे झालेल्या वाहतूक कोंडीत म्ब्युलन्स अडकल्यामुळे एका ४९ वर्षांच्या महिलेचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना नुकतीच घडली आहे. छाया कौशिक पुरव( वय ४९ ) असे त्यांचे नाव आहे. पालघर तालुक्यातल्या सफाळे, मधुकर नगर येथे राहत होत्या. ७० किलोमीटरच्या प्रवासासाठी रुग्णवाहिकेला दवाखान्यात पोहचण्यासाठी तब्बल ४ तास लागले.त्यामुळे जखमी महिलेचे पतीच्या डोळ्यासमोरच उपचाराविना प्राण गेले.याबाबत परिसरातील नागरिकांतून तीव्र हळहळ व वाहतुकीच्या समस्येबद्दल संताप व्यक्त होत आहे.

छाया पुरव यांच्या अंगावर झाडाची फांदी पडल्यानं त्या गंभीर जखमी झाल्या होत्या. त्यांच्या बरगड्या, खांदे आणि डोक्याला मार लागला होता. मात्र पालघरमध्ये ट्रॉमा सेंटर नसल्याने, स्थानिक रुग्णालयाने त्यांना मुंबईतील हिंदुजा रुग्णालयात नेण्यासाठी सांगितले होते. साधारणतः१०० किलोमीटरचे हे अंतर पार करायला २.५ तास लागत असल्याने डॉक्टरांनी त्यांना भूल देऊन दुपारी ३ वाजता म्ब्युलन्स घालून पाठवून दिले. त्यावेळी त्यांचे पती कौशिक पुरव हे सोबत होते. परंतु म्ब्युलन्स मुंबई अहमदाबाद मार्गावर झालेल्या वाहतूक कोंडीमध्ये अडकली. सुमारे ६ वाजता तीन तासांपेक्षा जास्त वेळ होऊनही निम्मेच अंतर पार झाले होते.भूलचा प्रभाव कमी झाल्याने छाया पुरव यांना असह्य वेदना होऊन त्यांची प्रकृती बिघडल्याने, तातडीने उपचार मिळावेत, यासाठी रुग्णवाहिका हिंदुजा रुग्णालयापासून सुमारे ३० किमी अंतरावर असलेल्या मीरा रोडवरील ऑर्बिट रुग्णालयात नेण्यात आले. मात्र त्यासाठीही एक तासाचा अवधी लागला. तोपर्यंत खूप उशीर झाला होता. डॉक्टरांनी पुराव यांची तपासणी केली आणि त्यांना मृत घोषित केले.

'त्यांना जरी ३० मिनिटे आधी हॉस्पिटलमध्ये दाखल केले असते तरी त्यांचे प्राण वाचले असते, असे डॉक्टरांनी सांगितले. पत्नीच्या निधनाने धक्का बसलेल्या कौशिक म्हणाले,' पत्नीला वाचवण्यासाठी खूप प्रयत्न केले, पण वाहतूक कोंडीमुळे त्यांचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. रस्त्यावर खूप खड्डे होते आणि त्यामुळे तिला खूप वेदना होत होत्या. त्यामुळे ती ओरडत रडत होती. मला लवकरात लवकर रुग्णालयात घेऊन जाण्याची विनंती केली. पण आम्ही अडकलो होतो, अनेक वाहने चुकीच्या दिशेने येत असल्यामुळे वाहतूक कोंडी आणखी वाढल्याने आम्हाला तिला मुकावे लागले.

## शुल्क आकारणीबाबत विद्यार्थ्यांची तक्रार आल्यास कारवाई

■ महाविद्यालयांना 'एफआरए'चा स्पष्ट इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे दि. १० ऑगस्ट**

राज्यातील खासगी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना वेगवेगळ्या नावांखाली अनामत शुल्क, ठरवलेल्या शुल्कापेक्षा अधिक शुल्क आकारणी करता येणार नाही. त्याबाबतचे निर्देश शुल्क नियामक प्राधिकरणाने (एफआरए) दिले असून, या बाबत विद्यार्थी, पालकांच्या तक्रारी आल्यास कारवाई करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

अनामत शुल्क, शुल्क आकारणीबाबत व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना एफआरएकडून वेळोवेळी स्पष्टता देण्यात आली आहे. सध्या राज्यात अभियांत्रिकी, व्यवस्थापन, हॉटेल मॅनेजमेंट, विधी अशा विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. या पार्श्वभूमीवर 'एफआरए'चे सचिव डॉ. अर्जुन चिखले यांनी या बाबतचे परिपत्रक नुकतेच प्रसिद्ध करून शुल्क आणि अनामत शुल्क आकारणीकडे शिक्षण संस्था, महाविद्यालयांचे लक्ष वेधले आहे. विद्यार्थ्यांकडून घेतल्या जाणाऱ्या अनामत रकमेची कमाल मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. प्राधिकरणाच्या २८ ऑगस्ट २०२४च्या बैठकीत आणि ऑक्टोबर २०२४ रोजी प्रसिद्ध झालेल्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६च्या नियमावलीत हा नियम ठरवून देण्यात आला आहे. अनामत रक्कम केवळ एकदाच आकारली जावी आणि वेगवेगळ्या नावाखाली ते वसूल करू नये. त्याचप्रमाणे अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर ही रक्कम संबंधित विद्यार्थ्यांना परत करणे बंधनकारक आहे. संस्था अधिनियम २०१५मधील कलम १४(५) नुसार, कोणतीही संस्था एका शैक्षणिक वर्षात एका वर्षाच्या शुल्कापेक्षा अधिक शुल्क वसूल करू शकणार नाही, असे 'एफआरए'ने स्पष्ट केले आहे.अधिनियम २०१५च्या किंवा त्याखालील नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास, त्या बाबत विद्यार्थी-पालकांच्या तक्रारी प्राप्त झाल्यास कलम २०नुसार कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

### खानावळ, वसतिगृह सुविधा ऐच्छिक

राज्यातील अनेक शिक्षण संस्था वसतिगृह आणि खानावळीची सुविधा उपलब्ध करून देतात. मात्र, एफआरएने वसतिगृह आणि खानावळीच्या सुविधांबाबतही परिपत्रकात नमूद केले आहे. विद्यार्थ्यांना वसतिगृह आणि खानावळ सुविधा वैकल्पिक स्वरूपात उपलब्ध करून द्याव्यात. त्याबाबत विद्यार्थ्यांना सक्ती करण्यात येऊ नये, असेही एफआरएने स्पष्ट केले आहे.

## पु. अ. होळकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त चौंडी येथे पुष्पवृष्टी व अभिवादनास उपस्थित रहावे

■ ॲड. राजेंद्र डांगे यांचे आवाहन

**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जन्म गाव चौंडी (तालुका जामखेड जिल्हा अहिल्यानगर) येथे बुधवार १३ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुण्यतिथी २३० व्या पुण्यतिथीनिमित पुष्पवृष्टी व अभिवादन समारंभास महाराष्ट्रातील सर्व धनगर समाज बंधू भगिनी उपस्थित राहणार आहेत. सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील धनगर बांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन महाराष्ट्र धनगर समाज महासंघाचे प्रदेश अध्यक्ष अँड.राजेंद्र भाऊ डांगे यांनी केले.

ते सोलापूर येथील धनगर समाजाच्या बांधवाशी बोलत होते. महाराष्ट्र धनगर समाज महासंघाचे स्थापनेपासून अण्णासाहेब डांगे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी चौंडी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची पुण्यतिथी साजरी करत आहेत. गेल्या चाळीस वर्षांत महाराष्ट्र धनगर समाज महासंघाच्या वतीने अखंड हरिनाम सप्ताह, चौंडी विकास प्रकल्प, होळकर उद्यान, अहिल्यासृष्टी, स्मारक, वाडा इत्यादी कार्य तडीस नेले. अजूनही अनेक विकास कामे चालू आहेत. या सर्व कार्यात अण्णासाहेब डांगे यांनी आपले संपूर्ण आयुष्य वाहून घेतले आहे. महाराष्ट्र धनगर समाज महासंघाचे मार्गदर्शक माजी प्रदेश अध्यक्ष ॲड. रामहरी रूपनवर, महाराष्ट्र धनगर समाज महासंघाचे उपाध्यक्ष बाळासाहेब शेळके यांचे सहकार्य आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अहिल्या संदेश यात्रेचे स्वागत करणारे स्वर्गीय कर्नल प्रभाकर लांडगे आणि स्वर्गीय शिवाजी महाराज पिसे यांची आठवण महासंघाचे कार्य करताना आल्याशिवाय राहत नाही. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्यावर पुष्पवृष्टी आणि अभिवादन समारंभास महासंघाचे संस्थापक, माजी मंत्री, चौंडीचे शिल्पकार डॉ अण्णासाहेब डांगे हे आणि मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## 'उद्धव ठाकरेंनाही निवडणुकीपूर्वी ती माणसे भेटली होती'

■ पवारांनंतर संजय राऊतांचा खळबळजनक दावा

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १० ऑगस्ट-**

विधानसभा निवडणुकीआधी मला दिल्लीत दोन माणसांनी १६० जागा जिंकून देण्याची गॅरंटी दिली होती, असा गौप्यस्फोट जेष्ठ नेते व काँग्रेसचे संस्थापक अध्यक्ष शरद पवार यांनी केल्याने राज्याच्या राजकारणात खळबळ उडाली असताना शिवसेना ठाकरे गटाचे नेते खा. संजय राऊत यांनी त्याला पुष्टी देताना रविवारी एक मोठा दावा केला आहे. पवारांना भेटलेली ती माणसे उद्धव ठाकरेंनाही भेटली होती, त्यांनी आम्हाला ६० ते ६५ कठीण जागा जिंकून देण्याचा दावा केला होता, असा गौप्यस्फोट त्यांनी केला आहे.

पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले की, काल शरद पवार यांनी जो विषय मांडला की निवडणुकीपूर्वी त्यांना काही लोक भेटले आणि १६० जागा मिळवून देतो विशिष्ट रक्कम द्या अशी मागणी केली. आता त्याही पुढे जाऊन मी सांगतो या पैकी काही लोक उद्धव ठाकरेंनाही भेटले होते. हे लोक लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीलाही भेटले होते. आम्ही त्यांना सांगितले की आमचा लोकशाहीवर विश्वास आहे. देशातले वातावरण पाहता लोकसभा आम्ही १०० टक्के जिंकू आणि खरोखर महाराष्ट्रात आम्ही ते यश प्राप्त केलं. त्यामुळे निवडणुकीत अशा प्रकारे घोटाळे करून आम्हाला जिंकायची गरज नाही, असे सांगून राऊत म्हणाले, विधानसभा निवडणुकीपूर्वी ते लोक परत आले. आम्ही त्यांना सांगितलं की लोकसभेत आमचा विजय झाला आहे. विधानसभेत आम्ही नक्की जिंकू. ते लोक म्हणाले की तुमच्या ज्या ६० ते ६५ जागा कठीण वाटत आहेत, त्या सांगा. आम्ही तुम्हाला त्या 'ईव्हीएम'च्या माध्यमातून विजयी करून देऊ. आम्ही त्यांना सांगितले की आम्हाला त्याची गरज वाटत नाही. पण त्यांनी इतकेही सांगितलं की तुम्हाला जरी हे आवश्यक वाटत नाही तरी समोर जे सरकारमध्ये आहे, त्यांनी अशा प्रकारची योजना ईव्हीएमच्या माध्यमातून आणि मतदार याद्यांच्या माध्यमातून जे काम केलं आहे, त्यामुळे तुमचचे अपयश आम्हाला दिसत आहे. त्यामुळे आम्ही तुम्हाला मदत करू शकतो. तरी आमचा विश्वास निवडणूक यंत्रणेवर, निवडणूक आयोगावर आणि लोकशाहीवर होता. दुर्दैवाने जे शरद पवार म्हणत आहेत आणि उद्धव ठाकरेंना जी माणसे भेटली त्यांच्या बोलण्यात तथ्य असावे असा दावाही त्यांनी केला.



### शरद पवार काय म्हणाले होते?

नागपुरात शनिवारी पवार यांनी अनेक खळबळजनक दावे करताना म्हणाले होते की, विधानसभा निवडणुकीच्या जाहीर झाल्या, तेव्हा दिल्लीत मला दोन लोक भेटायला आले होते. त्यांची नावे व पत्ते आत्ता माझ्याकडे नाहीत. आम्ही तुम्हाला २८८ पैकी १६० जागा जिंकून देण्याची गॅरंटी देतो. पण त्यावेळी माझ्या मनात निवडणूक आयोगाविषयी कोणतीही शंका नव्हती. त्यामुळे मी असे लोक भेटतच असतात म्हणून त्याकडे दुर्लक्ष केले. हे झाल्यानंतर त्या लोकांची आणि राहुल गांधी यांची मी भेट घालून दिली. त्या लोकांनी आपले म्हणणे राहुल गांधी यांच्यापुढे मांडले. लोकशाहीवर विश्वास असल्याने आम्ही दोघांनीही त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. जनतेच्या दरबारात जाऊन मते मागण्याची भूमिका आम्ही पसंत केली. पण गुरुवारी दिल्लीत राहुल गांधी यांनी पत्रकार परिषद घेतल्यानंतर ही बाब पुन्हा आठवत आहे. राहुल यांनी अतिशय कष्ट करून सफल अभ्यास करून मतचोरीची मांडणी करण्यात आली, असे त्यांनी सांगितले होते.

## वर्गणीसाठी धर्मादाय कार्यालयाची परवानगी गरजेची

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अंतर्गत कलम ४१-क नुसार कोणतीही नोंदणी नसलेली व्यक्ती अथवा संस्था धार्मिक किंवा धर्मादाय हेतूसाठी वर्गणी, देणगी अथवा मालमत्ता गोळा करत असल्यास, त्यांनी त्या वसुलीबाबत तात्काळ धर्मादाय आयुक्तांना कळविणे व परवानगी घेणे बंधनकारक असल्याचे सोलापूर विभागाचे धर्मादाय उप आयुक्त ईश्वर सुर्यवंशी यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळवले आहे.

तरी गणेश मंडळांनी धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या परवानगीशिवाय वर्गणी गोळा केल्यास मंडळातील सदस्य कायदेशीर कार्यवाहीस पात्र असून, सदर कायदा नियमांचे उल्लंघन करणाऱ्यास द्रव्यदंड व तुरुंगवासाची शिक्षा तरतूद आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी वर्गणी किंवा देणगी गोळा करताना धर्मादाय आयुक्त कार्यालयाची पुर्वपरवानगी घेणे कायद्यानुसार बंधनकारक आहे. त्याकरीता त्यांनी धर्मादाय विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन जाऊन ऑनलाईन अर्ज सादर करुन परवानगी घ्यावी. अर्ज करण्याची प्रक्रिया सुलभ असून, http://chariy.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर त्याची सविस्तर माहिती देण्यात आली आहे.

### परवानगीसाठी आवश्यक कागदपत्रे

मंडळातील सदस्यांचे अधिकृत ओळखपत्र (आधार/पॅनकार्ड/ड्रायव्हिंग लायसन्स/मतदान ओळखपत्र), जागेचे संमतीपत्र किंवा स्थानिक स्वराज संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र, मंडळ स्थापनेचा ठराव, मागील वर्षाचा खर्चाचा हिशोब, रु.५०००/- पेक्षा जास्त जमा खर्च असल्यास लेखापरिक्षक अथवा सनदी लेखापालाचा अहवाल आवश्यक

# व्यापार शुल्क अमेरिकेच्या मुळावर

## माजी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागाराची ट्रम्प यांच्यावर टीका



◆ **वॉशिंग्टन, १० ऑगस्ट**

भारतीय वस्तूंवर ५० टक्के आयात शुल्क लादण्याचा राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा निर्णय घोडचूक आहे. यामुळे अमेरिकेचेच नुकसान होणार असल्याचे माजी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जॉन बोल्टन यांनी म्हटले आहे. सर्वाधिक आयात शुल्क लादून रशिया आणि चीनपासून भारताला दूर करण्याच्या अमेरिकेच्या दशकांच्या प्रयत्नांचे नुकसान झाल्याचे त्यांनी म्हटले आहे.



बोल्टन म्हणाले की, भारतासोबतचे संबंध ताणले आणि चीनला मोकळीक देण्यात आली आणि यामुळे अमेरिकेचे महत्त्वाचे ध्येय कमकुवत झाले. ट्रम्प हे भारतापेक्षा चीनला पसंती देत असल्याचा आरोपही त्यांनी केला. ट्रम्प यांची बिजिंगबाबत सौम्य भूमिका ही चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्याबरोबर करार करण्याच्या उत्साहात अमेरिकेच्या धोरणात्मक हितसंबंधांचा बळी देण्यासारखे आहे. ही एक प्रचंड मोठी चूक आहे. दरम्यान अतिरिक्त टॅरिफमुळे भारताने रशियाकडून तेल खेरीदी करणे बंद तर केले नाहीच, उलट भारताने ट्रम्प यांनी लादलेले टॅरिफ हे अन्याय्य आणि अवास्तव असल्याचे म्हटले आहे. यादरम्यान रशियाने भारताला पाठिंबा दिला आहे आणि अमेरिकेवर बेकायदेशीर व्यापार दबाव टाकल्याचा आरोप केला आहे. (वृत्तसंस्था)

### ट्रम्प यांनी भारताला कमजोर समजू नयेः जेफ्री सॅक्स



भारत ही एक महाशक्ती आहे, ज्याची स्वतःची स्वतंत्र जागतिक ओळख आहे. अमेरिकेतील राजकीय नेत्यांचे भारताच्या हिताला प्राधान्य नाही. ट्रम्प प्रशासनाने ५० टक्के टॅरिफ लादत अमेरिकेशी संबंध कायमस्वरूपी विश्वासाच्या पायावर आधारित नसल्याचे संकेत गेले आहेत, अशा शब्दांत प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ जेफ्री सॅक्स यांनी ट्रम्प प्रशासनाला सुनावले.

### अमेरिकेच्या सापळ्यात अडकू नये

अमेरिका स्वतःला मित्र म्हणवून लोकांना फसवत आहे. भारताने या सापळ्यात अडकू नये. भारत आणि चीनमध्ये सीमेवरून तणाव असूनही, दोन्ही देशांमधील मजबूत आर्थिक संबंध भारताच्या अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत फायदेशीर ठरू शकतात. चीनची व्यापारी व्याप्ती आणि आर्थिक शक्ती अमेरिकेपेक्षा खूप मोठी आहे. जागतिक व्यवस्थेत भारताने आपली स्वतंत्र आणि प्रभावशाली भूमिका बजावली पाहिजे, अशी अपेक्षा जेफ्री यांनी व्यक्त केली.

# अनेक कारखान्यांत काम बंद

## ट्रम्प टॅरिफचा पहिला फटका ● भारतातील व्यापार गेला पाकिस्तानात

◆ **नवी दिल्ली, १० ऑगस्ट**

ट्रम्प यांनी भारतावर तब्बल ५० टक्के टॅरिफ आकारला आहे. त्यामुळे अमेरिकेत व्यापार करणाऱ्या भारतातील उद्योगव्यवसायांवर या टॅरिफचा मोठा परिणाम दिसून येऊ लागला आहे. अमेरिकेतील आयातदारांकडून कोट्यवधीची मागणी रद्द करण्यात आल्याने तामिळनाडूमधील अनेक कपडे कारखान्यांनी उत्पादन बंद केले आहे. भारतीय उद्योजकांना देण्यात येणाऱ्या ऑर्डर रद्द करण्यात येत आहेत.

ट्रम्प यांच्या टॅरिफमुळे तामिळनाडूमधील तिरुपूर येथील कपडा उत्पाद करणाऱ्या कारखान्यांमधील काम थंडावले आहे. ट्रम्प यांनी ५० टक्के टॅरिफ लावल्यानंतर बहुताश ऑर्डर स्थगित झाल्या आहेत किंवा रद्द करण्यात आल्या आहेत. तसेच भारतातील कपडे निर्यातदारांना देण्यात येणाऱ्या ऑर्डरपैकी बहुतांश ऑर्डर ह्या बांगलादेश, पाकिस्तान, व्हिएतनाम, कंबोडिया या देशांकडे वळवण्यात आल्या आहेत. या देशांवर १९ ते ३६



टक्के एवढे टॅरिफ आहे जे भारताच्या तुलनेत बऱ्यापैकी कमी आहे.

तिरुपूरमधील एका निर्यातदाराने सांगितले की, भारतामधून अमेरिकेत जाणाऱ्या बऱ्याचशा ऑर्डर आता पाकिस्तानला मिळत आहेत. अनेक अमेरिकन खरेदीदारांनी ऑर्डर स्थगित केल्या आहेत. काही निर्यातदारांनी अमेरिकेचे २५ टक्के टॅरिफ सहन करू शकतो असे म्हटले आहे. मात्र, त्याच्या दुप्पट टॅरिफ असेल तर त्याच्यासमोर निभाव लागणे शक्य नसल्याचे म्हटले आहे. टॅरिफ लावण्यात आल्यानंतर काही उत्पादनाच्या किमतींमध्ये ६४ टक्क्यांपर्यंत वाढ होण्याची शक्यता आहे, तो आमच्या प्रतिस्पर्ध्यांपेक्षा ३५ टक्क्यांनी अधिक असेल, असे त्यांनी म्हटले आहे.

अमेरिकेने ५० टक्के टॅरिफ लावल्यानंतर कपडे निर्यात करणारे बहुतांश निर्यातदार थांबा आणि वाट पाहा या तत्त्वाचा अवलंब करत आहेत. पुढे परिस्थिती कशी बदलते, याची वाट त्यांच्याकडून पाहिली जात आहे. त्यानुसार पुढील निर्णय त्यांच्याकडून घेतला जाणार आहे. तसेच काही दिवसांपूर्वी भारत आणि ब्रिटनमध्ये मुक्त व्यापार करार झाल्याने तिरुपूर येथील व्यापाऱ्यांना ब्रिटनमधील बाजारामधून खूप अपेक्षा आहेत. (वृत्तसंस्था)

# शकुन राणीला डबल व्होटर म्हणून फसले राहुल गांधी

### आयोगाने बजावली नोटीस

◆ **नवी दिल्ली, १० ऑगस्ट**

काही दिवसांपूर्वी काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर मतदार घोटाळ्यावरुन गंभीर आरोप केले होते. यावेळी त्यांनी कर्नाटकातील शकुन राणी यांचे नाव घेत डबल व्होटर असल्याचा आरोप केला. या प्रकरणी आता कर्नाटक निवडणूक आयोगाच्या मुख्य अधिकाऱ्यांनी राहुल गांधी यांना नोटीस पाठवली आहे. त्यांच्याकडून लावण्यात आलेल्या मतदार घोटाळ्याच्या आरोपांवर स्पष्टीकरण आणि पुरावे मागितले आहेत. हे पत्र राहुल गांधी यांनी ७ ऑगस्ट २०२५ रोजी दिल्लीत घेतलेल्या पत्रकार परिषदेला उत्तर म्हणून लिहिले आहे.



तुम्ही ७ ऑगस्टच्या पत्रकार परिषदेत सांगितले होते की, तुम्ही दाखवलेली कागदपत्रे भारतीय निवडणूक आयोगाच्या नोंदीतील आहेत. तुम्ही म्हटले होते की हा निवडणूक आयोगाचा डेटा आहे आणि असेही म्हटले होते की मतदान अधिकाऱ्याने दिलेल्या नोंदीनुसार, शकुन राणीने दोनदा मतदान केले आहे. तुम्ही मतदार ओळखपत्र दाखवले आणि सांगितले की त्यावर दोन टिक मार्क्स आहेत, हे टिक मार्क्स मतदान केंद्र अधिकाऱ्याचे आहेत, असे कर्नाटकच्या सीईओंनी राहुल गांधींना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे.

राहुल गांधी यांनी त्यांच्या पत्रकार परिषदेत निवडणूक आयोगावर मतदार यादीत अपात्र मतदारांचा समावेश करून पात्र मतदारांना वगळल्याचा आरोप केला होता. या आरोपांना उत्तर देताना कर्नाटकच्या सीईओंनी एक निवेदन जारी केले. (वृत्तसंस्था)

### निवडणूक आयोगाने चौकशी केली

तपासादरम्यान, शकुन राणी यांनी तुमच्या आरोपानुसार, दोनदा नव्हे तर फक्त एकदाच मतदान केल्याचे म्हटले आहे. आमच्या कार्यालयाने केलेल्या प्राथमिक तपासणीत असेही दिसून आले आहे की तुमच्या सादरीकरणात दाखवलेला टिकमार्क केलेले कागदपत्र मतदान अधिकाऱ्यांनी जारी केलेले कागदपत्र नाही. म्हणून, तुम्हाला विनंती आहे की ज्या आधारावर तुम्ही शकुन राणी किंवा इतर कोणत्याही व्यक्तीने दोनदा मतदान केले आहे असा निष्कर्ष काढला आहे ते संबंधित कागदपत्रे आम्हाला द्या, जेणेकरून आमच्या कार्यालयाकडून सविस्तर चौकशी करता येईल, असेही यामध्ये मुख्य निवडणूक अधिकारी म्हणाले.

### संकेतस्थळावर करा आयोगाविरोधात तक्रार : राहुल गांधी

मतचोरी आणि निवडणूक आयोगाच्यासंदर्भात तक्रार करण्यासाठी काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी रविवारी संकेत स्थळ जारी केले. एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये त्यांनी म्हटले की, मतांची चोरी हा लोकशाहीवर झालेला हल्ला आहे. निवडणूक आयोगाने पारदर्शकता दाखवून डिजिटल मतदार यादी सार्वजनिक करावी, जेणेकरून जनता आणि राजकीय पक्ष स्वतः त्याचे ऑडिट करू शकतील. आयोगाच्यासंदर्भात तक्रार असल्यास व्होटचोरी डॉट इन स्लॅश ईसी डेमांड नावाचे संकेत स्थळ सुरू करण्यात आले आहे. यावर देशातील नागरिकांना आयोगाविरोधात तक्रार करता येणार आहे.

# अलमट्टीची उंची वाढविणे हा आमचा अधिकारच

## कर्नाटक खासदारांची भूमिका, महाराष्ट्राचा आक्षेप निंदनीय

◆ **नवी दिल्ली, १० ऑगस्ट**

अलमट्टी धरणाची उंची ५१९ मीटरवरून ५२४ मीटर वाढविण्याबाबत महाराष्ट्र सरकार नाहक त्रागा करीत असून हे निंदनीय आहे. कृष्णा पाणीवाटप लवादाच्या निकालानुसार अलमट्टीची उंची वाढवणे हा कर्नाटकचा अधिकारच आहे, असे कर्नाटकमधील खासदारांच्या शिष्टमंडळाने सांगितले. केंद्रीय जलसंपदा मंत्री सी. आर. पाटील यांची भेट घेवून आपली बाजू मांडली.

केंद्रीय अन्न मंत्री प्रल्हाद जोशी आणि खासदार बसवराज बोम्मई यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने गुरुवारी दिल्लीत मंत्र्यांची भेट घेतली. त्यानंतर बोम्मई पत्रकारांशी बोलताना म्हणाले, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली खासदारांनी केंद्रीय जलशक्ती मंत्र्यांची भेट घेऊन अलमट्टीच्या उंची वाढीस विरोध केला. त्यामुळेच आम्ही शिष्टमंडळासह मंत्र्यांची भेट घेऊन वस्तुस्थितीची माहिती दिली. कृष्णा लवादाने धरणाची उंची ५२४ मीटरपर्यंत वाढवण्यास मान्यता दिली आहे. केंद्र सरकार आणि तीन राज्यांनी केलेल्या संयुक्त सर्वेक्षणात धरणामुळे पूर येणार नाही असे सांगणारा अहवाल यापूर्वीच सादर केला. २००५ मध्ये पूर आला, तेव्हादेखील केंद्रीय जल आयोगाने अलमट्टी धरणामुळे सांगली आणि कोल्हापूरमध्ये पूर आला नसल्याचे स्पष्ट केले होते. त्यामुळे महाराष्ट्राचा दावा चुकीचा आहे.

बसवराज बोम्मई म्हणाले, अलमट्टीची उंची वाढवणे हा आमचा अधिकार आहे. तो आम्ही केंद्रीय मंत्र्यांना पटवून दिला आहे. राजपत्रात अधिसूचना काढण्याचा विषय सर्वोच्च न्यायालयात आहे. आम्ही न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही करू. हे प्रकरण जलद सुनावणीसाठी यावे यासाठी राज्य सरकारने सर्व शक्ती वापरावी, अशी सूचना आम्ही कर्नाटक सरकारला केली आहे. (वृत्तसंस्था)

# देशातील महागड्या शहरांध्ये मुंबई अव्वल

◆ **नवी दिल्ली, १० ऑगस्ट**

२०२५ मध्ये नवीन सर्कल रेट लागू झाल्यानंतर, देशातील टॉप १० महागड्या शहरांपैकी मुंबई हे पहिल्या क्रमांकावर आहे. त्यानंतर दिल्ली दुसऱ्या क्रमांकावर, तर चंदीगड हे तिसऱ्या क्रमांकावर आहे. सध्या नोएडा हे उत्तरप्रदेशातील सर्वात महागडे शहर झाले आहे. सध्या १ ऑगस्टपासून नवीन सर्कल दर लागू झाले आहेत.

यूपीचा विचार केला तर, लखनौ हे देशातील टॉप १० महागड्या शहरांपैकी एक बनले आहे. यासह, ते उत्तर प्रदेशातील महागड्या जमिनीच्या बाबतीत तिसरे शहर बनले आहे. जुन्या दरात, गाझियाबाद लखनौच्या मागे होते, परंतु नवीन दरात, ते लखनौला मागे टाकून दुसऱ्या स्थानावर पोहोचले आहे.

सध्या, नोएडा हे उत्तरप्रदेशातील सर्वात महागडे शहर आहे. गाझियाबाद दुसऱ्या क्रमांकावर आहे आणि लखनौ तिसऱ्या क्रमांकावर आहे. मुंबई हे देशातील नंबर-१ शहर आहे. १ ऑगस्ट २०२५ पासून राजधानी लखनौमध्ये नवीन सर्कल दर लागू झाले आहेत. येथे जमीन, घर, दुकान किंवा फ्लॅट खरेदी करणाऱ्यांसाठी आता मालमत्ता पूर्वीपेक्षा लाखो रुपये महाग होईल. जिल्हा प्रशासनाने १० वर्षांनंतर दर वाढवले आहेत. (वृत्तसंस्था)

### आता कोणालाही मिळेल पेट्रोल पंप परवाना?

**नवी दिल्ली :** केंद्र सरकार लवकरच पेट्रोल पंप उभारणीसाठी लागणाऱ्या लायसन्सिंगच्या अटी अधिक शिथिल करण्याच्या तयारीत आहे. देशातील इंधनाच्या वाढत्या मागणीला प्रतिसाद देणे, ऊर्जा सुरक्षिततेत वाढ करणे व डिकार्बोनायझेशन यासारख्या राष्ट्रीय ध्येयांशी सुसंगत अशी धोरणे आखण्यासाठी तज्ज्ञ समितीची स्थापना करण्यात आली आहे. २०१९ मध्ये सरकारने पहिल्यांदा पेट्रोल पंप उभारणीसाठी आवश्यक असलेले गुंतवणूक निकष सुलभ केले होते. त्याआधी कंपन्यांना २००० कोटी रुपयांची गुंतवणूक किंवा गुंतवणुकीची तयारी दर्शवावी लागत होती. मात्र, २०१९ नंतर, केवळ २५० कोटी रुपयांची निव्वळ संपत्ती असलेल्या कंपन्यांना पेट्रोल आणि डिझेल विक्रीला परवानगी देण्यात आली, त्याचबरोबर किमान एक पर्यायी इंधन सुविधा तीन वर्षांत उभारण्याचे बंधन घालण्यात आले. नवीन बदलांची शक्यता पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने नुकतीच एक चार सदस्यीय तज्ज्ञ समिती स्थापन केली आहे. भारत पेट्रोलियमचे माजी संचालक सुखमल जैन हे या समितीचे अध्यक्ष आहेत. उर्वरित सदस्यां ध्ये पीपीएसीचे महासंचालक पी. मनोज कुमार, एफआयपीआयचे पी. एस. रवी आणि मंत्रालयाचे संचालक अरुण कुमार यांचा समावेश आहे.ही समिती २०१९ च्या नियमांचा कार्यक्षमतेचा आढावा घेणे, पर्यायी इंधन, इलेक्ट्रिक मोबिलिटी आणि हरित धोरणांशी धोरण सुसंगत करणे,विद्यमान मार्गदर्शक तत्वांची अं लबजावणी करताना येणाऱ्या अडचणी दूर करणे या मुद्द्यांवर काम करणार आहे.

### पाकिस्तानी सैन्याच्या हल्ल्यात ४७ दहशतवादी ठार

**इस्लामाबाद :** पाकिस्तानी सैन्याने अफगाणिस्तानच्या सीमेवर केलेल्या कारवाईत ४७ दहतवाद्यांना ठार केले. दहशतवाद्यांच्या ताब्यातून शस्त्रे आणि स्फोटके जप्त केली. पाकच्या लष्कराने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, बलुचिस्तानमध्ये अफगाणिस्तानच्या सीमेला लागून असलेल्या झोब जिल्ह्यातील सांबाजा येथे शोध मोहीम राबवण्यात आली. यावेळी झालेल्या चकमकीत ८ ऑगस्टला ३३ आणि ९ ऑगस्ट रोजी १४ दहशतवाद्यांनी ठार मारले. कारवाईत मारलेले गेलेले दहशतवादी तहरीक-ए-तालिबान पाकिस्तान अर्थात् टीटीपीचे सदस्य आहेत.

# पाकिस्तानात हिंदू-ख्रिश्चन भोगतात नरकयातना

## 'ॲम्नेस्टी'चा अहवाल, अमानुष अत्याचार, तक्रारीची दखलही नाही




◆ **लंडन, १० ऑगस्ट**

पाकिस्तानात हिंदू-ख्रिश्चन अल्पसंख्याकांती परिस्थिती नरकापेक्षाही वाईट आहे. या समुदायाची परिस्थिती अतिशय बिकट आहे. त्यांच्यावर होणाऱ्या यातनांची दखल घेतली जात नाही. हिंदू आणि ख्रिश्चन समुदायांच्या मुलींचे अपहरणानंतर धर्मांतरण आणि त्यांचे बळजबरीने लग्न लावण्याचे प्रकार सर्रास सुरू आहेत. या समुदायांना त्रास देण्यासाठी एक व्यवस्था तयार करण्यात आल्याचे ॲम्नेस्टी इंटरनॅशनल या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या ताज्या अहवालात म्हटले आहे.

पाकिस्तानमध्ये धर्मावर आधारित भेदभावाच्या वाढत्या घटनांबद्दल अहवालातून चिंता व्यक्त करण्यात आली. या समुदायांना मूलभूत हक्क आणि मानवी आदरही नाही. इतर समुदायाच्या तुलनेत अल्पसंख्यकांना अतिशय कमी पगार दिला जातो.

**भेदभाव थांबवण्याची संविधानात तरतूद नाही**

पाकिस्तानच्या सेंटर फॉर लॉ अँड जस्टिसच्या सहकार्याने तयार करण्यात आलेल्या अहवालात लाहोर, बहावलपूर, कराची, उमरकोट, इस्लामाबाद आणि पेशावर येथे काम करणाऱ्या २३० अल्पसंख्यक कामगारांशी प्रत्यक्ष भेटून परिस्थितीची माहिती घेण्यात आली. सर्वेक्षणात सहभागी ७० टक्के लोकांनी सांगितले की, अमानवी परिस्थितीत काम करण्यास नकार दिल्यास त्यांना ताबडतोब नोकरीवरून काढून टाकले जाते. त्यामुळे कुठलीही तक्रार न करता ते काम करतात. अल्पसंख्याकांविरुद्ध भेदभाव थांबवण्याची पाकिस्तानच्या संविधानात कोणतीही तरतूद नाही. (वृत्तसंस्था)

### महिलांना मानतात उपभोगाचे साधन

बहावलपूरमधील एका व्यक्तीने सांगितले की त्याने इलेक्ट्रिशियनच्या नोकरीसाठी अर्ज केला होता, परंतु तो ख्रिश्चन असल्याने त्याची निवड साफसफाईच्या कामासाठी करण्यात आली. महिलांना पाकिस्तानात उपभोगाचे साधन मानले जाते. लिंगाच्या आधारावर प्रचंड भेदभाव केला जातो. त्यांच्या वापरासाठी वेगळी भांडी ठेवली जातात. अल्पसंख्यक महिलांवरील अत्याचार आणि धर्मांतरणाचे प्रकार नित्याचाच आहे. त्यांच्या तक्रारीची दखलही घेतली जात नाही.



बेंगळुरू येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नम्मा मेट्रोचे लोकार्पण करण्यात आले. याप्रसंगी पंतप्रधानांनी मेट्रोतून प्रवास केला. तसेच नेहमीप्रमाणे त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

### गोवंशाची मांस विक्री करणाऱ्यांवर कारवाई

◆ **मूर्तिजापूर,१० ऑगस्ट**

मूर्तिजापूर शहर पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे येथील परदेशीपुरा भागात धाड टाकत गोवंशाची कत्तल करून मांस विक्री करणाऱ्या तीन तस्करांना रंगेहाथ पकडले. ही कारवाई 'ऑपरेशन प्रहार'अंतर्गत करण्यात आली. नागरिकांनी पोलिसांच्या या धडक कारवाईचे स्वागत केले.

हवालदार सुरेश पांडे हे रविवारी त्यांच्या पथकासह गस्त घालत असताना त्यांना बातमीदाराकडून खात्रीलायक माहिती मिळाली की, अब्दुल जाफर व त्याचे भाऊ आपल्या घरी गोवंश जातीच्या जनावरांची कत्तल करून मांस विक्री करीत आहेत. या माहितीवरून पोलिसांनी त्या गोवंश तस्कराच्या घरी छापा टाकून अब्दुल जाफर अब्दुल हन्नान, अब्दुल इरफान आणि अब्दुल सुलतान यांना ताब्यात घेतले. या छाप्यात पोलिसांनी अंदाजे ८० किलो गोमांस, तीन लोखंडी सुऱ्या आदी मुद्देमाल जप्त केला.

ही कारवाई उपविभागीय पोलिस अधिकारी मनोहर दाभाडे यांच्या मार्गदर्शनात अजित जाधव, गणेश सूर्यवंशी, नितीन राठोड, सुरेश पांडे, मंगेश विल्हेकर, सचिन दुबे, गजानन खेडकर, कृष्णा येरमुले आणि सोमनाथ यांच्या पथकाने केली. (तभा वृत्तसेवा)

# लाडकी बहीण योजना सुरूच राहणार

### मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले स्पष्ट

◆ **मुंबई, १० ऑगस्ट**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना पुढील पाच वर्षे अखंडपणे सुरूच राहणार असून योग्यवेळी या योजनेच्या निधीत आम्ही वाढ करणार आहे. या योजनेचा लाभ काही पुरुषांनी घेतल्याचे समोर आले असून त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत मुलुंडमध्ये रक्षाबंधनाचा सोहळा उत्साहात साजरा झाला. याप्रसंगी ते बोलत होते.

नरेंद्र मोदी यांनी 'बेटी बचाओ, बेटी पढाओ'सारख्या अनेक योजना सुरू केल्या. 'मुद्रा योजने'च्या लाभार्थ्यांमध्ये ६० टक्के महिला असून त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यास मदत झाल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. (वृत्तसंस्था)

# रॉबर्ट वढेरांविरोधात आरोपपत्र दाखल

## ५८ कोटींच्या बेकायदेशीर कमाईचा ईडीचा आरोप

◆ **नवी दिल्ली, १० ऑगस्ट**

काँग्रेस नेत्या प्रियांका वढेरा यांचे पती रॉबर्ट वढेरा यांच्याविरोधात मनी लाँड्रिंग प्रकरणी अंमलबजावणी संचालनालय अर्थात् ईडीने दिल्लीच्या पीएमएलए विशेष न्यायालयात आरोपपत्र दाखल केले. त्यांनी दोन कंपन्यांद्वारे गुन्ह्यातून ५८ कोटी रुपये कमावल्याचा आरोप ईडीने केला. ५ कोटी ब्लू ब्रीझ ट्रेडिंगमधून आणि ५३ कोटी रुपये स्काय लाईट हॉस्पिटॅलिटी या कंपनीतून त्यांच्या बँक खात्यात जमा झाल्याचे नमूद आहे.



वढेरा यांनी ५८ कोटींची रक्कम मालमत्ता खरेदी, गुंतवणूक आणि कंपन्यांचे कर्ज फेडण्यासाठी वापरण्यात आली. आरोपपत्रात म्हटले की वढेरा यांनी हे पैसे अनेक प्रकारे वापरले. याशिवाय फसवणुकीच्या पैशातून मालमत्ता खरेदी केल्या. आरोपपत्रावर १८ ऑगस्ट रोजी न्यायालयात सुनावणी होणार आहे. आरोप सिद्ध झाल्यास वढेरा यांना पीएमएलए अंतर्गत त्यांना शिक्षा होऊ शकते. (वृत्तसंस्था)

# भारतात सिंहांच्या संख्येत मोठी वाढ

## पाच वर्षांत ६७४ वरून ८९१ वर पोहोचला आकडा

◆ **नवी दिल्ली, १० ऑगस्ट**

कधीकाळी तुर्कस्तानपासून भारतापर्यंत सिंहांचे साम्राज्य होते. पण आता ते केवळ गुजरातच्या सौराष्ट्र भागापुरते मर्यादित राहिले आहे. सिंहांची संख्या वाढावी यासाठी विविध स्तरावर सरकारकडून उपाययोजना करण्यात आल्या आणि त्याला ऐतिहासिक यश मिळाल्याचे नुकत्याच करण्यात आलेल्या सिंहांच्या जनगणनेतून समोर आले. मागील पाच वर्षांत देशात सिंहांच्या संख्येत ३२ टक्क्याने वाढ होऊन ती ८९१ वर पोहोचली आहे. २०२० मध्ये झालेल्या जनगणनेत भारतात ६७४ सिंहांची नोंद झाली होती.

विश्व सिंह दिनाच्या पृष्ठभूमीवर केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव सिंहांच्या आकडेवारीची माहिती एक्सवर लिहिलेल्या पोस्टमध्ये जारी केली. एक अभूतपूर्व यश अशा शब्दांत त्यांनी सिंहसंख्येतील वाढीचे कौतुक केले आणि म्हटले की, भारताला आशियाई सिंहांचे घर मानण्याचा गर्व आहे. २०१५ मध्ये ५२३ सिंह होते, ते आता ८९१ झाले आहे, हा एक ऐतिहासिक प्रवास आहे. ९ उपग्रहाच्या आधारे नुकतीच सिंहांची जनगणना करण्यात आली. यात मागील पाच वर्षांत ३२ टक्क्यांनी वाढ झाली आहे. २०२० मध्ये ६७४ असलेली सिहांची संख्या पाच वर्षांत ८९१ वर पोहोचली आहे. ही वाढ सिंह संवर्धनाच्या दृष्टिकोनातून फारच महत्त्वाची आहे. भारताने केवळ आकड्यांच्या माध्यमातून नव्हे, तर प्रत्यक्ष संवर्धनाच्या पातळीवर सिंहांना न्याय दिल्याचे सिद्ध केले आहे. १६ व्या सिंह जनगणनेतून स्पष्ट झाले की, ही वाढ केवळ संख्या वाढवण्यापुरती मर्यादित नसून सिंहांचे निवासक्षेत्रही लक्षणीय प्रमाणात वाढले आहे. (वृत्तसंस्था)

### गणनेतील मुख्य मुद्दे



- २०२० मध्ये ६७४ असलेली संख्या आता २०२५ मध्ये ८९१ झाली
- प्रौढ माद्यांची संख्या २६० वरून ३३० पर्यंत पोहोचली
- ही वाढ सुमारे २७ टक्के इतकी असून एकूण संख्येत ३२ टक्के वाढ झाली
- गुजरातच्या बार्डा अभयारण्य, जेतपूर, बाबरा-जसदान आणि इतर परिसरात ४९७ सिंह आढळले
- पहिल्यांदाच २२ सिंह कॉरिडॉर भागात दिसून आले, तर अमरेली जिल्ह्यात सर्वाधिक ८२ प्रौढ नर, ११७ प्रौढ माद्या व ७९ छावे आढळले.



### मितियाळा अभयारण्यातील संख्या

| ठिकाण | टक्केवारी |
|---|---|
| भावनगर मेनलँड : | ८४ टक्के वाढ |
| दक्षिण पूर्व किनारपट्टी : | ४० टक्के वाढ |
| गिरनार अभयारण्य : | ४ टक्के घट |
| भावनगर किनारा क्षेत्र : | १२ टक्के घट |
| सिंहांचे भौगोलिक अस्तित्व : सौराष्ट्र | |

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## अग्रलेख...

# अखेर संशयाचे भूत उतरविले

पहलगामच्या क्रूर घटनेने समाजमन सुन्न झाले. दहशतवादी धर्म विचारून हत्या करीत असतील तर त्यांची शिकवण कोणत्या वातावरणात झाली असेल आणि त्यांना शिकविणाऱ्यांची पातळी किती खालच्या दर्जाची असेल, हे उघड होते. पण, त्यांची हिंमत तर बघा, शंभर कोटींच्यावर हिंदूंची संख्या असलेल्या भारतात घुसून शेकडोंच्या संख्येने असलेल्या पर्यटकांपैकी केवळ हिंदू पुरुषांचीच ओळख पटवून त्यांच्यावर जवळून गोळ्या झाडण्यात आल्या. काश्मिरातील स्थानिक देशद्रोही आणि पाकिस्तानपुरस्कृत दहशतवाद्यांनी मानवतेला काळिमा फासणारे कृत्य पहलगाममध्ये केले. त्याचे जे व्हायचे ते परिणाम घडून आलेच. देशात यापूर्वीही अनेक दहशतवादी हल्ले झालेत आणि हजारो निष्पाप नागरिकांचे बळी गेले. हिंदू मंदिरे, न्यायालय, गजबजलेले बाजार, उपनगरीय रेल्वे गाड्यांमध्ये स्फोट घडवून, ज्यांचा काहीच संबंध नव्हता, अशा नागरिकांना ठार मारण्यात आले. २६/११ चा मुंबईवरील हल्ला तर देशाच्या इतिहासातील सर्वांत मोठा आणि क्रूर दहशतवादी हल्ला होता. जवळपास तीन दिवस मुंबईला वेठीस धरण्यात आले होते. भारताच्या स्वाभिमानावर बसलेला घाव होता. पण, तत्कालीन काँग्रेसप्रणीत संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने पाकिस्तानचा निषेध करण्यापलीकडे काहीच केले नाही. डोजिअरचा खेळ कित्येक दिवस चालला. भारताच्या गुप्तचर संस्थांना मुंबईत घुसलेले दहशतवादी पाकिस्तानातून आले होते याची माहिती असतानाही दिल्लीत षंढ आणि लढण्याची धमक नसलेले सरकार सत्तेवर असल्याने काहीच करता आले नाही.

काळाच्या ओघात मुंबईवरील हल्ला जनतेच्या स्मृतिपटलावरून पुसट व्हायला लागला. मुंबईवरील हल्ल्याचे मारेकरी पाकिस्तानात मोकाट सुटले आणि सातत्याने भारताविरोधात जिहादची भाषा वापरू लागले. पण, २०१४ नंतर परिस्थिती बदलू लागली. दिल्लीत भारतीय जनता पक्षाचे सरकार असल्याने आता हल्ला घडविल्यास किंवा हल्लेखोरांना मदत केल्यास आपली खैर नाही, याची जाणीव अस्तनीत लपलेल्या विषारी सापांना झाली. त्यामुळे भारतीय जनता पक्षाच्या गेल्या अकरा वर्षांच्या राजवटीत एकही दहशतवाही हल्ला घडवून आणण्याची हिंमत झाली नाही. या काळात जेवढे हल्ले झाले ते जम्मू-काश्मीरच्या आसपास झाले. पहलगाममध्ये २६ हिंदूंचे जीव घेणे एवढे महागात पडेल याची कल्पना ना दहशतवाद्यांनी केली असावी ना पाकिस्तानने. २२ एप्रिलच्या पहलगाम येथील घटनेनंतर हिंदूंना सातत्याने लक्ष्य करणाऱ्यांना जन्माची अद्दल घडविण्याचा निर्णय मोदी सरकारने घेतला. यासाठी प्रसंगी युद्धालाही सामोरे जाण्याच्या मानसिकतेत सरकार आले होते. सहा आणि सात मे दरम्यान भारताने व्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानात घुसून दहशतवादी तळांवर भीषण हल्ले करीत ते नेस्तनाबूत केले. फाळणीनंतर इस्लामिक देश म्हणून मिरविणाऱ्या पाकिस्तानसाठी हा मोठा धक्का होता. आतापर्यंत केवळ पुराव्यांचे गठ्ठे पाठविणारा भारत थेट आतमध्ये घुसून हवाई हल्ले करू शकतो, यावर शाहबाज शरीफ सरकार, पाकिस्तानी जनता आणि लष्करप्रमुख आसिम मुनीर यांचा विश्वासच बसत नव्हता. पण, हे घडले होते. जगात पाकिस्तानची इज्जत धुळीस मिळाली. या इस्लामिक देशाचे मानमर्दन झाले होते. पाकिस्तानी लष्कर बदला घेण्यासाठी तडफडायला लागले. लष्करप्रमुख आसिम मुनीर शांत बसणार नाही याची जाणीव असल्याने भारताने सीमेवर युद्धासाठीची सर्व तयारी ठेवली होती. सात मे च्या रात्री पाकिस्तानने हल्ले करण्यास प्रारंभ केला होता. सर्वांत भीषण संघर्ष आठ मे रोजीच्या रात्री उडाला. पाकिस्तानचे अत्याधुनिक रडारने सुसज्ज असलेले अवॅक्स विमान पंजाबच्या सीमेवर आले असता भारताच्या क्षेपणास्त्रांनी ते उडविले. सोबतच अमेरिकेने दिलेली तीन एफ-१६ आणि चिनी बनावटीची दोन जेएफ-१७ विमानेही भारताच्या आकाश आणि एस-४०० क्षेपणास्त्रांनी हवेतच नष्ट केली. ८ मे रोजी रात्री झालेल्या युद्धाचा थरार दुसऱ्या दिवशी प्रसार माध्यमांमधून जगाला कळला. यामध्ये अवॅक्ससह पाकिस्तानची सहा लढाऊ विमाने भारताने पाडल्याच्या बातम्या सर्वत्र होत्या. पण, वस्तुस्थिती कुणालाही माहीत नव्हती. विमाने पडल्याची कबुली पाकिस्तान तर देणारच नव्हता. कारण, यामुळे त्याची जगभरात नाचक्की झाली असती. भारतातही याबाबत अधिकृतपणे काहीही बोलले जात नव्हते. सरकार किंवा लष्कर अधिकृत माहिती देत नसल्याचा फायदा घेत विरोधकांनी सरकारला घेरणे सुरू केले. पाकिस्तानची किती विमाने पाडली याची आकडेवारी जाहीर करण्यासाठी मोदी सरकारवर दबाव आणला. प्रसंगी विदेशी प्रसार माध्यमांचीही मदत घेण्याचा नीचपणा विरोधकांनी केला. भारताची विमाने पडली नाही हे असे कसे होऊ शकते? असे प्रश्न काँग्रेससह सर्वच विरोधी पक्षांनी उपस्थित करणे सुरू केले. पण, मोदी सरकारने या विरोधकांना धुडकावून लावले.

पाकिस्तानची किती विमाने पाडली, याचे उत्तर अखेर हवाईदल प्रमुख अमरप्रीत सिंग यांनी शनिवारी बंगळुरू येथे आयोजित एका कार्यक्रमात दिले. भारताच्या संरक्षण दलांनी केलेल्या पराक्रमाचा लेखाजोखा त्यांनी सादर केला. सिंग यांनी याप्रसंगी वर्तमान सरकारच्या राजकीय इच्छाशक्तीचाही स्पष्टपणे उल्लेख केला. सरकारने लष्करी कारवाई करण्याचे अधिकार प्रदान केल्याने आम्हाला लक्ष्य निश्चित करता आले आणि जे आम्ही ठरविले होते ते साध्य केले. भारताला संघर्ष वाढवायचा नव्हता. पाकिस्तानचे संघर्षात जे काही नुकसान झाले त्याला तेथील सरकार आणि लष्कर जबाबदार आहे. आम्ही केवळ दहशतवादी तळांवर हल्ले केले, पाकिस्तानच्या नागरी वस्त्या अथवा लष्करी तळांवर नव्हे. पण शत्रूने आगळीक केली आणि अविचारीपणे हल्ले केले. परिणामी आम्हालाही प्रत्युत्तर द्यावे लागले. ८ मे रोजीच्या रात्री भारतीय हवाई संरक्षण प्रणालीने पाकिस्तानची पाच विमाने तर हवेतच नष्ट केली. यापैकी सर्वांत महागडे आणि हवाई हल्ल्याची पूर्वकल्पना देणारे अवॅक्स हे अत्याधुनिक विमान तर ३०० किलोमीटर अंतरावरून क्षेपणास्त्र डागून पाडल्याचे अमरप्रीत सिंग यांनी सांगितले. एवढ्या दूर अंतरावरून विमान भेदल्याचे जगातील हे पहिलेच प्रकरण असावे. पण, हवाईदल प्रमुखांनी एक खंतही व्यक्त केली. आपल्याच लोकांना आमच्यावर विश्वास नाही हे पाहून मनाला दुःख होते. बालाकोटचा अनुभव आम्हाला आहे. बालाकोटच्या हवाई हल्ल्यात पाकिस्तानी दहशतवादी तळांचे मोठे नुकसान झाल्याचे आणि अनेक दहशतवादी ठार झाल्याची माहिती गुप्तचर संस्थांकडून आम्हाला मिळाली होती. पण, नेमके काय नुकसान झाले आणि किती दहशतवादी मारले गेले याचा अचूक आकडा काही लोकांनी मागितला. पण ऑपरेशन सिंदूरचे पुरावे जगासमोर आहेत. आजच्या युगात काहीही दीर्घकाळ लपून राहू शकत नाही. पाकिस्तानचे दीर्घकाळ लक्षात राहणारे नुकसान झाले आहे. चकलाला आणि मुरीद हे दोन शक्तिशाली कमांडो सेंटर्स होते पण भारताने ते नष्ट केले. एवढेच नव्हे तर त्यांची हवाई क्षमता नष्ट करताना कमीत कमी सहा रडार केंद्रे उडविण्यात आली. पाकिस्तानच्या मानहानीचे पुरावे उपलब्ध असल्याची सर्व माहिती हवाईदल प्रमुखांनी दिली. सुदैवाने आमच्या लष्करी तळांचे काहीही नुकसान झाले नाही. याचे सारे श्रेय आपल्या हवाई संरक्षण प्रणालीला द्यावे लागेल. कारण, पाकिस्तानने जर भारताच्या लष्करी तळांना लक्ष्य केले असते आणि काही नुकसान झाले असते तर शत्रूवर प्रचंड प्रहार करण्याचे आम्ही ठरविले होते, अशी माहिती हवाईदल प्रमुखांनी दिली. त्यामुळे विरोधकांनाही त्यांचे उत्तर मिळाले असेल. उरी आणि बालाकोटप्रमाणे पुरावे मागितले जाणार नाहीत. २०१९ मधील बालाकोटचे संशयाचे भूत यावेळी मात्र पूर्णपणे उतरविले आहे. पुरावे जगासमोर आहेत. उपग्रहांनी टिपलेली छायाचित्रे आहेत. त्यामुळे हवाईदल प्रमुखांनी बंगळुरू येथील कार्यक्रमात भारतीय सेनादलाच्या पराक्रमाचे जे वर्णन केले आहे त्यावरून यापुढे तरी विरोधकांनी पुरावे मागण्याच्या भानगडीत पडू नये, अशी अपेक्षा आहे.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# ट्रम्प अमेरिकेचे गोर्बाचेव्ह ठरणार?

ग्लासनॉस्त आणि पेरिस्त्रायका! या दोन शब्दांनी बलाढ्य सोवियत युनियनचे विखंडन केले. आता ट्रेड आणि टेरिफ हे दोन शब्द बलाढ्य अमेरिकेचा घात करणार काय? राष्ट्रपती ट्रम्प यांनी आपल्या कारकीर्दीच्या पहिल्या सहा महिन्यात घेतलेल्या निर्णयांचा आढावा घेतल्यानंतर असा प्रश्न विचारला जात आहे. सोवियत युनियन ही जगातील एक महासत्ता होती. अनेक देश सोवियत युनियनच्या गोटात होते. पण, मिखाईल गोर्बाचेव्ह सोवियत युनियनचे राष्ट्रपती झाले. त्यांनी दोन शब्दांचा धडाका लावला. ग्लासनॉस्त आणि पेरिस्त्रायका. ग्लासनॉस्त म्हणजे खुलेपणा आणि पेरिस्त्रायका म्हणजे आर्थिक सुधारणा! सोवियत युनियनमध्ये नवे युग येणार, आर्थिक प्रगती झपाट्याने होणार असे सारे वातावरण देशात तयार झाले.

साऱ्या जगात गोर्बाचेव्ह यांचा उदोउदो सुरू झाला आणि याची परिणती झाली सोवियत युनियन व स्वतः गोर्बाचेव्ह यांच्या पतनात. सोवियत युनियनचे मित्र देश त्याला सोडून गेले. एवढेच नाही तर अनेक देश फुटून बाहेर पडले. युक्रेन, जॉर्जिया, अझरबेजान, तुर्कमेनिस्तान हे त्यातील काही देश. जगात सोवियत युनियन नावाचे प्रकरण इतिहासजमा झाले. स्वतः गोर्बाचेव्ह यांचेही पतन झाले. त्यांना अनेक वर्ष दुसऱ्या देशात आश्रय घ्यावा लागला.

**ट्रेड आणि टेरिफ** : राष्ट्रपती ट्रम्प आल्यानंतर ते काय काय करणार याची एक धास्ती होती आणि दुर्दैवाने ती खरी ठरू लागली आहे. मागील सहा महिन्यात ट्रम्प हे ट्रेड आणि टेरिफ या दोन शब्दांशिवाय काही बोलण्यास तयार नाहीत असे म्हणता येईल. यातच अमेरिका व स्वतः ट्रम्प यांचे पतन होईल काय असा प्रश्न आत्ताच विचारला जाऊ लागला आहे. त्यांची पहिल्या सहा महिन्यांची कारकीर्द साऱ्या जगाला धास्ती वाटावी अशी राहिली आहे. केवळ जगासाठी नाही तर अमेरिकेसाठीही ती धोकादायक ठरू लागली आहे असे ताज्या आकडेवारीवरून दिसते. अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेला धक्का बसत आहे. बेरोजगारी वाढत आहे, महागाई वाढत आहे आणि दुसरीकडे राष्ट्रपती ट्रम्प लोकसंख्या वाढविण्याचा सल्ला आपल्या नागरिकांना देत आहेत. वास्तविक त्यांना आपल्या देशातील परिस्थितीची कल्पना यावयास हवी होती. कारण, अमेरिकन राजकारणात- रेटिंग नावाची एक पद्धत आहे. यात एका ठरावीक कालांतराने राष्ट्रपतींच्या लोकप्रियतेचे मूल्यांकन केले जाते. ताज्या रेटिंगनुसार ट्रम्प यांची लोकप्रियता झपाट्याने घसरत आहे. पण, तरीही ट्रम्प यांना परिस्थितीची कल्पना आलेली नाही असे दिसते. उलट राष्ट्रपतिपदाला काळिमा फासणारे वर्तन ते करीत असून, यात आता सुधारणा होण्याची कोणतीही चिन्हे नाहीत.

**भारताची चिंता** : भारतासाठी सर्वांत चिंतेची बाब म्हणजे ट्रम्प यांनी पाकिस्तानला जवळ केले असून, भारतावर एकीकडे २५ टक्के आयात शुल्क लावण्याची घोषणा केली असताना, पाकिस्तानवरील आयात शुल्क मात्र २९ टक्क्यांवरून घटवून १९ टक्के केले आहे. भारतावरील आयात शुल्क काही दिवसांनी ५० टक्के करण्याची त्यांनी घोषणा केली आहे. म्हणजे सर्वच बाबतीत त्यांनी पाकिस्तानला प्राधान्य देणे सुरू केले आहे.

**भारताला धक्का** : राष्ट्रपती ट्रम्प यांनी लावलेल्या या आयात शुल्काचा भारतीय अर्थव्यवस्थेला धक्का बसेल असे मानले जाते. भारतातून केली जाणारी निर्यात कमी होईल. ज्या वस्तूंची निर्यात कमी होईल त्यांचे उत्पादन करणाऱ्या उद्योगांमध्ये नोकरी कपात सुरू होईल. याने भारताचा जीडीपी २ टक्के कमी होईल असाही एक अंदाज व्यक्त केला जात आहे. यात भर म्हणजे अमेरिकेत शिक्षण घेत असलेल्या- नोकरीत असणाऱ्या युवकांवर अमेरिका सोडण्याची एक टांगती तलवार राहणार आहे.

**तेलाचा ताळेबंद** : भारत रशियाकडून स्वस्त दराने तेलाची आयात करीत आहे, याचा भारताला एका वर्षात ३४ हजार कोटी रुपयांचा फायदा झाला आहे. पण, या कारणासाठी अमेरिकेने भारताविरोधात जी पावले उचलली आहेत त्यामुळे देशाला वर्षभरात ७ लाख ८३ हजार कोटींचा फटका बसणार आहे. यावरून स्वस्त तेलाचा सौदा भारताला कसा महागात पडत आहे याची कल्पना करता येईल.

**पाकिस्तानला बळ** : पाकिस्तानजवळ स्वतःचे काही नसताना त्याला अचानक बळ मिळत आहे. एकीकडे अमेरिका व दुसरीकडे चीन दोन्ही महासत्ता पाकिस्तानला सर्व प्रकारची मदत करीत आहेत. चीनने पाकिस्तानला अर्थपुरवठा चालविला आहे तर पाकिस्तानला अमेरिकेत जणू राजमान्यता मिळाली आहे. आंतरराष्ट्रीय जगतात पाकिस्तानला कधी नव्हते असे महत्त्व मिळत आहे. मधल्या काळात त्याला संयुक्त राष्ट्रात दहशतवादविरोधी समितीचे अध्यक्षपद मिळाले होते. दाऊद इब्राहिमने दहशतवाद विरोधी पथकाचे प्रमुख व्हावे असा हा प्रकार होता.

**युद्धबंदीतील भूमिका** : भारत-पाकिस्तान यांच्यात आपण युद्धबंदी घडवून आणली याचा ट्रम्प वारंवार उल्लेख करीत आहेत. विशेष म्हणजे यासाठी आपण 'ट्रेड डील'चा वापर केला असे ते सांगत आहेत. दुसरीकडे पाकिस्तान त्यांचा उदोउदो करीत आहे. पाकिस्तानने शांततेच्या नोबेल पुरस्कारासाठी त्यांच्या नावाची शिफारस केली आहे. याने तर ट्रम्प यांचा अहंकार जणू आभाळाला भिडला आहे. आता त्यांनी पाकिस्तानातील तेलसाठे विकसित करण्याचा मनोदय जाहीर केला आहे. युक्रेन, ग्रीनलॅण्ड यांच्याबाबतही त्यांनी काही खनिज साठे विकसित करण्याचा करार केला आहे. याने अमेरिका बळकट होईल असा त्यांचा विश्वास आहे, जो खुळा आहे असे आता दिसून येते.

**धक्का तंत्र** : मिखाईल गोर्बाचेव्ह आपल्या धोरणांचा उल्लेख 'शॉक थेरपी' - धक्का तंत्र असा करीत होते. याचा धक्का त्यांनाच केव्हा बसला हे त्यांनाही कळले नाही. तशीच अवस्था ट्रम्प यांची होण्याची चिन्हे आहेत.

**अराजकाकडे?** : राष्ट्रपती ट्रम्प अमेरिकन प्रशासन ज्या पद्धतीने चालवीत आहेत ती दिशा अराजकाकडे जाणारी आहे असे राजकीय निरीक्षकांना वाटत आहे. प्रत्येक महत्त्वाच्या संस्थेशी त्यांचा संघर्ष सुरू आहे. मग, ती अमेरिकेची रिझर्व्ह बँक असो वा एफबीआयसारखी महत्त्वाची सरकारी संस्था. प्रत्येकाशी ट्रम्प यांचा वाद सुरू आहे.

**आण्विक युद्धाची भीती** : राष्ट्रपती ट्रम्प यांचे ताजे कृत्य म्हणजे त्यांनी रशियाला शह देण्यासाठी आपल्या दोन आण्विक पाणबुड्या तैनात केल्या आहेत. याने रशियाही संतापला आहे. आता या दोघांमधील वाद जगाला आण्विक युद्धाच्या खाईत लोटेल काय अशी भीती तयार झाली आहे.

**ट्रम्प-पुतिन भेट** : युक्रेनच्या मुद्यावर राष्ट्रपती ट्रम्प व राष्ट्रपती पुतिन यांनी परस्परांना भेटण्याचा निर्णय घेतला आहे. राष्ट्रपती पुतिन या युद्धाला कंटाळले आहेत. रशियाची अर्थव्यवस्था जर्जर झाली आहे. त्यांनाही युद्ध संपविण्याचा मार्ग हवा आहे. राष्ट्रपती ट्रम्प यांच्यासोबत होत असलेली ही भेट त्यांच्यासाठी एक चांगली संधी आहे. पण, युक्रेनला पराभूत करण्याचा पुतिन यांचा उन्माद त्यांना तसे करू देईल काय हा महत्त्वाचा प्रश्न आहे. इस्रायलचे पंतप्रधान नेत्यानाहू यांनी आता गाझातील युद्ध थांबवावे असे काही देशांना वाटते. त्यांनी हे युद्ध न थांबविल्यास आम्ही स्वतंत्र पॅलेस्टिन देशाला मान्यता देऊ असा विचार या देशांनी सुरू केला आहे. असाच विचार युक्रेन युद्धाबाबत काही देश करू शकतात. भारतही करू शकतो. पुतिन याची दखल घेतील काय याचे उत्तर ट्रम्प-पुतिन भेटीनंतरच मिळू शकेल.

## वेध

**पुंडलिक आंबटकर**

# बदलत्या भारताची बदलती समीकरणे

भारताने शेकडो-हजारो वर्षे अन्याय-अत्याचार सहन केला. तेव्हाचा भारत संघटित नव्हता या एकाच कारणामुळे देशावर परकीयांनी राज्य करून अमाप लूट केली. समृद्ध असा सामाजिक, सांस्कृतिक वारसा नासवला. भारत उपखंडातील बहुतांश नागरिक मूळ हिंदूच आहेत. हे सर्व केवळ असंघटितपणा आणि विनाकामाची उदारता यामुळेच घडून आलेले आहे. परंतु, आधुनिक भारताचा नागरिक संघटित होऊ लागल्याने देशाने प्रत्येकच क्षेत्रात गगन भरारी घेतली आहे. कधीकाळी बैलगाडीवरून रॉकेट वाहून नेणाऱ्या भारताच्या आवाक्यात आता संपूर्ण सौरमंडळ आले आहे. भारताने विविध देशांचे तब्बल १०४ उपग्रह एकाचवेळी प्रक्षेपित करून इतिहास घडविला आहे. मंगळावर पहिल्याच प्रयत्नात यान पाठविणारा भारत एकमेव आहे. एक दशकापूर्वीपर्यंत शस्त्रास्त्रे आयात करणारा भारत एक प्रमुख देश होता. परंतु, भाजपा सरकार सत्तेत आल्यानंतर समीकरणे झपाट्याने बदलली. संरक्षण सामुग्री निर्यात करणारा एक प्रमुख देश म्हणून भारताने आपली ओळख निर्माण केली आहे. आज जवळपास ३२ देश भारताकडून शस्त्रास्त्रे खरेदी करण्यासाठी रांगेत आहेत. नेमकी हीच बाब अमेरिकेला खुपत आहे आणि त्यामुळेच भारतावर विविध प्रकारे निर्बंध लादण्याचा प्रयत्न सुरू आहे. भारतावर ५० टक्के आयात शुल्क लादून अमेरिकेने भारताबद्दल असलेल्या आपल्या मनातील द्वेषाची पुनरावृत्ती केली आहे. यापूर्वीही या देशाने भारतावर अनेकदा आघात केलेला आहे. अमेरिकेला शस्त्रास्त्र स्पर्धेत नवा दावेदार नको आहे. कारण, शस्त्रास्त्रे विकूनच हा देश श्रीमंत बनला आहे.

वास्तविक अमेरिका प्रत्यक्ष युद्ध लढणाऱ्यांपैकी नाही. नेहमी इतरांच्या खांद्यावर बंदूक ठेवूनच या देशाने आपल्या अस्त्रांचे प्रदर्शन केलेले आहे. आता भारत शस्त्रास्त्र स्पर्धेत उतरल्याने अमेरिकेला मिरच्या झोंबल्या आहेत. परंतु, नव्या भारताची समीकरणेसुद्धा बदलली असून आता कोणी कितीही दबाव आणला तरी भारत डगमगणारा देश राहिलेला नाही. अमेरिका भारताकडून ४० टक्के औषधे खरेदी करतो. अशा परिस्थितीत ५० टक्के आयात शुल्क लादून ट्रम्प यांनी आपल्याच जनतेचा रोष ओढवून घेतला आहे. भारत कधीकाळी सोनियाची चिडिया म्हणून ओळखला जायचा. नंतरच्या काळात आपसी मतभेद आणि असंघटित समाजामुळे देश परकीयांच्या तावडीत गेला. तब्बल दीडशे वर्षे इंग्रजांनी राज्य केले. आज मात्र सर्वच बाबतीत इंग्लंड भारताच्या स्पर्धेतून बाद झाला आहे. इंग्लंड हा एक श्रीमंत देश म्हणून गणला जातो. कारण, त्यांची लोकसंख्या कमी असल्याने भारताच्या तुलनेत दरडोई उत्पन्न अधिक आहे. परंतु, एकूण संपत्ती व शक्तीचा विचार केला तर इंग्लंड भारतापुढे तग धरू शकत नाही. जेव्हा एखादी व्यक्ती, संघटना अथवा देश आपले उद्दिष्ट साधण्याच्या मार्गावर असतो तेव्हा असंतुष्ट वृत्ती त्यात खोडा घालण्याचा प्रयत्न करतात. सध्या भारताला याच स्थितीतून जावे लागत आहे. नाटो आणि अमेरिकेसारखी महासत्ता भारतावर दबाव आणण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे नवे पर्याय शोधूनच आपल्याला आपली वाटचाल कायम ठेवावी लागणार आहे. पाकिस्तानशी झालेल्या प्रत्येक युद्धात संपूर्ण जग भारताच्या विरोधात असताना केवळ रशिया आणि इस्रायल हे दोनच देश भारताच्या बाजूने होते. यहुदी लोकांवर भारताचे अनेक उपकार आहेत. त्यामुळे इस्रायलला भारताबद्दल सहानुभूती आहे.

रशियाने संकट काळात सदैव भारताची पाठराखण केलेली आहे. युक्रेन युद्धात भारताने रशियाला थेट पाठिंबा न देता कूटनीतिक मार्गाने तोडगा काढण्याचा प्रस्ताव वारंवार ठेवला. परंतु, कच्चे तेल खरेदी करून भारताने रशियाची आर्थिक बाजू सावरली. अनेक युरोपियन देशसुद्धा रशियाकडूनच तेल खरेदी करतात. मग भारतावरच रोष का? स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्यानंतरही भारताला अनेक हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. १९५० च्या दशकात अमेरिकेतून गव्हासोबत गाजर गवत अर्थातच काँग्रेसचे बीसुद्धा पाठविण्यात आले. याचा भारतासारख्या कृषिप्रधान देशाला मोठा फटका बसला. या गवतामुळे कृषी उत्पादनाचे प्रचंड नुकसान झाले आणि आजही होतच आहे. हे षडयंत्र नव्हते का? हा सर्व इतिहास ज्ञात असतानाही देशाचे विरोधी पक्षनेते ट्रम्प यांच्या सुरात सूर मिसळतात, ही बाब देशासाठी खूपच घातक आहे. ट्रम्प यांच्या व्यापारयुद्धामध्ये प्रतिस्पर्धी चीनसारखा देश भारताच्या बाजूने उतरला आहे. या प्रकरणात ब्राझीलसह २७ देशांनी भारताची बाजू घेतली आहे. यातून आधुनिक भारताचे सामर्थ्य सिद्ध होते. भविष्यातही अशी संकटे येणारच आहेत. त्यामुळे अशा संकटांवर मात करूनच आपल्याला आपले उद्दिष्ट गाठायचे आहे.

९८८१७१६०२७

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# स्वातंत्र्य दिन चिरायु होवो

कवी ग. दि. माडगूळकर ज्यांना आपण 'गदिमा' म्हणून ओळखतो त्यांनी लिहिलेलं 'आचंद्र सूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे' हे एक अजरामर गीत आहे. या गीताला नेहमीच १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी या दिवशी गायिले जाते. ग. दि. माडगूळकर यांची आपल्या देशाप्रति आणि देशाच्या स्वातंत्र्याप्रति असलेली काव्यमय भावना त्यांनी या गीतामधून व्यक्त केलेली आहे. परंतु कवीची कल्पना ही जरी कितीही रम्य वाटत असली तरीसुद्धा 'स्वतंत्रता को सार्थक करने, शक्ति का आधार चाहिये' हे अतिशय महत्त्वाचे व लक्षात ठेवण्यासारखे आहे.

१५ ऑगस्ट १९४७ या दिवशी आपला देश स्वतंत्र झाला. ज्यावेळेस देश स्वतंत्र झाला त्यावेळेला भारताचे विभाजन होऊन तो खंडितही झाला व भारत मातेच्या अंगभंगातून पाकिस्तान नावाचे इस्लामी राष्ट्र जन्माला आले. पाकिस्तानातून भारतात येणाऱ्या हजारो लोकांना आपल्या अंगावरच्या वस्त्रानिशी, अत्यंत दीन, असहाय अवस्थेमध्ये आपल्या मुलाबाळांसह भारतामध्ये आश्रय घ्यावा लागला. त्यांना शरणार्थींचे जीवन जगावे लागले. पाकिस्तानातून भारतात येताना त्यांच्यावर अनन्वित अत्याचार झाले. महिलांवरील अत्याचाराची तर परिसीमा गाठली गेली. हजारो हिंदूंना ते केवळ हिंदू आहेत म्हणून ठार मारण्यात आले. मानवतेच्या इतिहासातील सगळ्यात मोठा भयंकर नरसंहार हा भारताला स्वातंत्र्याच्या भेटीच्या रूपाने मिळाला. म्हणजे स्वातंत्र्यासाठी एवढी मोठी किंमत आमच्या लाखो बांधवांनी दिलेली आहे. त्यामुळे १४ ऑगस्ट या दिवसाचे अखंड भारत दिवस म्हणून सुद्धा स्मरण केले पाहिजे.

खंडित का होईना भारताला स्वातंत्र्य मिळाले म्हणून अनेक क्रांतिकारक आनंदाने वेडे झाले. लोकांनी स्वातंत्र्याबद्दल आनंदाने मिठाई वाटली. परंतु ज्यांच्या बलिदानावर हे स्वातंत्र्य उभे राहिले होते असे अनेक ज्ञात आणि अज्ञात देशभक्त होते. त्यांनी त्यांच्या वर्तमानाला भारताच्या भविष्यासाठी छळ, यातना, तुरुंगवास, उपेक्षा यामध्ये गाडून टाकले होते.

१५ ऑगस्ट १९४७ ला भारतामध्ये आनंदोत्सव सुरू झाला. आजही आपण १५ ऑगस्टला स्वातंत्र्य दिनानिमित्त आपला आनंद साजरा करतो. परंतु याचाही विचार केला पाहिजे की केवळ आचंद्र सूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे असे म्हणून भारताचे स्वातंत्र्य आचंद्र सूर्य कायम राहणार नाही. तर या स्वातंत्र्याला त्यागाची, बलिदानाची भक्कम पाठराखण हवी असते. त्यासाठी तशा समाजाची आवश्यकता असते. असा समाज एकाएकी तयार होत नसतो. तर त्याला देशभक्तीच्या भावनेने अभिमंत्रित



करण्याचे साधन लागते. १९२५ साली पूजनीय डॉक्टर हेडगेवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. त्यांचा उद्देश हिंदू समाजाचे संघटन व भारताचे स्वातंत्र्य हा होता. आज भारत स्वतंत्र आहे.

परंतु १९९१ मध्ये दत्तोपंत ठेंगडी म्हणाले होते की, १९४७ मध्ये आम्ही स्वतंत्र झालो परंतु आता आम्हाला आर्थिक स्वातंत्र्याची लढाई लढावी लागणार आहे. भारताने उदारीकरणाचा मार्ग स्वीकारला. जगाच्या विविध देशांमधून भारतामध्ये त्यांच्या वस्तू येऊ लागल्या. त्यांच्या चकचकीत आणि स्वस्त वस्तूंना भुललेला समाज आपले करोडो रुपये विदेशात पाठवू लागला. इंग्रज सुद्धा भारतातून कच्चा माल घेऊन जात होते आणि पक्का माल भारतात आणून विकत होते. हा भारताच्या आर्थिक गुलामगिरीचा मार्ग आहे. यासाठी जनतेमध्ये नेहमीच स्वदेशीसाठी जनजागरण करीत राहण्याची आवश्यकता आहे. आपल्या माननीय पंतप्रधानांनी 'व्होकल फॉर लोकल' हा संदेश दिलेला आहे. तोही आम्ही लक्षात ठेवणे गरजेचे आहे.

सध्या सर्वत्र अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जगभरातील ९० देशांवर लादलेल्या अतिरिक्त कराची चर्चा होत आहे. भारतावर सुद्धा त्यांनी ५० टक्के अतिरिक्त कर आकारलेला आहे. आपल्याला माहीत आहे की, अफगाणिस्तानातील तालिबान या दहशतवादी संघटनेला उभा करणारा अमेरिकाच आहे, तर पाकिस्तानला दहशतवाद्यांचे आश्रयस्थान बनविणारा सुद्धा अमेरिकाच आहे. भारताचा प्रभाव नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामध्ये सर्व जगभर पडत आहे. वास्तविक पाहता अमेरिका भारताला करामध्ये सूट देऊ शकला असता तरीसुद्धा ट्रम्प यांच्या हट्टापायी त्यांनी तसे केले नाही. जगातील अनेक देशांनी ट्रम्प यांच्याकडे आमच्यावरील कर कमी करण्यात यावा अशी याचना केली. परंतु भारताने तशी मागणी केलेली नाही. भारताची युरोपियन युनियनमधील २७ देशांसोबत चर्चा सुरू आहे. मागील अकरा वर्षांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जगभरातील विविध छोट्या मोठ्या देशांचा प्रवास केला व त्यांना भारतीय वस्तूंकरिता बाजारपेठ म्हणून तयार केलेले आहे. त्यामुळे अमेरिकेच्या भारतीय वस्तूंवरील अधिक कर आकारण्याच्या या निर्णयामुळे भारताला व्यापारातील नवीन मित्र तयार करण्याची संधी लाभलेली आहे. भारत सध्या तरी तरुणांचा देश आहे. जगाला आम्ही वस्तू आणि सेवा दोन्ही पुरवू शकतो. जगासाठी औषध, खाद्यान्न, वैद्यकीय सेवा तसेच जगातील मोठमोठ्या कंपन्यांसाठी भारतीय भूमी ही एक चांगले उत्पादन क्षेत्र ठरू शकते. येणाऱ्या काळामध्ये भारत हा एक मोठी अर्थव्यवस्था म्हणून जगामध्ये उदयास येणारच आहे. परंतु त्यासाठी जनतेने सुद्धा विदेशी मालांवर आपले जीवन अवलंबून राहू नये याचा निश्चय करणे आवश्यक आहे. जेवढे तुम्ही विदेशी वस्तूंवर अवलंबून राहाल तितके संधी येताच तुमचे हात पिळायला ट्रम्पसारखे लोक कमी करणार नाहीत. स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने स्वदेशीचा संकल्प समाजाने घेण्याची आवश्यकता आहे.

नुकतेच ऑपरेशन सिंदूर झाले. त्या निमित्ताने संपूर्ण जगाला भारताची संरक्षण क्षमता दिसून आली. परंतु ही संरक्षण क्षमता एका दिवसात निर्माण करता येत नाही. मागील अकरा वर्षांपासून मोदी सरकार देशाला संरक्षणदृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी कधी एस ४०० ही क्षेपणास्त्र विरोधी प्रणाली विकत घेत होते तर कधी राफेलसारखी अत्याधुनिक विमाने विकत घेत होते, कधी अग्निवीरसारखी योजना आणली गेली. ज्यामुळे देशाच्या तरुण रक्ताला काही काळ का होईना परंतु सैन्यामध्ये देशसेवा करण्याची संधी मिळावी. हे सर्व सरकारचे प्रयत्न होते. परंतु जनता सुद्धा या प्रयत्नामध्ये सहभागी झाली पाहिजे. समाजातल्या रूढी आणि कुरीती यांना बाहेरचा रस्ता दाखवत आता आधुनिक भारत हा एकसंध भारत आहे हे दाखवून देण्याची आवश्यकता आहे. जुन्या गोष्टी, कटू आठवणी आता बाजूला सारण्याची आवश्यकता आहे. जे होऊन गेले तो इतिहास आहे. आम्हाला नवीन भविष्य घडवायचे आहे. नवीन भारत घडवायचा आहे.

'येथे नसो निराशा थोड्या पराभवाने, पार्थास बोध केला येथेच माधवाने, हा देश स्तन्य प्याला, गीताख्य अमृताचे, आचंद्र सूर्य नांदो, स्वातंत्र्य भारताचे' हा संदेश लक्षात ठेवण्याची आवश्यकता आहे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

### प्रथा आणि व्यथा

काळाप्रमाणे काही प्रथांमध्ये आजच्या काळात बदल घडविण्याची नक्कीच वेळ आली आहे. गौरी-गणपती असोत की अन्य सण पूर्वीच्या प्रथा आजच्या काळात जमवायच्या म्हणजे मनुष्यबळ आणि कुळाचारातील प्रथांचे मार्गदर्शन करणारी मंडळी फारशी उपलब्ध आणि प्रबळ राहिलेली नाहीत. अन्न जास्त झाले तर ते वाया जाते, अनेक भाज्या, अनेक पदार्थ स्वतः न शिकल्यामुळे पडेल त्या किमतीत घ्यावे लागतात; घरच्यासारखी चव नसली तरी. अन्न हे पूर्णब्रह्म आहे हा संतांचा मंत्र आचरणात का आणला जात नाही? देव भक्तीचा भुकेला आहे केवळ आपल्याला सर्व मिळावे म्हणून भगवंताच्या नावाने ते उपलब्ध करून त्याचा विनियोग केला जात नाही हेच मोठे दुःख आहे. सणासुदीला अपेक्षित गप्पागोष्टींची मात्र रेलचेल बघायला मिळते. राग, अहंकार सोडून घालीन लोटांगण करण्यातच हित असते हे विसरता कामा नये. जे जे मनी वसे ते ते प्राप्त झाले तर जीवनाची गंमत आणि देवाची किंमत समजलीच नसती. आनंदाचा क्षण हाच मुहूर्त समजणे आणि ग्राह्य ठरविणे क्रमप्राप्त होते आहे. गर्वाचा आणि रागाचा त्याग करून दुःख दूर करता येते हा सिद्धांत आम्ही कधी समजून घेणार? लोभ आणि अभिलाषेच्या जाळ्यात अडकून सुख मिळत नाही हे वास्तव तितकेच सत्य आहे. चारित्र्याच्या प्रशंसेने जीवन सफल होते परंतु त्यासाठी अविरत प्रयत्न करायला हवेत. आणि म्हणूनच प्रथा सांभाळताना व्यथित न होता त्यांचे संगोपन करा.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

### दत्तावतार परमपूज्य वासुदेवानंद सरस्वती महाराज

वासुदेवानंद टेंबे स्वामी यांचा जन्म माणगाव या गावी झाला. वेदशास्त्र संपन्न हरी भटजी यांचे चिरंजीव गणेश भट व त्यांच्या पत्नी रमाबाई हे दाम्पत्य माणगावी राहत असत. गणेश भट हे गाणगापूरला त्यांचे आराध्य दैवत श्री गुरुदत्त यांची सेवा बारा वर्ष करत असताना एका शुभ दिनी त्यांना दत्ताचा साक्षात्कार झाला की आम्ही तुमच्या माणगावच्या घरी पुत्ररूपाने जन्मास येऊ. श्रावण कृष्ण पंचमी इ. स. १८५४ साली

## वाचक पत्रे

वासुदेवांचा जन्म जगाच्या उद्धारासाठी झाला. वडिलोपार्जित दत्त भक्तीचा वारसा वासुदेवानंदांकडे आला. माणगाव पावन क्षेत्र झाले. त्यांचे उपनयन आठव्या वर्षी होताच वेदशास्त्र संपन्न हरी भटजी आजोबाकडून त्यांनी वेदांचा अभ्यास, ज्योतिष शास्त्र, संस्कृतचे पठन केले. त्यांच्यावर दत्तकृपा असल्यामुळे दत्ताचे नामस्मरण सतत घेत. त्यांनी उज्जैन या पुण्यपावन स्थळी नारायणा नंद सरस्वतीकडून संन्यास दीक्षा घेतली. त्यानंतर वासुदेवानंद सरस्वती या नावाने ओळख होताच दत्तावतार म्हणून त्यांची ख्याती वाढली. त्यांनी चातुर्मासात अनेक स्थळी जाऊन दत्त मंदिरे निर्माण केली. त्यांचा २३ वा चातुर्मास गरुडेश्वरला झाला. स्वामींची नर्मदा मातेवर अपार श्रद्धा होती. मातेने कुमारिकेच्या रूपात अनेक वेळा त्यांना दर्शन दिले होते. त्यांच्या पदस्पर्शाने पद्मावती पवनी हे क्षेत्र पावन करून दत्त मंदिर उभारले. स्वामींनी जगाच्या कल्याणासाठी स्तोत्र, मंत्र, दत्त माहात्म्य अशी असंख्य स्तोत्रे, ग्रंथ लिहिले. आजही भक्तांना त्यांचा अनुभव येतो. आपण सर्व अंतर्मन शुद्ध करून गुरु दत्ताची प्रार्थना करूया. हे श्री गुरुदत्ता, आम्ही तुझे बालक आहोत. आमच्याकडून तुझे नामस्मरण कमी होत असेल तर भक्ती वाढवण्याचा आम्ही प्रयत्न करतो. मन एकाग्र स्थिर होण्यासाठी तुझ्या चरणी त्रिवार नमन. आमचे अंतःकरण शुद्ध होण्यासाठी तुझी कृपादृष्टी सदैव आम्हावर असू दे. या १३ तारखेला श्रावण कृष्ण पंचमी म्हणजे त्यांची जयंती आहे. त्यादिवशी प्रार्थना करून पुष्पांजली वाहून स्वामींच्या चरणी कृतज्ञता व्यक्त करूया.

**पल्लवी देशपांडे**/दुर्ग (छत्तीसगड)

### राष्ट्रध्वजाचा सन्मान : प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य

राष्ट्रध्वज हा आपल्या देशाच्या अस्मितेचे, अभिमानाचे आणि स्वाभिमानाचे प्रतीक आहे. १५ ऑगस्टला संपूर्ण देशभरात अत्यंत गौरवाने आणि अभिमानाने राष्ट्रध्वज फडकवला जातो. शूर स्वातंत्र्यसैनिकांच्या त्याग आणि बलिदानाचे स्मरण केले जाते. मात्र, दुर्दैवाची बाब अशी की, अनेक वेळा या दिवशीच राष्ट्रध्वजाचा अपमान होताना दिसतो. बाजारात सहज मिळणारे प्लॅस्टिकचे छोटे झेंडे रस्त्याच्या कडेला, कचऱ्यात किंवा पायाखाली तुडवलेले आढळून येतात. काही वेळा नृत्य, नाटक किंवा इतर कार्यक्रमांमध्ये राष्ट्रध्वजाचा अयोग्य वापर होतो. केकवर राष्ट्रध्वजाचे चित्र कापणे, चेहऱ्यावर राष्ट्रध्वजाचे चित्र रंगवणे, हा देखील त्याचा अपमान आहे. तसेच स्वातंत्र्य सैनिकांनी, क्रांतिकारकांनी केलेल्या बलिदानाचा देखील अपमान आहे. तिरंग्याचा सन्मान राखणे ही प्रत्येक भारतीयाची जबाबदारी आहे. तसेच सीमेवर तैनात असलेले सैनिक अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत देशाचे रक्षण करतात. त्यांच्या त्यागामुळे आपण सुरक्षित आहोत, याचे भान प्रत्येक भारतीयाने ठेवले पाहिजे. राष्ट्रध्वज म्हणजे राष्ट्राचा आत्मा. त्याचा सन्मान राखणे, त्याचा अपमान टाळणे आणि इतरांनाही याची जाणीव करून देणे हीच खरी देशभक्ती आहे.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### देवनंदीजी महाराज जयंतीनिमित्त वक्तृत्व पाठांतर व स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद

**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

सन्मती ज्ञान प्रसारक मंडळ व प्रज्ञाश्रमण दिगंबर जैन जनकल्याण प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने प्रज्ञाश्रमण सारस्वताचार्य १०८ श्री देवनंदीजी महाराजांच्या जन्मजयंती निमित्त पाठांतर व वक्तृत्व स्पर्धा न. फू .शहा कोठारी हायस्कूलमध्ये संपन्न झाल्या. कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून संस्थेचे विश्वस्त बाहूबली उपाध्ये, संस्थेचे विश्वस्त देवेंद्र शटगार तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापिका शिल्पा डोळस, ममता डोळस, मुख्याध्यापक रमेश यादवाड, मुख्याध्यापिका श्रीमती अनिता हाडोळे,मुख्याध्यापिका दर्शना उपाध्ये, मुख्याध्यापिका प्रतिभा शिरसाड उपस्थित होते. सोलापूर शहरातील ४८० स्पर्धक सहभाग घेतले होते. या स्पर्धा सात गटात घेण्यात आले होते. स्पर्धेनंतर लगेच मान्यवरांच्या शुभहस्ते बक्षीस वितरण समारंभ संपन्न झाला. या स्पर्धेत प्रत्येक गटातून अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय, उत्तेजनार्थ मिळविलेल्या यशस्वी स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र, मेडल व रोख बक्षीस देऊन गौरविण्यात आले. या प्रत्येक गटातील सनिधी हत्तुरे, संकुल अनुराधा, अक्षता करवीर, दुर्गा सूर्यवंशी, पुष्पांजली बेलपवार या स्पर्धकांना प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळविले आहे. सूत्रसंचालन पी.एस. उपाध्ये, ए. एस. समाने यांनी तर आभार आर. आर. मेहता, एस. एम. बगले यांनी मानले.



### आधार वृद्धाश्रमात राखी पौर्णिमा साजरी

**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

भोगाव हद्दीमध्ये असलेल्या आधार केअर सेंटर वृद्धाश्रम मध्ये राखी पौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. या वृद्धाश्रमामध्ये एकूण ७० जेष्ठ नागरिक आहेत. या ज्येष्ठ नागरिकांना सुनिता किणगी व सीता बनसोडे या कर्मचारी महिलांनी राखी बांधून औक्षण केले. वृद्धाश्रमाच्या माध्यमातून या सर्व सण उत्सवाचे आयोजन करून वर्धांच्या चेहऱ्यावर आनंद आणण्याचा प्रयत्न केला जात जातो असे मत आधार केअर सेंटरचे डॉक्टर प्रतीक शिवगुंडे यांनी व्यक्त केले.

> वृद्धाश्रमामध्ये जरी असलो तरी इथले सदस्य आम्ही एकमेकांचे नातेवाईक असल्यासारखे एकमेकांच्या सुखदुःखामध्ये सहभागी होतो. कारण आम्हीच आम्हाला इथे आधार आहोत . कोणी आजारी असेल तर त्याची काळजी पण आम्हीच घेतो. एकमेकाला आधार देत आनंदी सहजीवन जगत आहोत.
>
> **- देशपांडे - एक वृद्ध.**



### रोटरी नॉर्थ राधाकिशन फोमरा मूकबधिर विद्यालयात रक्षाबंधन

**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

रोटरी नॉर्थ राधाकिशन फोमरा मूकबधिर विद्यालयात रक्षाबंधनाचा पवित्र सण साजरा करण्यात आला. कृष्णा फाउंडेशनतर्फे कुमारी युक्ता माखिजा आणि डॉक्टर जानवी माखिजा यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना राख्या बांधल्या. मुख्याध्यापिका क्षितिजा गाताडे यांनी रक्षाबंधनाच्या आणि यशासाठी शुभेच्छा दिल्या. डॉक्टर जानवी माखिजा यांनी सांगितले की, राखी हे केवळ धाग्याचे प्रतीक नसून ती आपुलकी, संरक्षण आणि विश्वासाचे प्रतीक आहे. आपल्याला ही भावना जीवनभर जपावी लागते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे सर्व शिक्षक, शिक्षिका आणि रोटरी क्लबचे सदस्य आसावरी सराफ यांनी परिश्रम घेतले. याप्रसंगी अध्यक्ष संतोष सपकाळ, शाळेचे सचिव सुनील दावडा, खजिनदार राजगोपाल झंवर, दीपक आर्वे यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी आनंद पारेकर, विठ्ठल सातपुते, अजित पाटील, रेणुका पासपुले, विजया पिटाळकर, संध्या चंदनशिवे, योगिता बोधले, ठाकर उपस्थित होते. आभार क्षितिजा गाताडे यांनी मानले.



### जेष्ठ पुरोहित जयंत फडके यांचा सत्कार

**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

सारस्वत ब्राह्मण कार्यालयात जेष्ठ पुरोहित जयंत फडके यांचा सत्कार करण्यात आला गेली ५५ वर्षे सोलापुरात पुरोहित म्हणून त्यांनी काम पाहिले ऋग्वेद रूचि आणि पध्दतीचे अभ्यासु पुरोहित म्हणून त्यांनी नाव लौकिक मिळवला ब्राह्मण सेवा संघाचे ते संचालक होते त्यांनी शहरातील समाज बांधवांसाठी त्या ठिकाणी निरनिराळे उपक्रम केले अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ महाराष्ट्र प्रदेश पुरोहित आघाडीचे ते अध्यक्ष म्हणून ही जवाबदारी सांभाळली. या पुढील काळात ते पुण्यात वास्तव्य करणारे असून सोलापुरात निरोप या साठी हा त्यांचा सत्कार करण्यात आला मोहनराव दाते यांनी ही माहिती सांगितली व विजय जोशी व प्रमोद तम्मनवार यांचे हस्ते हा सत्कार करण्यात आला.

# 'इंट्याक'च्या वारसा फेरीतून उलगडले हातमागाचे गुपित

■ राष्ट्रीय हातमाग दिनानिमित्त आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

राष्ट्रीय हातमाग दिननिमित्त इंटयाक सोलापूरतर्फे काढण्यात आलेल्या वारसा फेरीमुळे अनेकांना हातमागाद्वारे वस्त्रनिर्मिती बाबतचे गुपित उलगडून पाहता आले. राष्ट्रीय हातमाग दिनानिमित्त या वारसा फेरीचे रविवारी आयोजन करण्यात आले होते.



सोलापूर शहरात अजूनही सुस्थितीत असलेल्या हातमाग केंद्रद्वारे वस्त्र निर्मितीची उज्वल परंपरा अद्यापही उत्तम चालू स्थितीत असलेल्या अश्या हातमाग केंद्रास भेट देऊन वारसा फेरीचे आयोजन करण्यात आले. इंटयाक सोलापूर विभागातर्फे एकूणच ऐतिहासिक वारसा जतन व संवर्धन याचे कार्य करीत असतानाच या मालिकेमधील ही हातमाग केंद्र भेट - वारसा फेरी या माध्यमातून हातमागाद्वारे विविध प्रकारची वस्त्र निर्मितीची शास्त्रोक्त व तांत्रिक माहिती घेण्यात आली.

सुमारे अडीच तास चाललेल्या या वारसा फेरीमध्ये, त्याचा असलेला इतिहास, सद्यस्थिती वस्त्र निर्मितीमधील बदलते स्वरूप, रासायनिक अंगाने असणारे रंग, सूत प्रकार, प्रक्रिया इत्यादीतील बदल व त्याचबरोबर विविध कौशल्याद्वारे होणारी वस्त्र निर्मिती इत्यादी बाबत सखोल माहिती या हातमाग केंद्र उद्योजकांमार्फत देण्यात आली. सकाळी सुरू झालेली ही वारसा फेरी पूर्व भागातील विविध केंद्र भेट देताना या नागनाथ मादगुंडी, श्रीनिवास अनंतुलु, सुदर्शन अनंतुलु, राजेशाम सादुल या उद्योजकांनी त्यांच्या स्वतःच्या हातमाग केंद्र व वस्त्र निर्मिती उद्योग संदर्भात माहिती दिली.

यामध्ये उपस्थितांनी विविध वस्त्र निर्मिती जसे की सोलापुरी साडी, नऊवारी साडी, सिल्क साडी, विविध सुंदर प्रकारचे वॉल हैंगिंग, पंचा इत्यादी बाबत माहिती जाणून घेतली. आपल्या सोलापूर संस्कृतीतील एक अविभाज्य घटक म्हणून या वारसा फेरीस मोठ्या संख्येने इतिहासप्रेमी, सोलापूरकर उपस्थित होते. याचे समन्वयन इंटयाक सदस्य वस्त्र उद्योजक गोवर्धन चाटला यांनी केले, तर नियोजन सहसमन्वयक आर्किटेक श्वेता कोठावळे, समन्वयक प्रा. नरेंद्र काटीकर यांनी केले.

यावेळी ज्येष्ठ वास्तुविशारद डॉ. सिमंतिनी चाफळकर, प्रा. भीमगोंडा पाटील, प्राचार्य अनिता ढोबळे, प्राचार्य रूपाली धामणे, श्रीरंग रेगोटी, इतिहास तज्ञ नितीन अनवेकर, महाराष्ट्र राज्य एसटी डेपोचे अधिकारी शितल बिराजदार यासह अनेक इंटयाक सदस्य, सोलापूरकर इतिहास प्रेमी उपस्थित होते.



## परभणी जिल्हा प्रशासनाच्या वतीने गायक मोहम्मद अयाज यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

नुकतेच महसूल दिनानिमित्त परभणी जिल्हा प्रशासन आयोजित कार्यक्रमात सोलापुरचे सुपुत्र व महाराष्ट्राचे महागायक विजेते म हेम्मद अयाज यांचा सूर- सरगम हा सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला. मोहम्मद अयाज यांचा सत्कार करण्यात आला.

जिल्हाअधिकारी रघुनाथ गावडे व महापालिका आयुक्त धैर्यशील जाधव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी परभणीचे अप्पर जिलाधिकारी मा प्रताप काळे, निवासी उप जिलाधिकारी श्रीमती अनुराधा ढालकरी, उप जिलाधिकारी जिवराज धापकर सह परभणी जिल्हा प्रशासनचे सर्व अधिकारी वर्ग उपस्थित होते.

## समाजसेवा मंडळाची निवडणूक घेण्याची मागणी

**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळ या शैक्षणिक संस्थेच्या विश्वस्त मंडळाची मुदत नोव्हेंबर २०२४ मध्ये संपली असताना सुद्धा विश्वस्त मंडळ बेकायदेशीरपणे कामकाज करीत आहे. निवडणूक घेणे गरजेचे असताना स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी विश्वस्त निवडणूक घेत नाहीत. संस्थेत अनेक बेकायदेशीर शिक्षक व कर्मचारी नियुक्त केले जात आहेत. म्हणून नियमबाह्य कामकाज करणाऱ्या संस्था पदाधिकार्यांचे निवडणूक घेऊन बेकायदेशीरपणे कार्य करणाऱ्या विश्वस्त मंडळावर कारवाई करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्त्या सोनाली सुपेकर यांनी धर्मदाय आयुक्तांकडे केली आहे.

## रेशन दुकानांची ८० टक्के ई-केवायसी पूर्ण

■ २० टक्के ग्राहकांना माल मिळणे कठीण

■ जिल्हा पुरवठा अधिकारी सरडे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

शहर-जिल्ह्यातील रेशन दुकानांतून रेशन ग्राहकांच्या ई-केवायसी पूर्ततेचे काम एप्रिल पासून सुरू झाले होते. वारंवार आवाहने करून आणि शासनस्तरावरून ३-४ वेळा मुदतवाढ देवूनही जिल्ह्यातील जवळपास २० टक्के ग्राहकांची ई-केवायसी अपूर्णच राहिल्याने त्यांना आता धान्य मिळणे कठीण असल्याची भीती जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी व्यक्त केली आहे.



दरम्यान, या प्रलंबित ग्राहकांच्या ई-केवायसीसाठी आम्हीच नाहीतर रेशन दुकानदारही पाठीमागे लागून अक्षरशः कंटाळल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

शिधापत्रिकाधारकांची ईकेवायसी पूर्ण होवून सर्वांना धान्य मिळावे या उद्देशाने आम्ही आम च्या दुकानदारांना दोन महिन्यापूर्वी नोटिसा पाठवून गतीने ईकेवायसी करण्याचा प्रयत्न केला होता. तरीही अनेक शिधापत्रिकाधारकांनी दुकानदारांना सहकार्य केले नाही. तशी तर शासनस्तरावरुन ३१ मार्चपर्यंतच ईकेवायसी पूर्ण करण्याची मुदत होती. यानंतर ३० एप्रिल आणि ३१ मे, ३१ जून आणि ३० ऑगस्टपर्यंत अशी शासनाकडून ईकेवायसी मुदतवाढ दिली होती. तरीही काही ग्राहकांनी ईकेवायसीकडे पाठ फिरविली आहे. ऑगस्टनंतर या ग्राहकांना ईकेवायसी करायची म्हटले तरी ते आमच्या हाती राहणार नाही. सर्वोच्च न्यायालय आणि केंद्र सरकारने राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेतील सर्व लाभार्थ्यांची ई-केवायसी पडताळणी करण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्यानुसार हे काम चालले. यामुळे ऑगस्टनंतर यासाठी मुदतवाढ द्यायचा निर्णय केंद्राकडेच आहे. यामुळे ज्यांनी राशन धान्य मिळण्यासाठीची ई-केवायसी केली नसेल त्यांनी ताबडतोब ई-केवायसी करून घ्यावी, असेही आवाहन सरडे यांनी केले आहे.

# 'तंबाखू व्यसनमुक्ती'चा अनोखा राखी उपक्रम

■ जिल्हा आपत्ती विभागाचा सामाजिक बांधिलकीचा संदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

सोलापूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या वतीने महाराष्ट्र एज्युकेशन हॉटेल मॅनेजमेंट महाविद्यालयात सुरू असलेल्या जिल्हास्तरीय आपदा मित्र प्रशिक्षणात सामाजिक बांधिलकीचा अनोखा संदेश देणारा उपक्रम राबविण्यात आला. एक राखी तंबाखू व्यसनमुक्तीची या नावाने घेण्यात आलेल्या कार्यक्रमात रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर व्यसनमुक्ततेचा संदेश देण्यात आला.



> **प्रशासनाचा दृष्टिकोन**
>
> आपत्तीच्या कालावधीमध्ये व्यसनमुक्त राहणं अत्यंत गरजेचं आहे. बचाव कार्य करताना सामाजिक बांधिलकी जपण्याची संधी मिळते, ती जपली पाहिजे.
>
> **- शक्तीसागर ढोले, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी**

> **तंबाखू व्यसनमुक्तीचा स्तुत्य उपक्रम**
>
> एक राखी तंबाखू व्यसनमुक्तीचा हा उपक्रम खूप छान वाटला. वेगळ्या प्रकारचा रक्षाबंधन साजरा झाला. मी स्वतः व्यसनमुक्त राहिन आणि इतरांनाही व्यसनमुक्त राहण्यास प्रेरित करीन.
>
> **- सुरज कांबळे, प्रशिक्षणार्थी आपदा मित्र**

या उपक्रमात सारथी युथ फाउंडेशनच्या सहकार्याने प्रशिक्षणार्थींना तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांच्या व्यसनामुळे निर्माण होणाऱ्या आपत्तीजनक परिस्थितीची जाणीव करून देण्यात आली. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात व्यसनांपासून दूर राहण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. कार्यक्रमात सारथी युथ फाउंडेशनचे सचिव रामचंद्र वाघमारे यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करताना सांगितले की, आपत्तीच्या काळात व्यसन करणाऱ्या व्यक्तींना सुरक्षित ठेवण्यासाठी विशेष उपाययोजना आवश्यक असतात. व्यसनमुक्त राहून आपत्ती टाळता येते, हे प्रत्येकाने समजून घेतले पाहिजे.

रक्षाबंधनाच्या अनुषंगाने कामगार वसाहतीतील युवतींनी स्वतः तयार केलेल्या राख्या प्रशिक्षणार्थींना बांधल्या. राखी बांधताना त्यांनी आपण तंबाखू किंवा तंबाखूजन्य पदार्थांचे व्यसन करू नये आणि इतरांनाही करू देऊ नये अशी ओवाळणी मागितली. या अनोख्या उपक्रमाने प्रशिक्षणाला सामाजिक संवेदनशीलतेची जोड मिळाली. कार्यक्रमात प्रशिक्षक प्रदिप ऐनापुरे, सारथी युथ फाउंडेशनचे कोअर कमिटी सदस्य प्रसाद अतनुरकर उपस्थित होते.



## करिअर पॉईंट प्लेसमेंट सर्व्हिसेसतर्फे १३ हजार गरजूंना विनामोबदला नोकऱ्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

करिअर पॉईंट प्लेसमेंट सर्विसेसच्या वतीने गेल्या १६ वर्षांच्या वाटचालीत तेरा हजार पाचशे गरजूना विनामोबदला नोकऱ्या उपलब्ध करून दिल्या आहेत. लवकरच परदेशातही नोकरी उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न राहील, असे करिअर पॉईंट प्लेसमेंट सर्व्हिसेसचे प्रमुख रमेश वायचळ यांनी सांगितले.

संस्थेचा १६ वा वर्धापन दिन हॉटेल बालाजी सरोवर येथे साजरा झाला. माजी आ. राजन पाटील यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी संस्थेतील गुणवंत कर्मचाऱ्यांचा सत्कार त्यांच्या हस्ते करण्यात आला. सूत्रसंचालन सुरज वर्मा यांनी केले. यावेळी उमाकांत येलका, म हेसीन शेख, करिष्मा सैफन, परवीन मुल्ला, रोझिना सैय्यद, अमृता साळुंके, अभिषेक गंगारेड्डी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अनिकेत दादास, हरीश पवार, सचिन नादरगी, राकेश चितारे व साक्षी वायचळ यांनी परिश्रम घेतले.

# मनोज जरांगे-पाटलांनी केले जाधव कुटुंबियांचे सांत्वन



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

मराठा आरक्षणासाठी संघर्षाची हाक देणाऱ्या मनोज जरांगे-पाटील बुधवारी ज्येष्ठ मराठा समन्वयक आणि महापालिका परिवहन समितीचे माजी सभापती राजन जाधव यांच्या निवासस्थानी भेट देऊन जाधव कुटुंबीयांचे सांत्वन केले

जाधव यांच्या मातोश्री सगुणाबाई जाधव यांचे नुकतेच निधन झाले आहे. त्यांच्या अंत्यविधीसाठी जरांगे पाटील हे उपस्थित राहू शकले नव्हते मात्र बुधवारी सोलापूर दौऱ्यात त्यांनी धरमशी लाईन येथील जाधव यांच्या घरी भेट देऊन.

सगुणाबाईंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.यावेळी त्यांनी जाधव कुटुंबातील सदस्यांशी संवाद साधत त्यांची आस्थेने विचारपूस केली

या प्रसंगी अमोल शिंदे, माऊली पवार, शेखर जाधव, विक्रांत जाधव, अक्षय जाधव, श्रीधर काळे, सचिन साळुंखे यांच्यासह जाधव कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.

# राखीतून बांधला सुरक्षा आणि विश्वासाचा अतूट धागा

■ स्वतः तयार केलेल्या बांधल्या पोलिसांना राख्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० ऑगस्ट-**

रक्षाबंधन म्हणजे भावंडांमधील प्रेमाचं, विश्वासाचं आणि संरक्षणाच्या वचनाचं प्रतीक. पण जे आपलं रक्षण करतात, त्यांचं रक्षण कोण करतं? या विचारातून साकार झाला एक अनोखा उपक्रम. लोकनेते दिनकर आबा पाटील माध्यमिक विद्यालय, कुमठे येथील विद्यार्थिनींनी तासगाव पोलीस स्टेशनमध्ये कार्यरत पोलिस बांधवांना स्वतःच्या हातांनी तयार केलेल्या प्रेमळ राख्या बांधून रक्षाबंधन साजरा केला.



हा उपक्रम शाळेचे शिक्षक पी. डी. पाटील यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आला. त्यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे आणि संस्थेचे अध्यक्ष अविनाश पाटील यांच्यामुळेच विद्यार्थिनींमध्ये ही सामाजिक जाणीव विकसित झाली. विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकातच समाज शिकू नये तर समाजाशी नातंही जपावं, हीच या उपक्रमामागची भावना होती. विद्यार्थिनींनी काही दिवसांपूर्वीच आपापल्या घरी राख्या तयार केल्या, त्यावर देशभक्ती, बंधुत्व आणि प्रेम याचे रंग भरले. या राख्यांमध्ये फॅन्सी चमक नव्हती, पण मनाचा ओलावा नक्की होता. यातील काही राख्या सीमेवरील तैनात असणाऱ्या जवानांना पाठवल्या. तासगाव पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक दीपक पाटील यांनी विद्यार्थिनींची मनमोकळा संवाद साधला. यावेळी तासगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सोमनाथ वाघ, पोलीस उपनिरीक्षक दीपक पाटील व सर्व स्टाफ, चिंचणी हायस्कूलचे एस.आर.जाधव, रोटरी क्लबचे अध्यक्ष तानाजीराव पाटील, कुमठेचे दशरथ पाटील उपस्थित होते.

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डि. व सब डि. सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर शहर महानगर पालिकेच्या हद्दवाढ भागातील मौजे शेळगी येथील गट नं. ६९/२ याचे एकुण क्षेत्र ५ हेक्टर ५२ आर मधील पंकज विहार नगर या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या नगरातील प्लॉट नं. १९६ याचे क्षेत्र २१२.५० चौ. मीटर इतके आहे.

**यासी चतुःसीमा :- पुर्वेस :-६ मिटर रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नं. १९०, दक्षिणेस :-प्लॉट नं. १९७, उत्तरेस :- ७.५० मीटरचा रस्ता.**

येणेप्रमाणे चतुःसीमेतील खुली प्लॉट जागा त्यातील तदंगभुत वस्तूंसह, मालकी व कब्जेवहिवाटीचे हक्कासह.

ही प्लॉट जागा १. दिलीप जिवबा नारायणकर, २. प्रमोद दिलीप नारायणकर, ३. रोहित दिलीप नारायणकर, ४. प्रयेश दिलीप नारायणकर, सर्व रा. बी-५२, मंत्री चंडक नगर, भवानी पेठ, सोलापूर, यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची आहे, त्यांनी आमचे अशिलास ही प्लॉट जागा कायम खुष खरेदीने देण्याचे ठरवून इसारा पावती व करारपत्र लिहून दिला आहे, त्यांनी ही प्लॉट जागा निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याची खात्री दिली आहे, तरीही या प्लॉट जागेवर कोणाचाही, कोणताही, कसलाही गहाण, दान, बक्षिस, इसारा पावती, साठेखत, खरेदीखत, वारसा, पोटगी, टाच, बोजा, जप्ती, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क, हितसंबंध वा वाद असल्यास, त्यांनी खालील नमूद पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून आठ दिवसांचे आत लेखी कळवावे. मुदतीत कोणाचेही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणताही, कसल्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध नसल्याचे समजून अथवा त्यांनी तो जाणीवपुर्वक स्वेच्छेने सोडून दिला असे समजून आमचे अशिल ठरल्यानुसार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही, कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे.

दि.१०/०८/२०२५

**सही/-**
**अशिलातर्फे**
**ॲड. राजरतन द. श्रीराम**
**ऑ. १६२१/१/१, कुचन नगर, सोलापूर-५**
**मो.नं. ९८८१२४०५१६**




**चला आयुष्य वाढवूया, फिटनेसकडे वळूया**

**भाग - २३**

## हिल रिपेटिशन रन म्हणजे काय?

हिल रिपेटिशन रन म्हणजे छोट्या चढावर (हिल) वेगाने चढाई करणे आणि नंतर आरामात खाली येणे, असा सराव परत-परत करणे. या प्रकाराला हिल रिपीट्स देखील म्हणतात. हा धावण्याचा एक प्रकार आहे जो ताकद, सहनशक्ती आणि धावण्यातील तांत्रिक गुणवत्ता सुधारण्यासाठी केला जातो.

हिल रिपीट्स करताना धावपटू साधारणतः मध्यम ते तीव्र चढावर ३० सेकंद ते २ मिनिटांपर्यंत जोरात धावतो आणि नंतर सावकाश खाली येतो किंवा चालत विश्रांती घेतो. मग पुन्हा तेच राऊंड रिपीट करतो.



**हिल रिपीट्सचे फायदे**

▶▶ **स्नायूची ताकद वाढते:** विशेषतः पायांचे (क्युएड्स , कालवस , ग्लुट ) स्नायू मजबूत होतात.

▶▶ **कार्डिओ रेसिस्टन्स वाढते:** हृदय आणि फुफ्फुसांची कार्यक्षमता अधिक चांगली होते.

▶▶ **रनिंग फॉर्म सुधारतो:** चढावर धावताना शरीर नैसर्गिकरित्या सरळ राहते, पाय उचलण्याची क्षमता सुधारते.

▶▶ **स्पीड वाढतो:** चढाईमुळे पायांची स्फोटक शक्ती (एक्सपलोसिवे पॉवर ) वाढते, जी मैदानावर वेग वाढवायला मदत करते.

▶▶ **मेंटल टफनेस:** डोंगरावर धावणं मानसिक दृष्ट्याही खूप कठीण असतं, त्यामुळे जिद्द आणि चिकाटी वाढते.

**कसे करावे**

▶▶ योग्य गरम अप करणे आवश्यक आहे.

▶▶ मोजका आणि नियंत्रित प्रयत्न द्यावा (फुल्ल स्प्रिंट नाही).

▶▶ डोंगराच्या उतरणीवर आराम करावा, पण फॉर्म योग्य ठेवावा.

▶▶ ४ ते १० रिपीट्स (अनुभवावर अवलंबून) करावेत.

हिल रिपेटिशन्स केल्याने तुमची मॅरेथॉन, ५के, १0के किंवा अल्ट्रा रनिंगमधील एकूणच कामगिरी बळकट होते. त्यामुळे हे धावपटूच्या प्रशिक्षणात एक महत्त्वाचा घटक मानला जातो. **(क्रमशः)**

**- अतिश शहा**
फिटनेस ट्रेनर आणि अल्ट्रा मॅराथॉनर
चॅलेंजर स्पोर्ट्स फौंडेशन, सोलापूर.
मो.९१७५८२८२०३

# रमेश बुदिहालला कांस्यपदक

**आशियाई सर्फिंग**

◆ **महाबलीपुरम्, १० ऑगस्ट**

रविवारी येथे झालेल्या आशियाई सर्फिंग स्पर्धेत खुल्या पुरुष गटात रमेश बुदिहालने ऐतिहासिक कांस्यपदक जिंकले. बुदिहाल हा आशियाई सर्फिंग स्पर्धेत पदक जिंकणारा पहिला भारतीय ठरला.

पदक फेरी गाठणारा देशातील पहिलाच खेळाडू असलेल्या बुदिहालने १२.६० गुणांसह कांस्यपदक मिळवले. कोरियाच्या कानोआ हीजाएने १५.१७ गुणांसह सुवर्णपदक जिंकले, तर इंडोनेशियाच्या पजार अरियाना हिने १४.५७ गुणांसह रौप्यपदक जिंकले. खुल्या महिला गटात, जपानच्या अनरी मात्सुनो (१४.९० गुण) हिने सुवर्णपदक जिंकले, तिने देशबांधव सुमोमो सातो (१३.७०)हिला मागे टाकत स्पर्धा जिंकली. थायलंडच्या इसाबेल हिग्जने ११.७६ गुणांसह कांस्यपदक मिळविले.




कांस्यपदक विजेता रमेश बुदिहाल

कोरियाच्या कानोआ हीजाएने पुरुषांच्या गटात सुवर्णपदक जिंकले होते. तिने दिवस अधिक गोड केला. त्याने १८ वर्षांखालील मुलांच्या गटातही १४.३३ गुणांसह सुवर्णपदक जिंकले.

चीनच्या शिदोंग वू (१३.१०) आणि शुलो जियांग (८) या जोडीने अनुक्रमे रौप्य आणि कांस्यपदक जिंकले. मुलींच्या १८ वर्षांखालील गटात, चीनच्या सिकी यांगने १४.५० गुणांसह सुवर्णपदक जिंकले . यांगने शुहान जिनला (१०.३३) २-१ ने हरवले. कांस्यपदक थायलंडच्या इसाबेल (८.१०) हिला मिळाले. ◀(वृत्तसंस्था)

# भारताचा २० वर्षांखालील महिला फुटबॉल संघ एएफसी आशिया चषकासाठी पात्र



विजयाचा आनंद साजरा करताना भारतीय महिला फुटबॉलपटू

◆ **यांगून, १० ऑगस्ट**

रविवारी यांगूनमधील थुवुन्ना स्टेडियमवर झालेल्या गट डच्या शेवटच्या सामन्यात यजमान म्यानमारचा १-० असा पराभव करून भारताने २० वर्षांनंतर पहिल्यांदाच एएफसी २० वर्षांखालील महिला आशियाई चषक स्पर्धेसाठी पात्रता मिळवली.पूजा भारताच्या विजयाची शिल्पकार ठरली.

आक्रमक खेळाडू पूजाने २७ व्या मिनिटाला नोंदविलेला गोल भारतासाठी निर्णायक ठरला. मोठ्या संख्येने उपस्थित प्रेक्षकांसमोर विजय मिळवल्यानंतर भारताच्य युवा संघाने सात गुणांसह आपल्या ड गटात अव्वल स्थान पटकावले.

हा सामना दोन भागांचा होता, पहिला सामना भारताने वर्चस्व गाजवले, तर दुसऱ्या सामन्यात म्यानमारने खेळ नियंत्रित केला. नेहा आणि सिबानी देवी नोंगमेईकापमने तिसऱ्या मिनिटालाच एकत्र येऊन गोल केला, जेव्हा सिबानीने दुसऱ्या मिनिटाला क्रॉस मारला, जो तो मारण्यापासून केवळ इंच दूर होता.

यजमान संघाने सर्व दबाव सहन केला, परंतु त्यांनी काही प्रति-हल्ला केला व नवव्या मिनिटाला यिन लून आयनने छातीवर मारून चेंडू मारल्यानंतर फॉरवर्ड सु सु खिन जवळ आली. यजमान संघाने खेळात सहज सुरुवात केली, परंतु ३० मिनिटांच्या अंतरावर पूजाने भारताला आघाडी मिळवून दिली. पूजाने स्वतःच प्रतिहल्ला सुरू केला होता आणि नंतर उजवीकडून चेंडू मारला. तिचा चेंडू सर्व टाळता आला, परंतु विरुद्ध बाजूने असलेल्या नेहाने त्याच्या टोकावर जाऊन तो गोलजाळ्याकडे परत पाठवला. तोपर्यंत पूजाला प्रतिक्रिया देण्यासाठी पुरेसा वेळ मिळाला नव्हता आणि तिने तिच्या धडाने तो गोल रेषेवरून मारला. यामुळे भारतीय संघाची एका गोलनो स्थिती मजबूत झाली. किमान मध्यंतरापर्यंत तरी भारतीय संघाने चेंडूवर आपले नियंत्रण राखले व आघाडी कायम ठेवली. तथापि, दुसऱ्या सत्रात म्यानमारने जोरदार सुरुवात केली आणि भारताची गोलरक्षक मोनालिशा देवीने ४८ व्या मिनिटाला सु सु खिनचा फटका रोखला. मागील दोन सामन्यांमध्ये एकही गोल न स्वीकारणारी मोनालिशा १० मिनिटे शिल्लक असताना मैदानात उतरली, तेव्हा म्यानमारचा पर्यायी खेळाडू मो प्विंट फ्यूने एई थेट फ्यूने हेड केलेल्या क्रॉसला सरळ रेषेत मारला, मात्र भारताच्या गोलरक्षकाने झेप घेत गोल वाचवला. ९० व्या मिनिटाला शुभांगीने फटका मारला, परंतु गोलजाळ्यावर आदळला. अखेर पूजाने केलेला गोल भारतासाठी विजयी गोल ठरला. भारताने आपली विजयी आघाडी कायम राखली आणि दोन दशकांत प्रथमच पात्रता निश्चित केली. ◀(वृत्तसंस्था)

# ऑलिम्पियन अॅशर हॉंग यूएस जिम्नॅस्टिक्स विजेता

**न्यू ऑर्लीन्स :** अॅशर हॉंगने अमेरिकन पुरुषांच्या जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत राष्ट्रीय विजेतेपद पटकावले, हे त्याचे दुसरे राष्ट्रीय विजेतेपद ठरले. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकणाऱ्या पाच जणांच्या संघाचा भाग असलेल्या २१ वर्षीय अॅशर हॉंगने पहिल्या रोटेशन दरम्यान हाय बारवर दुर्मिळ चूक असूनही दोन दिवसांच्या स्पर्धेत एकूण १७०.०२० गुणांसह सहज विजय मिळवला. हॉंग सहजपणे अनेक राष्ट्रीय विजेतेपदे जिंकणारा १३ वा खेळाडू ठरला.



२०२३ चा विजेता गुरुवारी सहा स्थिर दिनचर्यांमुळे चारपेक्षा जास्त गुणांच्या मोठ्या आघाडीसह प्रवेश केला. हॉंगने फ्लोअर एक्सरसाइज, व्हॉल्ट आणि स्टिल रिंगजमध्ये अव्वल गुणांसह समाप्त केले. फ्रेडरिक रिचर्डने एकूण १६२.५५५ गुणांसह दुसरे, तर फझी बेनासने १६२.३१० गुणांसह तिसरे स्थान मिळविले. हॉंग, रिचर्ड, मालोन आणि नेडोरोसिक प्रयत्न करत असताना, २०२४ ऑलिम्पिक संघातील पाचवा सदस्य - पॉल जुडा याने निवृत्तीची घोषणा केली. ◀(वृत्तसंस्था)

# लढतींमध्ये मेंदूच्या दुखापतींमुळे दोन जपानी मुष्टियोद्ध्यांचा मृत्यू

◆ **टोकियो, १० ऑगस्ट**

टोकियोच्या कोराकुएन हॉलमध्ये वेगवेगळ्या लढतींमध्ये मेंदूच्या दुखापतींमुळे दोन जपानी मुष्टियोद्ध्यांचा मृत्यू झाला आहे.

२८ वर्षीय शिगेतोशी कोतारी, २ ऑगस्ट रोजी ओरिएंटल अँड पॅसिफिक मुष्टियुद्ध महासंघाच्या ज्युनियर लाइटवेट विजेत्या यामातो हाता विरुद्ध १२ फेऱ्यांची लढत पूर्ण केल्यानंतर लगेचच कोसळला.



त्याच्यावर सबड्युरल हेमेटोमासाठी- मेंदू व कवटीमध्ये रक्त साचण्याची स्थिती - तातडीची मेंदूची शस्त्रक्रिया करण्यात आली, परंतु शुक्रवारी त्याचे निधन झाले. त्याचदिवशी, योजी सैतोविरुद्धच्या नॉकआउट पराभवादरम्यान त्याच दुखापतीमुळे २८ वर्षीय हिरोमासा उराकावा याचे निधन झाले. त्यांचा जीव वाचवण्याच्या प्रयत्नात त्यांनी क्रॅनियोटॉमी केली होती. जागतिक मुष्टियुद्ध व जपानी मुष्टियुद्ध संघटनेने या दोघांच्या मृत्यूबद्दल दुःख व्यक्त केले आहे. या अविश्वसनीय कठीण काळात आम्ही कुटुंबे, मित्र आणि जपानी मुष्टियुद्ध समुदायाप्रती आमच्या मनापासून संवेदना व्यक्त करतो, असे ते म्हणाले. ◀(वृत्तसंस्था)

**आशियाई १९ वर्षांखालील मुष्टियुद्ध**

# निशा, मुस्कान, राहुलला सुवर्णपदक




सुवर्णपदक विजेता राहुल

**भारताने जिंकलीत १४ पदके**

◆ **बँकॉक, १० ऑगस्ट**

रविवारी थायलंडमधील बँकॉक येथे झालेल्या १९ वर्षांखालील आशियाई मुष्टियुद्ध अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या युवा महिला मुष्टियुद्ध खेळाडू- निशा (५४ किलो) व मुस्कानने (५७ किलो) सुवर्णपदक जिंकले व इतर पाच जणांनी रौप्यपदक जिंकले.

पुरूषांच्या अंतिम फेरीत राहुल कुंडूने (७५ किलो) भारताला आणखी एक सुवर्णपदक मिळवून दिले. राहुलने उझबेकिस्तानच्या मुहम्मदजोन याकुपबोएवेकवर विभाजित निर्णयाने विजय मिळवला. या विजयाबरोबरच भारताची पदकांची संख्या १४ वर पोहोचली, यात तीन सुवर्ण, सात रौप्य आणि चार कांस्य पदके आहेत.

याशिवाय, १९ वर्षांखालील गटातील १० महिला खेळाडूंपैकी नऊ पदके घेऊन परततील . दोन सुवर्ण, पाच रौप्य आणि दोन कांस्य पदके कझाकिस्तान, उझबेकिस्तान आणि चीन सारख्या देशांसोबत आहेत.

एकाच वेळी आयोजित होणाऱ्या १९ आणि २२ वर्षांखालील आशियाई मुष्टियुद्ध स्पर्धेत भारताच्या उदयोन्मुख स्टार खेळाडूंना आशियातील काही बलाढ्य प्रतिस्पर्ध्यांवर आपले कौशल्य आणि दृढनिश्चय दाखविण्यासाठी एक व्यासपीठ प्रदान करतात. भारताने ४० खेळाडूंचा मजबूत पथक उतरवला आहे. निशाने भारताचे सुवर्णपदक खाते उघडले. तिने तिसऱ्या आणि शेवटच्या फेरीत चीनच्या सिरुई यांगविरुद्ध ४:१ असा विजय मिळवत वर्चस्व गाजवले. मुस्कानने कझाकस्तानच्या अयाझान एर्मेकवर ३:२ अशी मात केली. पुरुषांच्या स्पर्धेत, राहुलने ७५ किलो वजनी गटात उझबेकिस्तानच्या मुहम्मदजोनविरुद्ध अंतिम ४:१ असा विजय मिळवला. भारताने २२ वर्षांखालील गटात १३ पदके निश्चित केली आहेत, तर सोमवारी पाच खेळाडू सुवर्णपदकासाठी लढणार आहेत. ◀(वृत्तसंस्था)

# सिलेसिया डायमंड लीगमध्ये भालाफेकपटूंच्या यादीतून नीरज चोप्रा, अर्शद नदीमचे नाव गायब

◆ **नवी दिल्ली, १० ऑगस्ट**

पॅरिस ऑलिम्पिकनंतर सुवर्ण व रौप्यपदक विजेते अनुक्रमे पाकिस्तानचा अर्शद नदीम आणि भरताचा नीरज चोप्रा प्रथमच सिलेसिया डायमंड लीगमध्ये आमने-सामने उभे ठाकण्याची अपेक्षा होती, परंतु या दोन्ही प्रतिस्पर्धी खेळाडूंची नावे स्पर्धकांच्या यादीतून गायब झाले आहे.

प्रतिस्पर्धी नीरज व अर्शद सिलेसियामध्ये आमनेसामने येणार आहेत. ऑगस्ट २०२४ मध्ये पॅरिस ऑलिम्पिकच्या अंतिम फेरीनंतर ही त्यांची पहिलीच भेट असेल असे वर्ल्ड अॅथ्लेटिक्सने जुलैमध्ये म्हटले होते. नदीमने ९२.९७ मीटरच्या जबरदस्त भालाफेक करून भारतीय खेळाडूकडून ऑलिम्पिक मुकुट हिसकावून घेतला होता. नीरजने ८९.४५ मीटरची सर्वोत्तम कामगिरी करत रौप्यपदक मिळवले.




तेव्हापासून, नीरजने ९० मीटरच्या क्लबमध्ये प्रवेश केला आहे आणि मे महिन्यात दोहा डायमंड लीग स्पर्धेत ही कामगिरी केली आहे.

जुलै महिन्यात बेंगळुरू येथे होणाऱ्या नीरज चोप्रा क्लासिकमध्ये भाग घेण्यासाठी नदीम भारतात येण्याची अपेक्षा होती. तथापि, मे महिन्यात भारत आणि पाकिस्तानमधील सीमा तणावामुळे या कल्पनेवर जनतेची तीव्र टीका झाली आणि अखेर पाकिस्तानी फेकपटूला आमंत्रित करण्यात आले नाही. सिलेसिया डायमंड लीगमधून दोन्ही नावे वगळण्यात आल्यामुळे, सप्टेंबरमध्ये टोकियो येथे होणाऱ्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत त्यांची गाठ पडण्याची शक्यता आहे.

नीरज हा भालाफेक स्पर्धेत जागतिक विजेता आहे, जो त्याने २०२३ मध्ये ८८.१७ मीटरच्या फेकसह जिंकला होता. ◀(वृत्तसंस्था)



# बार्शीच्या श्रीया क्षीरसागर हिची राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड

**बार्शी, दि. १० ऑगस्ट-**

येथील श्रीया दिपक क्षीरसागर हिची राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड झाली. महाराष्ट्र व हिंगोली फेन्सिंग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने हिंगोली येथे झालेल्या २७व्या राज्यस्तरीय सब-ज्युनिअर तलवारबाजी स्पर्धेत श्रीया हिने ईपी सांघिक प्रकारात सुवर्ण पदक पटकाविले. वैयक्तिक ईपी प्रकारात तिने कांस्यपदक प्राप्त केले. तिच्या या कामगिरीवर तिची पाँडिचेरी येथे होणाऱ्या राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड झाली. श्रीया ही बार्शीचे माजी नगरसेवक राजाभाऊ घोलप यांची नात व डॉ. अक्षय घोलप यांची भाची आहे. तिचे महाराष्ट्र फेन्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष माजी गृहराज्यमंत्री सतेज पाटील यांनी अभिनंदन केले.



## महादेव चषक आमंत्रित जिल्हा बेसबॉल स्पर्धा बुधवारपासून

**सोलापूर, दि. १० ऑगस्ट -**

सोलापूर शहर व जिल्हा बेसबॉल असोसिएशनच्या वतीने १४ व १७ वर्षे मुले व मुली बेसबॉल जिल्हा आमंत्रित स्पर्धा बुधवार १३ ऑगस्ट रोजी विमानतळसमोर मल्लिकार्जुन हायस्कूल हत्तुरेनगर येथे सकाळी ९.३० वाजता वाजता होणार आहे.या स्पर्धेसाठी येताना क्रीडा शिक्षकांनी संघाची यादी, खेळाडूंची आधार कार्डची झेरॉक्स व आवश्यक साहित्यसह मैदानावर उपस्थित रहावे. खेळाडूंनी मैदानावर संघटनेचे जिल्हासचिव प्रा.संतोष खेंडे (९८५०६६६७९५) अथवा गंगाराम घोडके (९४२३७१७२७७) यांच्याशी संपर्क साधावा. विजेत्या खेळाडूंना कै. महादेव बिराप्पा घोडके स्मृती महादेव चषक* प्रदान करण्यात येईल. या स्पर्धेसाठी जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हा संघटनेचे जिल्हाध्यक्ष सीए विनोद भोसले, उपाध्यक्ष प्रा.संतोष गवळी यांनी केले आहे.

# मानांकित खेळाडूंची विजयी सलामी

**स्व. विष्णुपंत तात्यासाहेब कोठे स्मृती चषक जिल्हा बुद्धिबळ स्पर्धा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

राज मेमोरियल इंग्लिश स्कूल व सोलापूर चेस अॅकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने 'स्व. विष्णुपंत तात्यासाहेब कोठे' यांच्या ८८व्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या १९ व १३ वर्षाखालील गटाच्या जिल्हा निवड बुद्धिबळ स्पर्धेत तसेच ९ वर्षाखालील गटात आंतरराष्ट्रीय खेळाडू स्वराली हातवळणे, मानस गायकवाड यांच्यासह २९ आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त खेळाडूंसह सोलापुर शहरासह करमाळा, पंढरपुर, मंगळवेढा, बार्शी, माळशिरस, माढा आदी तालुक्यातील २०५ खेळाडूंनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला.

स्पर्धेचे उद्घाटन शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त धनश्री अतुल देशपांडे (साठे) व डॉ. राधिकाताई चिलका तसेच पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्षा शोभा कुलकर्णी व मुख्याध्यापिका रोहिणी सुरा यांच्यातील प्रदर्शनीय लढतीने झाले. यावेळी आंतरराष्ट्रीय पंच सुमुख गायकवाड, विद्यापीठ खेळाडू संतोष पाटील यांच्या प्रमुख उपस्थिती होती.



सूत्र संचलन विद्या माने यांनी केले. तर स्पर्धेत प्रमुख पंच म्हणून वरिष्ठ राष्ट्रीय पंच उदय वगरे, रोहिणी तुम्मा, जयश्री कोंडा, यश इंगळे, प्रज्वल कोरे, पद्मजा घोडके, श्रीराम घोडके आदी काम पाहत आहेत.

**खेळाडूंच्या विकासासाठी मानसिक, शारीरिक व बौद्धिक तंदुरुस्ती आवश्यक**

सौ. देशपांडे (साठे) यांनी खेळाचे दैनंदिन जीवनातील महत्व उपस्थित पालक व खेळाडूंना विषद करत खेळाडूंच्या सर्वांगीण विकासासाठी मानसिक, शारीरिक व बौद्धिक तंदुरुस्ती आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच खेळाडूंनी हार व जीतचा विचार न करता जिद्द व चिकाटीने खेळणे महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन केले.

**बार्शीच्या प्रसन्न जगदाळेची सलामी**

सुशील रसिक सभागृह येथे रंगलेल्या या स्पर्धेत पहिल्या फेरीत अग्रमानांकित व आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त मानस गायकवाड, बार्शीचा प्रसन्न जगदाळे, सैनध्य जमादार, वेद आगरकर, हर्ष हलमल्ली, विराज पठाडे, प्रतीक नामदे, श्रेया संदुपटला, सृष्टी गायकवाड व आंतरराष्ट्रीय खेळाडू स्वराली हातवळणे यांनी विजयी सलामी दिली. तर १३ वर्षाखालील गटात मानांकित वेदांत मुसळे, श्रेयस कुदळे, साईराज घोडके, सानवी गोरे, सृष्टी मुसळे, अनन्या उलभगत, पृथा ठोंबरे व ९ वर्षाखालील गटात हिमांशू व्हानगावडे, समृद्धी कसबे यांनी आकर्षक विजय मिळवीत सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

# युनिक स्कूल, भंडारी व अल्फा संघ उपांत्य फेरीत

**कै. वि. गु. शिवदारे स्मृती करंडक फुटबॉल स्पर्धा**

**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

कै. वि. गु. शिवदारे स्मृती करंडक १५ वर्षांखालील निमंत्रित फुटबॉल स्पर्धेत युनिक इंग्लिश मेडियम स्कूल, भंडारी ए, भंडारी सी आणि अल्फा या संघानी उपांत्य फेरीत प्रवेश केला. या फुटबॉल स्पर्धेत दहा संघानी भाग घेतला आहे.

दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ संचलित व्ही.जी. शिवदारे शैक्षणिक संकुलात कै. वि. गु.शिवदारे अण्णा स्मृतिसमारोह सप्ताहाच्या निमित्ताने निमंत्रित फुटबॉल स्पर्धेचे आयोजन केले आहे. याचे उद्घाटन दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाचे चेअरमन शिवदारे, विश्वस्त प्रा. बी. व्ही. शेटे, क्रीडा भारती सोलापूरचे अरुण उपाध्ये, राजेश कळमणकर, सिद्धेश्वर बँकचे चेअरमन नरेंद्र गंभीरे, प्रकाश वाले, शिवानंद पाटील, सुभाष मुनाळे, श्री म्हेत्रे, महाविद्यालयातील विविध विभागाचे प्राचार्य डॉ. डी. एस. सूत्रावे, प्राचार्य डॉ जी. के. कापसे, मुख्याध्यापक बाजपेयी, प्राचार्य गायकवाड, अमर पाटील आदी उपस्थित होते. क्रीडा विभागाचे संचालक प्रा एम बी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. अमर पाटील यांनी आभार मानले.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### 'जिव्हाळा'त वृक्षांना राखी बांधून केले अनोखे रक्षाबंधन; सीमेवरील सैनिकांनाही पाठविल्या राख्या

**कुर्डूवाडी, दि.१० ऑगस्ट-**

येथील जिव्हाळा सुसंस्कार विद्यामंदिर येथील विद्यार्थिनींनी कार्यशाळेत स्वतःच्या हाताने बनवलेल्या राख्या विद्यार्थ्यांच्या हातात बांधल्या व शालेय परिसरातील वृक्षांनाही बांधण्यात आल्या. शत्रूपासून रक्षा व्हावी अशी सदिच्छा देत विद्यार्थिनींनी भारतीय सीमेवरील सैनिकांना राखी पाठविली. येथे एक दिवसीय राखी बनविण्याची कार्यशाळा झाली. यामध्ये इयत्ता पहिली ते दहावीतील सर्व विद्यार्थिनींनी लोकर, मनी, मोती, कार्डशिट, सुईदोरा, डिझाईन टिकल्या, लेस, कुंदन, आदि साहित्याच्या माध्यमातून स्वतःच्या हाताने आकर्षक रंगीबेरंगी राख्या तयार केल्या. खाऊ वाटपाने या कार्यक्रमाची सांगता झाली. नियोजन संस्थापक अध्यक्ष शिवराज वायचळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी सचिव अजित वायचळ, मुख्याध्यापिका सारिका गोटे यासह सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### पिलीव परीसरात बहीण-भावाच्या पवित्र नात्याचा रक्षाबंधन सण उत्साहात

**पिलीव, दि.१० ऑगस्ट-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव परीसरात बहीण-भावाच्या नात्याचा पवित्र असा रक्षाबंधन सण साजरा करण्यात आला. रक्षाबंधन सणानिमित्त पिलीव बाजारपेठेत आकर्षक वेगवेगळ्या रंगाच्या राख्या खरेदीसाठी महीला ,मुलींनी सकाळपासूनच मोठी गर्दी केली होती. यामुळे अगदी सकाळपासून रात्री उशीरापर्यंत पिलीव व आसपासच्या परीसरातील तसेच पिलीव बसस्थानकावर मोठी गर्दी होती.बहीणींची आपल्या भावांना राखी बांधणयासाठी लगबग दिसुन येत होती. बहीनींनी आपल्या भावाच्या मनगटावर राखी बांधली त्याची सुरक्षितता तसेच आरोग्यमय यशस्वी जिवनासाठी शुभेच्छा दिल्या. रक्षाबंधन सण म्हणजे खरेतर बहीण-भावामधील प्रेम, विश्वास, आपुलकी, माया याचे पवित्र असे बंधन आहे. हे या सणाच्या निमित्ताने अनुभवयास मिळते. रिमझिम पावसाच्या सरी वरवर कोसळत असताना बहीणींनी आपल्या भावांना राखी बांधण्याचे टाळले नाही.



### वाळूज येथील भोगावती नदीवर पुलाची मागणी

**वाळूज, दि.१०ऑगस्ट-**

मोहोळ तालुक्यातील वाळूज येथे भोगावती नदीवरील (वाळूज सोलापूर रोड) ब्रिज कम बंधारा पूल व गावांना जोडणारी रस्ते व याची मागणी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्याकडे केली आहे. भोगावती नदीवर कोल्हापूर पध्दतीचा बंधारा देगाव येथे आहे. परंतू सदर बंधाऱ्याचा पाया कमकुवत झाल्याने बांध फुटला आहे. पाणी वाहून जात असल्यामुळे सदरच्या बंधाऱ्यात पुर्ण क्षमतेने पाणी अडविले जात नाही. वाळूज या ठिकाणी ब्रीज कम बॅरेज बंधारा बांधल्यास पुर्ण क्षमतेने पाणी अडविले जाईल व साधारणपणे ९ किलोमीटर पर्यंत पाणी नदीपात्रात राहू शकते इतकी त्याची क्षमता आहे. तसेच नदीपलीकडील शेतकऱ्यांना नदीवरील ब्रीजचा वापर वाहतूकीसाठी करता येऊ शकेल. शेतकरी, अबाल वृध्द, व शाळेकरी विदयार्थी यांचे आतोनात हाल होत असून सध्या भोगावती नदीवर कोणत्याही प्रकारचा पुल नाही. वाळुज-सोलापूर रोडवरील भोगावती नदीवर पुल बनवून त्यावर रस्ता डांबरीकरण करुन मिळावे,तसेच वाळूज ते भैरववाडी, मनगोळी तसेच धानोरे या गावांना जोडणारे रस्ते करण्याबाबतचे निवेदन दिले आहे. यासंबधी आमदार देशमुख यांच्या समवेत प्रा.डॉ. प्रकाश कादे, लक्ष्मण गाडगे यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री भोसले यांच्याकडे मंत्रालयात जाऊन निवेदन दिले आहे.



## निधन वृत्त...

### हुचप्पा थोरे



**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

अक्कलकोट तालुक्यातील चुंगी ग्रामपंचायत सदस्य हुचप्पा लिंबाजी थोरे (वय ७६) यांचे रविवारी सकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून आणि नातवंडे असा परिवार आहे. सोमवारी सकाळी नऊ वाजता चुंगी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. वैरागच्या माता स्वरूपा राणी आश्रम शाळेचे मुख्याध्यापक विनोद थोरे यांचे ते वडील होत.

### शांता कुंभार



**अकलूज, दि.१० ऑगस्ट-**

येथील शांता महाबळेश्वर कुंभार (वय-६१) यांचे शनिवारी ९ ऑगस्ट रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. येथील लिंगायत स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी शिक्षण व सामाजिक क्षेत्रातील लोक उपस्थित होते. त्यांच्या मागे पती, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे निवृत्त केंद्रप्रमुख महाबळेश्वर कुंभार यांच्या त्या पत्नी होत.

### श्रीमंत धायगुडे



**पिलीव, दि. १० ऑगस्ट -**

कुसमोड (ता.माळशिरस) येथील श्रीमंत मल्हारी धायगुडे (वय-५०) यांचे शनिवारी दि.९ ऑगस्ट रोजी अपघाती निधन झाले. पिलीवहुन कुसमोडकडे जात असताना मोटारसायकल घसरुन पडल्यामुळे ते गंभीर जखमी झाले होते. पंढरपूर येथील खाजगी हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू असताना त्यांची प्राणज्योत मावळली. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, दोन भाऊ असा परिवार आहे.

# अवैध खासगी सावकारांना लगाम कोण लावणार?



**पिलीव परिसरातील नागरिकांतून सवाल**

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. १० ऑगस्ट-**

माळशिरस तालुक्यासह पिलीव परीसरात खाजगी सावकारी अक्षरशः बोकाळली असुन यामुळे अनेकांचे संसार अक्षरशः उघडयावर पडले आहेत. हे खाजगी सावकार शेतकऱ्यांना व इतर सर्वसामान्य नागरिकांना अडचणीत गाठुन अव्वाच्या सव्वा व्याजदराने पैसे देत आहेत. पण गरज किंवा अतिशय अडचण असल्याने कोणीही तक्रार करण्यास पुढे येत नाही. त्यामुळे या सावकरांना कोण लगामन लावणार असा प्रश्न आहे.

शेतकऱ्यांना आपल्या शेतातील कामे करणे, मुलांना शाळेसाठी फी भरणे किंवा बँका ,सोसायटी यांची कर्जे परत भरणयासाठी पैशाची आवश्यकता असते. पण हे पैसे खाजगी सावकराकडुन घेताना ते खाजगी सावकार त्या शेतकऱ्यांची जमीन गहाण खरेदी खत म्हणून लिहुन घेतात व त्याच्याकडून महीन्याच्या महीन्याला व्याज वसुली करतात. तो शेतकरी व्याज देऊन देऊन अक्षरशः मरणाच्या दाढेत उभा राहतो. शेवटी पैसे न फिटल्यामुळे तो सावकार त्याची जमीन लाटतो किंवा हडप करतो. त्यामुळे त्याचा संसार उघडयावर पडतो. मग सदरचा शेतकरी आत्महत्या यासारखे टोकाचे पाऊल उचलतो हे भयाण वास्तव आहे. अनेक खाजगी सावकार आठवडयावर व्याजाने पैसे देतात यामध्ये ते दहा टक्के किंवा त्यापेक्षा अधिक व्याज दर स्विकारतात. यामध्ये बरेच खाजगी सावकार पैसे देतानाच त्यातील व्याजाची रक्कम अगोदरच कट करुन घेतो किंवा अनेक खाजगी सावकार त्याच्याकडुन रक्कम टाकुन कोरा चेक घेतात. खरेतर सावकारी धंदा करीत असताना शासनाकडे त्याची रितसर नोद असणे आवश्यक आहे तसेच त्याचे आडिट होणे सुद्धा आवश्यक आहे. पण दुर्दैवाने पिलीव परीसरात नोंदणीकृत सावकार बोटावर मोजणया एवढेच आहेत. अनेकांची जमीन, जागा, घरदार, इतर प्रापर्टी गेल्यामुळे अनेकांचे कुटुंब उद्धवस्त झाली आहेत. खरेतर धनदांडग्या खाजगी सावकारावर नियंत्रण असणे आवश्यक आहे. यासाठी नागरिकांनी दुय्यम निबंधक यांच्याकडे रितसर तक्रार देणे आवश्यक आहे पण नागरीक खाजगी सावकारांच्या भितीपोटी तक्रारच देत नाहीत. यामुळेच खाजगी सावकार कोणाच्या बापाला घाबरत नाहीत.किती जणांचे संसार उद्धस्त होण्याची वाट पाहणार आहात असा प्रश्न सर्वसामान्य नागरिक, शेतकरी शासनाला विचारत आहेत.

# आ. अभिजीत पाटील यांच्या हस्ते गौरी पाणबुडे हिचा सत्कार

**चेन्नई येथील कॉर्फबॉल स्पर्धेत पटकाविले सुवर्णपदक**



उजनी (टें) येथील मा. सरपंच विठ्ठल मेटे सह परिवार यांनी माढा विधानसभेचे आ. अभिजीत आबा पाटील यांना घरी बोलवून केक कापून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. विधानसभेच्या इलेक्शन आगोदर गाव भेट दौऱ्यावेळी आपल्या घरी चहा घेऊन गेलो होतो अशी आठवण यावेळी आ अभिजीत पाटील यांनी आवर्जून जागृत केली. तालुक्यातील छोट्याशा गावात दिलेली चहापाण्याची भेट विसरले नाहीत, याचे सर्वांना आश्चर्य वाटले.

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभूर्णी, दि.१० ऑगस्ट-**

माढा तालुक्यातील उजनी (टें), येथील गौरी विष्णू पाणबुडे हिची राज्याच्या कॉर्फबॉल संघात निवड होऊन चेन्नई तमिळनाडू येथे घेण्यात आलेल्या सामन्यात संघाने प्रथम क्रमांकासह सुवर्णपदक मिळवून देश पातळीवर निवड झाल्याबद्दल आमदार अभिजित पाटील यांनी उजनी (टे),येथील पाणबुडे यांच्या घरी सत्कार केला.

ग्रामीण भागातील गौरी पाणबुडे हिने कॉर्फबॉलमध्ये सर्वोत्कृष्ट कामगिरी करून राज्याच्या संघात आपले अस्तित्व सिद्ध करून गावाचे, राज्याचे व आपल्या आई वडिलांचे नाव रोशन केले,तिची अशीच उत्तुंग भरारी पुढे सुरू रहावी. व आपल्या राज्याचे नाव देश पातळीवर अधोरेखित करावे. यासाठी आम्हीं सदैव सोबत राहून सर्वतोपरी सहकार्य करू असे आमदार अभिजीत पाटील यांनी आश्वस्त केले.गौरी पानबुडे व इतर दहा खेळाडू यांनी चेन्नई तामिळनाडू येथे राष्ट्रीय कॉर्फबॉल सामना २४ जुलै ते २६ जुलै रोजी खेळून प्रथम क्रमांका सह सुवर्णपदक मिळविले होते.सचिन जगताप म्हणाले जिजाऊच्या लेकींच्या पाठीमागे संभाजी ब्रिगेड सदैव ठामपणे उभी असून गौरी ने अशीच उत्तुंग भरारी घ्यावी व पुढील वाटचालीस शुभेच्छा राहतील. सत्कार समारंभ प्रसंगी रावसाहेब देशमुख, डी व्ही पी बँकेचे चेअरमन औदुंबर देशमुख, संभाजी ब्रिगेड जिल्हा उपाध्यक्ष शंकर पोळ, धरणग्रस्थ संघटनेचे तालुकाध्यक्ष सुरेश पाटील, राज्य विक्रीकर अधिकारी धनश्री डूचाल, विनायक केचे, प्रांजली स्पोर्ट अॅकॅडमीचे संस्थापक शंकर बाबर, हमाल पंचायत उपाध्यक्ष लक्ष्मण बागल, डॉ. रमेश जाधव उजणी (मा), सुनिल डूचाळ, संभाजी ब्रिगेड माळशिरस तालुका उपाध्यक सचिन पराडे-पाटील, विजय मस्के, श्रीमंत भराडे, मोहन काटे, दशरथ जगताप, हनुमंत डूचाळ, नवनाथ भोसले, पिंटूदादा ताटे, भगवंत शिंदे, रामदास गलांडे, हरिदास काळे, आण्णा पानबुडे, महेश पानबुडे, संतोष पानबुडे, विठ्ठल मेटे, परशुराम नवले, निलेश मेटे, ज्योतीराम मेटे, परमेश्वर मेटे, हरि कवडे, कालीदास शिरतोडे, सचिन गायकवाड, आप्पा माने, समाधान जाधव, पंढरीनाथ काळे, जीवनदास मेटे, नानासो मेटे, मयुर नवले, देविदास नवले यांच्या सह उजनी ग्रामस्थ, पैपाहुणे, मित्र परिवार यांनी उपस्थित राहून गौरी चे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# मंगळवेढ्यातील १० महसूल कर्मचाऱ्यांना पुरस्कार





**मंगळवेढा, दि. १० ऑगस्ट-**

महसूल सप्ताहानिमित्त मंगळवेढा तहसिल कार्यालयातील उत्कृष्ट काम करणाऱ्या १० कर्मचाऱ्यांना पुरस्कार देऊन जिल्हा व तालुका स्तरावर गौरविण्यात आले.

यामध्ये निवडणूक नायब तहसिलदार जयश्री स्वामी, सहाय्यक महसूल अधिकारी अस्थापना प्रियांका निराळी, मरवडे मंडलाधिकारी प्रतिभा घुगे (जिल्हास्तर), महसूल सहाय्यक अभिलेख शिवाजी भोसले, महसूल कर्मचारी संगिता ताड (जिल्हास्तर), ग्राम महसूल अधिकारी अविनाश भिसे (बावची), हुलजंती कोतवाल गुलाब सोनवले (विभागीय स्तर), उत्कृष्ट खेळाडू विकास माने (कोतवाल लक्ष्मी दहिवडी, विभागीय स्तर), पोलीस पाटील सुभाष दुधाळ (खवे), वाहन चालक सिध्देश्वर तपकिरे आदींना शाल, श्रीफळ व पुरस्कार देवून जिल्हास्तरावर जि.प.मुख्याधिकारी तथा प्रभारी जिल्हाधिकारी कुलदीप जगंम यांनी तर तालुकास्तरावर आ. समाधान आवताडे, तहसिलदार मदन जाधव, निवासी नायब तहसिलदार शुभांगी जाधव यांच्या हस्ते गौरविण्यात आले.



# हन्नूर येथील आरोग्य शिबिरात ३५० जणांची तपासणी

**उपसरपंच सागर कल्याणशेट्टी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजन**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१० ऑगस्ट-**

हन्नूर (ता.अक्कलकोट) चे उपसरपंच युवा नेते सागर कल्याणशेट्टी यांच्या वाढदिवसानिमित्त झालेल्या आरोग्य शिबिरात ३५० नागरिकांनी सहभाग घेतला तर ४५ जणांनी रक्तदान केले.

आरोग्य शिबिराचे उद्घाटन ज्येष्ठ नेते मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. अध्यक्षस्थानी सरपंच सोनाली तळवार होत्या. शिबिरात मोतीबिंदू ऑपरेशन, लहान मोठे शस्त्रक्रिया, लहान मुलांचे आजार व त्यांची शस्त्रक्रिया, बाळाचे सर्व ऑपरेशन, किरकोळ आजारांवरील मोफत औषध उपचार व्यवस्था करण्यात आली होती. प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ विनायक सर, डॉ. अण्णासाहेब लोखंडे, डॉ.अब्दुल, डॉ. गौरव मल्हार, डॉ. डिसूजा या वैद्यकीय शिबिराचे समन्वयक अनंत जंजाळ, डाटा एन्ट्री ऑपरेटर बागवान यांनी काम केले. यावेळी माजी उपसरपंच शरणाप्पा हेगडे, तंटामुक्त अध्यक्ष सिद्राम पुजारी, ज्येष्ठ नेते सोपान निक्ते, मा.ग्रामपंचायत सदस्य धोंडीराम बाळशंकर, गुडू भाई जमादार, अमीन मुल्ला आदी मान्यवर उपस्थित होते. शिबिर यशस्वी होण्यासाठी दिनेश तळवार, शरणापा बंदीछोडे, विठ्ठल पारतनाळे, अनिल तळवार, प्रवीण कोरे , महेश चितले, विशाल सरसंबे, नागनाथ रोट्टे, गणेश हेगडे, नितीन बिराजदार व सागर दादा कल्याणशेट्टी मित्र परिवार आदींनी परिश्रम घेतले.

# वेळापुरात कृषीकन्यांनी शाश्वत शेतीबाबत केली जागृती

**डॉ. एम.एस. स्वामीनाथन यांच्या जन्मशताब्दी दिनानिमित्त कार्यक्रम**



**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.१० ऑगस्ट-**

वेळापूर (ता.माळशिरस) येथे शिक्षण प्रसारक मंडळ,अकलूज संचलित रत्नाई कृषी महाविद्यालयाच्या कृषी कन्यांनी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शाश्वत शेती म्हणजे काय त्याचबरोबर ती कशी केली जाते व त्याचे महत्त्व पटवून दिले.

यावेळी कृषिकन्यांनी भविष्यातील शेतीची गरज व त्याचबरोबर शेतीचे महत्व सांगितले. शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाबरोबरच पारंपारिक शेती पद्धती बद्दलही माहिती सांगितली. हरितक्रांतीचे जनक डॉ. एम.एस स्वामीनाथन यांच्या जन्मशताब्दी दिनानिमित्त शाश्वत शेती दिन साजरा करण्यात आला. अकलूज येथील शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्राम सिंह मोहिते-पाटील, रत्नाई कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य.आर.जी नलावडे, कार्यक्रम समन्वयक प्रा.एस.एम.एकतपुरे, कार्यक्रम अधिकारी, प्रा. एम.एम.चंदनकर व प्रा.एच.व्ही कल्याणी यांच्या मार्गदर्शनाखाली कृषिकन्यांनी हा कार्यक्रम घेतला. वेळापूर येथील शाळेचे मुख्याध्यापक तांबोळी, अनिता बनसोडे, शेतकरी रमेश बनकर, शंकर भाकरे व इतर शिक्षक ग्रामस्थ उपस्थित होते. कृषिकन्या आरती मंडले, मोहिनी कानडे, वैष्णवी हिवरकर, योगेश्वरी मदने, अनुपमा गोसावी, प्राजक्ता जाधव, राजनंदिनी डिकोळे, सिद्धी पाटील यांनी आयोजन केले होते.

# वेळापुरात कै.सूर्यकांत माने-देशमुख जयंतीनिमित्त गुणवंतांचा सत्कार



**वेळापूर, दि. १० ऑगस्ट-**

जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष कै. सूर्यकांतदादा माने-देशमुख यांच्या ८५ व्या जयंतीनिमित्त विविध क्षेत्रात निवड झालेले व सुयश मिळवलेले अजिंक्य खराडे, संभाजी माने देशमुख, एस. डी. हंबीरे, हेमंत माने- देशमुख, सार्थक चोरमले, प्रथमेश बनसोडे, वैष्णवी बाबर, कृष्णा बनसोडे, प्राजक्ता बनसोडे, आश्विनी मांडवे, आरमान शेख, अकबर शेख, शंभूराजे चंदनशिव आदींचा सत्कार करण्यात आला.

इंद्रनील मंगल कार्यालयातील या कार्यक्रमासाठी श्रीराम शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाशबापू पाटील, आप्पासाहेब देशमुख, शरदबापू मोरे, विक्रम माने देशमुख, अमृतभैया माने देशमुख, चेअरमन अमरभाऊ माने देशमुख, सुजय माने पाटील, हंसराज माने पाटील, जयराज माने पाटील, आनंदराव माने देशमुख, धैर्यशील माने देशमुख, भारत माने देशमुख, शिवाजी माने देशमुख, किसन माने देशमुख, बाळासाहेब धाइंजे, बाळासाहेब सरगर, मिलिंद सरतापे, नितीन मोहिते, रामभाऊ कचरे, चंद्रकांत जाधव, महादेव कावळे,काकासाहेब जाधव, भाऊसाहेब गोसावी, मदनसिंह माने देशमुख, राहुल माने माने देशमुख, दत्तात्रय माने, हरी मेटकरी, अर्जुन भाकरे, अप्पा अडसूळ, गोपाळराव घार्गे देशमुख, बाळासाहेब वावरे,गणेश पाटील, गोरख मगर, दत्तू तात्या माने, विरकुमार दोशी,गणेश चव्हाण, उमेश भाकरे ,महेश शिंदे, उमेश बनकर, सुशांत जाधव, श्रीधर देशपांडे, माऊली मगर, अमोल पताळे, पिनू येडगे, ओंकार खराडे, दिपक चव्हाण,समाधान मगर आदी उपस्थित होते. श्रीधर देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले. अमरभाऊ माने देशमुख यांनी आभार मानले.

# रिपब्लिकन पक्षाच्या अजेंड्यानुसार काम करा

**सोमनाथ भोसले : तालुका आढावा बैठकीत आवाहन**



**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.१० ऑगस्ट-**

आगामी निवडणुकीमध्ये पक्षाचा जो अजेंडा असेल त्यास इमान राखून रिपब्लिकन पक्षाचे काम करण्याचे आवाहन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे यांनी केले.

माळशिरस तालुका कार्यकारिणीची आढावा बैठक येथील शासकीय विश्रामगृहात झाली. रामदास आठवले यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव आगामी निवडणुकीबाबत रणनीती ठरवणे, गाव तेथे शाखा निर्माण करणे, क्रियाशील सभासद वाढविणे, तालुक्यातील प्रश्नाबाबत आंदोलन करणे, २६ ऑगस्ट रोजी प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांचा वाढदिवसानिमित्त उपक्रम राबविणे आदी विषयावर चर्चा झाली. पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष एन.के. साळवे, पश्चिम महाराष्ट्र संघटक एस. एम. गायकवाड, जिल्हाध्यक्ष सोमनाथ भोसले, युवक आघाडी महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष किरणतात्या धाईंजे, जिल्हा सचिव रमेश धाईंजे, युवक तालुकाध्यक्ष दशरथ नवगिरे, अकलूज शहराध्यक्ष अजित मोरे, संघटन सचिव पोपट गेजगे, युवक तालुका सरचिटणीस प्रवीण साळवे, कोषाध्यक्ष समीर सोरटे, मार्गदर्शक प्रा.भास्कर बनसोडे, तालुका उपाध्यक्ष बापूसाहेब पोळके,तालुका उपाध्यक्ष संतोष कांबळे, तालुका उपाध्यक्ष रामभाऊ कांबळे,तालुका उपाध्यक्ष -सुनील ओवाळ,तालुका उपाध्यक्ष दिलीपदादा सरतापे, तालुका संपर्कप्रमुख अण्णासाहेब भोसले, तालुका उपाध्यक्ष महेंद्र लोंढे, तालुका संघटक प्रकाश गायकवाड, युवक तालुका उपाध्यक्ष बाबुराव भोसले, तालुका सचिव दादासाहेब सरतापे, मारुती शिंदे, गणेश सावंत, सुधीर शामराव भोसले, संतोष बनसोडे, विश्वजीत भालशंकर, आसिफ शेख, गौतम वाघमारे, संतोष जाधव आदी उपस्थित होते.

## महत्वाचे...



### लवंगी येथील भैरवनाथ शुगरच्या मिल रोलरचे पूजन

**मंगळवेढा, दि. १० ऑगस्ट-**

भैरवनाथ शुगर वर्क्स लि.,यू-३ लवंगी या साखर कारखान्यामध्ये सन २०२५-२६ च्या गळीत हंगामासाठी मिल रोलरचे पूजन व्हा.चेअरमन अनिल सावंत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्हा.चेअरमन अनिल सावंत म्हणाले,कारखान्याचे संस्थापक तथा माजी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री,महाराष्ट्र राज्यचे ना.प्रा.डॉ.तानाजीराव सावंत व चेअरमन प्रा.शिवाजीराव सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली कारखाना प्रगतीपथाकडे वाटचाल करीत आहे. यंदाच्या गाळप हंगामात कारखान्याने ६ लाख मे.टन गाळपाचे उदिष्ट ठेवले असून त्यानुसार ऊस नोंदीचे काम ही जवळपास पूर्ण केले आहे. सदरप्रसंगी नितिन करपे व मनीषा करपे या उभयंत्यांच्या हस्ते धार्मिक विधी संपन्न झाला. यानंतर यांत्रिक कळ दाबून रोलर बसविण्याच्या कामास प्रारंभ झाला. कार्यक्रमास कारखान्याचे जनरल मॅनेजर बाळासाहेब शिंदे, श्रीपती माने, तानाजी चव्हाण, वर्क्स मॅनेजर नानासाहेब पोकळे, एचआर मॅनेजर संजय राठोड, मुख्य शेतकी अधिकारी शिवाजी चव्हाण, शेतकी अधिकारी कृष्णदेव लोंढे, डे.चीफ केमिस्ट सिद्धेशर लवटे, चीफ अकौंटंट देवानंद पासले, केनयार्ड सुपरवायझर शंकर पाटील, ई.डी.पी. मॅनेजर गजानन माने-देशमुख, स्टोअर किपर केदार साबणे, सुरक्षा अधिकारी प्रकाश कमळे, कार्यालय अधीक्षक अभिजीत पवार तसेच सर्व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी परिसरातील शेतकरी व ऊस तोडणी-वाहतूक ठेकेदार उपस्थित होते.

### लेखकांसाठी वार्षिक पत्रलेखन स्पर्धा

**सोलापूर, दि. १० ऑगस्ट**

वृत्तपत्र लेखक मंचतर्फे, सोलापूर जिल्ह्यातील वाचक पत्र लेखकांसाठी वार्षिक पत्र लेखन स्पर्धा आयोजित केली आहे. तरी इच्छुक स्पर्धकांनी १ एप्रिल२०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीतील विविध दैनिकांतील कोणत्याही तीन वाचक पत्रांच्या छायाचित्रांकित अर्थात, झेरॉक्स प्रती २३ ऑगस्टपर्यंत, सहकार्यवाह, अरुण धुमाळ ( मो.९८९०९०२९२३), पारस ए.४३०/४३१ आदित्य नगर विजापूर रोड, सोलापूर४१३००४ या पत्त्यावर पाठवाव्यात. गुणानुक्रमे प्रथम पाच वाचक- पत्रांना, अनुक्रमे ५००,३००,२०० व उत्तेजनार्थ १००,१०० रु. ची बक्षिसे, पुस्तक रुपाने दिली जातील, असे आवाहनअध्यक्ष फैय्याज शेख यांनी केले आहे.

# सीईओंच्या दौऱ्यासाठी मंद्रूप बसस्थानक परिसरात स्वच्छता

### ग्रामपंचायतीचे गावातील अस्वच्छतेकडे दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

मंद्रुप ग्रामपंचायतला जिल्हा परीषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम भेट देणार असल्याने मुख्य मार्गावरील बसस्थानक परीसरात एकाच महिन्यात दोनवेळा स्वच्छता करण्यात आल्याने नागरीकांमधून आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. एकीकडे गावात पावसामुळे अस्वच्छतेचे प्रमाण वाढले असताना त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे, तर दुसरीकडे एकाच ठिकाणी एकाच महिन्यात दोनवेळा स्वच्छता करण्यात येत असल्याने नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

पावसामुळे मंद्रुपमध्ये सर्वच वॉर्डात अस्वच्छता वाढल्याने डुकरांचा व डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्यामुळे मलेरीया व डेंग्यूसदृश्य रूग्णांमध्ये वाढ होत आहे. गावातील सर्व रस्त्यांच्या बाजूला कचऱ्यांचा ढीग साचले असताना वारंवार बसस्थानक परीसरच स्वच्छ करण्याचे कारण काय? यापूर्वीही स्वच्छता विभागाचे पथक पाहण्यासाठी येणार असल्याने याच परीसरात स्वच्छता करण्यात आली होती. अधिकाऱ्यांना खुष करण्यासाठी व पुरस्कार मिळविण्यासाठी ग्रामपंचायतीचा खटाटोप सुरू असल्याचे सांगण्यात येते. मात्र, गावातील इतर वॉर्डात अस्वच्छता ठेऊन एकाच ठिकाणी स्वच्छतेसाठी पैसा खर्च करण्यात येत असल्याने नागरीकांमधून संताप व्यक्त करण्यात येत आहे. ग्रामपंचायत अधिकारीही वारंवार स्वच्छतेसाठी पैसा खर्च करण्यास संमती देण्याचे कारण काय? असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे

#### जनतेच्या पैशाची उधळपट्टी

बसस्थानक परिसरात एकाच महिन्यात दोनवेळा स्वच्छता केल्याने जनतेच्या कररूपी पैशाची उधळपट्टी सुरू आहे. वरीष्ठ अधिकाऱ्यांच्या दौऱ्यावेळी एकाच ठिकाणी पैसे खर्च करण्यात येत असल्याने इतर भागातील जनतेबरोबर सापत्न व दुजाभावाची वागणूक दिसून येत आहे. वरीष्ठ अधिकाऱ्यांनी दौऱ्यावेळी संपूर्ण मंद्रुपचा दौरा केल्यास सत्य परीस्थिती उघडकीस येईल.

**- शिवपुत्र जोडमोटे,**
**ग्रामपंचायत सदस्य, मंद्रुप**




**सोलापूर : मार्कंडेय महमुनीचा रथोत्सव संपल्यानंतर तोगटवीर समाजाचे कुलदैवत श्री चौडेश्वरी देवीच्या ज्योती उत्सवास सुरवात होते. या समाजात आठ फंडी असतात. चौडेश्वरी, सोमवार गट्टी, चिला, पेद्धि, साखर गट्टी, डक्का, नलगेशी व नंगी फंड या समाजाचे लोक या आठ फंडीमध्ये विभागले जातात. ही ज्योत २० ते २५ किलोपर्यंत असते. ही ज्योत डोक्यावर घेऊन देवीचे गाणे म्हणत तल्लीन होऊन नाचतात. विशेषता नंगी फंडची ज्योत साखर पेठेत आल्यावर संस्थेचे सहसेक्रेटरी हिरालाल येरफुल ज्योती डोक्यावर घेऊन नाचत असतानाचा क्षण.**

**मार्कंडेय मिरवणुकीत**

## पायावरून रथाचे चाक गेल्याने मुलगा जखमी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट -**

मार्कंडेय रथोत्सवामध्ये नाचत असताना १६ वर्षीय तरुणाच्या डाव्या पायावरून रथाचे चाक गेले, जखमी झालेल्या मुलास सिव्हिलमध्ये उपचारासाठी दाखल केले आहे. ही घटना शनिवारी रात्री आठच्या सुमारास पद्मशाली चौक या ठिकाणी घडली आहे. जयंत यशवंत साका (वय १६, रा. कुचन नगर सोलापूर) असे जखमी झालेल्या युवकाचे नाव आहे. जयंत साका हा शनिवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास पद्मशाली चौकात मार्कडेय रथोत्सव मिरवणूक आली होती. त्या मिरवणुकीमध्ये जयंत हा नाचत होता. मिरवणुकीमध्ये नाचत असताना त्याच्या डाव्या पायावरून रथा-चे चाक गेले, पायास मुक्का मार लागल्याने त्याच्या घराशेजारी एका दवाखान्यात प्राथमिक उपचार करून पुढील उपचार करण्यासाठी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये आई अनुराधा साका यांनी दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे.




# 'एक राखी सैनिक बांधवांसाठी'

### सह्याद्री फाउंडेशनच्या उपक्रमास प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

कारगिल विजय दिनाचे औचित्य साधून सह्याद्री फाउंडेशनतर्फे राबविण्यात आलेल्या 'एक राखी सैनिक बांधवांसाठी' या उपक्रमाला बोरामणी भागातील विविध शाळांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या उपक्रमांतर्गत विद्यार्थिनींनी स्वतः बनवलेल्या राख्या सीमेवरील सैनिकांना पाठवण्यात आल्या.

या उपक्रमात जिल्हा परिषद शाळा - बक्षीहिप्परग, दोड्डी, मुळेगाव तांडा, पिंजरवाडी, बोरामणी, वडजी, वडजी तांडा, कासेगाव, उळे, संगदरी, उळेवाडी, वरळेगाव, मुस्ती - तसेच शक्ती प्राथमिक आश्रम शाळा मुळेगाव तांडा, श्रीपातराव सोनटक्के हायस्कूल तांदुळवाडी, डी.एन. गायकवाड प्रशाला बक्षीहिप्परग, अनंतराव देवकते प्रशाला वडजी, बसवेश्वर हायस्कूल मुस्ती, शारदानिकेतन विद्यालय आणि स्प्रिंगफील्ड नॅशनल स्कूल, उळे या शाळेतील विद्यार्थिनींचा उल्लेखनीय सहभाग झाला.

सर्व संकलित राख्या १५ व्या बटालियन 'द मराठा लाईट इन्फंट्री' तुकडीस सुपूर्त केल्या. या सर्व राख्या १५ व्या बटालियन 'द मराठा लाईट इन्फंट्री' तुकडीमार्फत सीमेवर पोहोचवण्यात येणार आहेत. यावेळी कर्नल जितिन थॉमस, सुभेदार संभाजी मोरे, सुभेदार उत्तम पाटील, सुभेदार संतोष कोकरे, सुभेदार किशोर मापारे उपस्थित होते. सह्याद्री फाउंडेशनतर्फे एपीआय उमेश रोकडे, सचिव प्रतिभा खंडागळे, प्रा. सविता नलावडे, मंजुश्री रोकडे आदी मान्यवर उपस्थित होते.



# सिव्हिलमधील रोजंदारी कर्मचाऱ्यांना कायम सेवेत सामावून घ्या



### रोजंदारी कर्मचारी संघटनेचे आ. गोपीचंद पडळकर यांना साकडे

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट -**

छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयातील रोजंदारी कर्मचाऱ्यांना वर्ग ४ मधून कायम सेवेत सामावून घ्यावे, यासाठी रोजंदारी कर्मचारी संघटनेच्या वतीने भाजपाचे माऊली हळणवर आणि अमोल कारंडे यांच्या नेतृत्वाखाली रविवारी भाजपाचे आ. गोपीचंद पडळकर यांची भेट घेत औद्योगिक न्यायालयाच्या निकालाप्रमाणे सेवेत सामावून घ्यावे, अशी निवेदनाद्वारे करण्यात आली.

गेल्या १० ते १२ वर्षापासून हे कर्मचारी सिव्हिलमध्ये कार्यरत आहेत. मात्र त्यांना अनेकवेळा काम ावरुन कमी करण्याचा प्रयत्न सुरू आहे. यासाठी रोजंदारी कर्मचारी संघटनेच्या वतीने जवळपास ९५ कर्मचाऱ्यांनी औद्योगिक न्यायालयात दाद मागितली होती. यावर न्यायालयाने कर्मचाऱ्यांच्या बाजूने निकाल दिला असल्याची माहिती संघटनेच्या वतीने देण्यात आली. शासनाने याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी आ. पडळकर यांच्याकडे करण्यात आली आहे. या संदर्भात लवकरच आरोग्य मंत्री आणि मुख्यमंत्र्यांशी चर्चा करू, असे आश्वासन आ. पडळकर यांनी दिले आहे. यावेळी माऊली हळणवर, अमोल कारंडे, जयश्री तळभंडारे, राधा गायकवाड, सावित्री वाघमारे, मंगेश झोंबाडे, तुषार चंदनशिवे, प्रशांत मुळे, महेश गुंडे आदी उपस्थित होते.



### श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त भागवत सप्ताह

**सोलापूर : अक्कलकोट रोड परिसरातील इस्कॉन मंदिरात रविवारी सायंकाळी श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त भागवत सप्ताहात श्री लोकनाथ महाराज भक्तांना कथा सांगतानाचे टिपलेले छायाचित्र. (छाया : केवल तिवारी)**




हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company Solapur Tarun Bharat Media Limited., and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● Mr. Vivek Krishnaji Ghalsasi - Dissertation Editor / ● Mr. Dilip Yeshwant Pethe - Group Chief Editor ● Mr. Prashant Vasantrao Mane - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) Email ID starunbharat@gmail.com and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: https://dainiktarunbharat.com/, ● Epaper: https://epaper.dainiktarunbharat.com/. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## मेहता शाळेत संस्कृत दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

कै. वि.मो. मेहता शाळेत दरवर्षी प्रमाणे सुरससुबोधा संस्कृत दिवस उत्साहात साजरा झाला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून हरिभाई देवकरण प्रशालेचे प्राध्यापक निखिल बडवे उपस्थित होते. सरस्वती पुजनासह संगीतमय वातावरणात कार्यक्रमाची सुरुवात झाली.



यात्रसंगी कर्णोदार्यम, महिषासुरम दिंनी स्तोत्र आणि संस्कृत गीताचे सादरीकरण झाले. सूत्रसंचालन व प्रास्ताविक आर्या पाटील व वैष्णवी दाशाळ यांनी केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख, सत्कार शाळेच्या सेवाज्येष्ठ शिक्षिका मीनाक्षी भाटवडेकर तर आभार नंदिनी तालीकोटी हिने मानले. यावेळी मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी व सेवाज्येष्ठ शिक्षिका मीनाक्षी भाटवडेकर उपस्थित होत्या. संस्कृत विभाग प्रमुख आनंद कुलकर्णी उपस्थित होते.



### महत्वाचे...



### न्यु पाच्छा पेठेतून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

शहरातील न्यु पाच्छा पेठेतून चोरट्याने २५ हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत श्रीकृष्ण अंबादास कस्तुरी (वय ३०, रा. चाकोते नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.२ ऑगस्ट मध्यरात्रीच्या सुमारास न्यु पाच्छा पेठेत श्रीकृष्ण कस्तुरी यांनी त्यांची एमएच १३ सीएक्स ११९८ क्रमांकाची दुचाकी हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती दुचाकी चोरट्याने चोरून नेल्याची नोंद जेलरोड पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. पोलिस हवालदार गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

### एसटी बस प्रवाशाची ४ लाख ४० हजारांची रोकड लंपास

**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

बार्शी ते धाराशिव या एस टी बसमधून प्रवास करणाऱ्या कोल्हापूरच्या प्रवाशाची ४ लाख ३८ हजार ८० रुपये रोकड असलेली बॅग चोरट्याने चोरून नेली. याबाबत मुकेश इंदरलाल नरसिंगाणी (वय ४१, रा. गांधीनगर, कोल्हापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुध्द पांगरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ८ ऑगस्ट रोजी दुपारी मुकेश नरसिंगाणी हे बार्शी ते धाराशिव या एस टी बसमधून प्रवास करीत होते. त्यावेळी बार्शी ते नारीवाडी दरम्यान चोरट्याने नरसिंगाणी यांनी बसच्या कॅरेजमध्ये कपड्याच्या बॅगच्या बाजूला ठेवलेली ग्रे कलरची बॅग चोरून नेली. या बॅगेत ४ लाख ३८ हजार ८० रुपयांची रोकड होती. याबाबत पांगरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार माने पुढील तपास करीत आहेत.

### स्वामी समर्थ मंदिरात महिलेच्या गळ्यातील चैन लंपास

**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ मंदीरातील गाभाऱ्यात दर्शनासाठी आलेल्या महिलेच्या गळ्यातील सोन्याची चैन दोन महिलांनी गर्दीचा फायदा घेत चोरून नेली. याबाबत स्नेहल सुभाष पारवे (वय २५, रा. बिबवेवाडी, पुणे) या महिलेच्या फिर्यादीवरुन शिवानी उर्फ भाग्यश्री तुकाराम चव्हाण (रा. परांडा) आणि तिची अनोळखी साथीदार महिला यांच्याविरुध्द अक्कलकोट उत्तर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ९ ऑगस्ट रोजी सायंकाळी स्नेहल पारवे या श्री स्वामी समर्थ मंदीरात दर्शनासाठी गेल्या होत्या. त्यावेळी गर्दीचा फायदा घेऊन शिवानी चव्हाण व तिची साथीदार या महिलांनी स्नेहल पारवे यांच्या गळ्यातील चैन व रोख रक्कम असा ३३ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. याबाबत अक्कलकोट उत्तर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार अंगुले हे पुढील तपास करीत आहेत.

# सीइओंच्या आदेशाला केराची टोपली

### ग्रामपंचायत अधिकारी ठरले सीइओंना वरचढ

### दोन महिन्यानंतरही पदभार सुटेना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

जिल्हा परीषदेकडून ग्रामपंचायत अधिकाऱ्यांची बदली होऊन दोन महिने झाले तरी अद्याप अनेक ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी पदभार न सोडता सीइओंच्या आदेशाला केराची टोपली

दाखवत सीइओंना वरचढ ठरत आहेत. विस्तार अधिकाऱ्यांच्या अर्थपूर्ण पाठबळामुळे ग्रामपंचायत अधिकारी पदभार सोडण्यास तयार नाहीत. त्यामुळे सीइओंच्या पारदर्शक बदल्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. जिल्हा परीषदेचे मुख्य कार्यकारी कुलदीप जंगम यांनी कृषी, शिक्षण, ग्रामपंचायत यासह विविध विभागातील बदली करताना त्यामध्ये पारदर्शकता आणून समायोजनाद्वारे कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून दिला. शिवाय अनुकंपा भरती करताना अनेक वर्षापासूनचा प्रलंबित विषय निकाली काढला. त्यामुळे सीइओंचा सर्वत्र कौतुक होत आहे. मात्र ग्रामपंचायत अधिकाऱ्यांची बदली होऊन दोन महिने उलटले तरी दक्षिण व उत्तर तालुक्यातील अनेक ग्राम पंचायत अधिकाऱ्यांची बदली होऊनही पदभार सोडण्यास तयार नाहीत. विस्तार अधिकाऱ्यांच्या पाठबळामुळे ग्रामपंचायत अधिकारी सीइओंच्या आदेशाला आव्हान देण्याचे काम करीत आहेत.



सीइओंच्या ग्रामपंचायत अधिकारी बदलीमुळे वीस वर्षापेक्षा अधिक काळ एकाच गावात ठाण मांडलेल्या ग्राम पंचायत अधिकाऱ्यांना दणका दिला होता. यावेळी बदली झालेल्या अनेक ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी सीइओंच्या आदेशाचे पालन करीत पदभार सोडला . मात्र एकाच गावात ठाण मांडलेल्या अनेक ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी दोन महिने झाले तरी विस्तार अधिकाऱ्यांशी संगनमत करून त्या गावातील कारभार सोडण्यास तयार नाहीत. त्यामुळे ग्रामपंचायतमध्ये भ्रष्टाचार वाढला आहे. ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांना चिरीमिरी देऊन ठराव घेण्यात येत आहे. मंद्रूपमधील ग्रामपंचायत अधिकारी स्वग्राम असल्याने व सात वर्षांपेक्षा अधिक कार्यकाळ झाल्याने त्यांची निंबर्गी बदली करण्यात आली. मात्र विस्तार अधिकाऱ्यांच्या वरदहस्तामुळे पदभार सोडण्यास तयार नाहीत. तर राष्ट्रवादीच्या एका नेत्यांच्या दबावामुळे एक ग्रामपंचायत अधिकारी दोन तालुक्यात नियमबाह्य कामकाज करीत आहे. त्यामुळे बदली प्रक्रीयेकडे दुर्लक्ष हयेत असल्याची चर्चा सुरू आहे.

### प्रशासनाकडे माहिती नाही

दोन महिन्यापूर्वी बदली झालेल्या ग्रामपंचायत अधिकारी पदभाराबद्दल प्रशासनसकडून माहीती विचारले असता ग्रामपंचायत व सीइओ कार्यालयाकडे फाइल गेल्याचे सांगण्यात येते. ग्रामपंचायत उप मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता माहीती घेऊन सांगणार असल्याचे उत्तर देण्यात येते. त्यामुळे ग्रामपंचायत अधिकारी पदभार प्रक्रीयाबाबत कर्मचाऱ्यांमध्ये संभ्रमावस्था दिसून येते. ग्रामपंचायत उप मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी पदभार प्रक्रीयेकडे गांभीर्याने पाहण्याची मागणी होत आहे.

### बँक खाते बंद करण्याची अंमलबजावणी करा

आषाढी वारी संपल्यानंतर जिल्हा परीषदेचे मुख्य कार्यकारी कुलदीप जंगम यांनी ग्रामपंचायत अधिकारी पदभाराकडे विशेष लक्ष देणार असून पदभार न सोडणाऱ्या गावांचीबँक खाते बंद करणार असल्याचे सागितले होते. सीइओंच्या अरदेशानंतरही ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी पदभार न सोडता आर्थिक कामकाज सेरू ठेवला आहे. त्यामुळे पदभार न सोडणाऱ्या गावांचे बँक खाते बंद करण्याची अंमलबजावणी करण्याची मागणी होत आहे,

## पूर्वाराधनेने राघवेंद्र स्वामी आराधना उत्सव सुरु

### तुळशी अर्चना आणि महामंगलारतीला भाविकांची गर्दी

### मठांमध्ये विविध धार्मिक कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट -**

सोलापूर : सोलापूर शहरात रविवारी सकाळी अष्टोत्तर पारायण, पंचामृत अभिषेक करत पूर्वाराधनेने रविवारी श्री राघवेंद्र स्वामी आराधना महोत्सवास भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला. मुरारजी पेठ आणि डफरीन चौक येथील श्री राघवेंद्र स्वामी मठांमध्ये पहाटेपासूनच धार्मिक




कार्यक्रम भक्तिमय वातावरणात झाले. रविवारी पहाटे ५.३० वाजता सुप्रभात, सकाळी ६ वाजता निर्माल्य विसर्जन करण्यात आले. सकाळी ७.३० वाजता भाविकांच्या उपस्थितीत अष्टोत्तर पारायण झाले. सकाळी ८ वाजता पाद्यपूजा झाल्यानंतर सकाळी ९ वाजता पंचामृत अभिषेकास प्रारंभ झाला. यानंतर दुपारी १२ वाजता तुळशी अर्चना करुन नैवेद्य दाखवण्यात आला. हस्तोदक, अलंकार, महामंगलारती झाल्यानंतर भाविकांना तीर्थप्रसादाचे वाटप करण्यात आले. यानंतर हजारो भाविकांना महाप्रसाद देण्यात आला. श्री राघवेंद्र स्वामी आराधना महोत्सवात रविवारी रात्री ८ वाजता पालखी सेवा, रथोत्सव, स्वस्तिवाचन, महामंगलारती व श्रेय प्रार्थना झाली. त्याचबरोबर गीता हेगडे व इतर सहकाऱ्यांचा भक्तीगीत कार्यक्रम सादर झाला. या कार्यक्रमास यात्रसंगी भाविकांनी मोठी गर्दी केली

## ट्रान्सफॉर्मरचे कॉईल्स चोरी करणारी टोळी जेरबंद

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; तीन गुन्हे उघडकीस

### ४ लाख ७० हजारांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट -**

ट्रान्सफॉर्मरमधील कॉईल्स चोरी करणारी आंतरजिल्हा टोळी पकडण्यास सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना यश आले असून या टोळीकडून ३ गुन्हे उघडकीस आले असून ४ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.




अमिर गुलाब शेख (वय ३९, रा. साठे नगर, मोहोळ सध्या रा. भंडीशेगाव, ता. पंढरपूर), समीर रफिक मुलाणी (वय २०, रा. मांजरी, ता. सांगोला) आणि अक्षय विजय माने (वय ३१, रा. तपकिरी शेटफळ, ता. पंढरपूर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. या तिघांकडून वळसंग पोलिस ठाण्यातील दोन आणि वालचंदनगर पोलिस ठाण्यातील एक गुन्हा उघडकीस आला आहे.

२७ जुलै रोजी कुंभारी (ता. दक्षिण सोलापूर) येथील रे नगर येथील जमीन गट नं. ८४७ मधील पाणी प्लांटमधील ५०० केव्ही च्या ट्रान्सफॉर्मरमधील धातूचे कॉईल्स व २०० लिटर ऑईल चोरट्यांनी चोरून नेले होते. याबाबत वळसंग पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी मिळालेल्या माहितीवरून कुंभारी येथून अमिर शेख, समीर मुलाणी व अक्षय माने या तिघांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडे चौकशी केली. त्यावेळी तिघांनी हा गुन्हा केल्याचे कबूल करून त्यांच्याकडून ट्रान्सफॉर्मरमधील क्वाईल व गुन्हा करताना वापरलेली एमएच १३ सीके १५९६ क्रमांकाची कार असा २ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तसेच इतर गुन्ह्यातील मुद्देमाल जप्त केला.

ही कारवाई पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर अधिक्षक प्रितम यावलकर, पोलिस निरीक्षक संजय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक विशाल वायकर, सहायक फौजदार प्रकाश कारटकर, हवालदार विरेश कलशेट्टी, पोलिस शिपाई बाळराजे घाडगे, अन्वर अत्तार, हरिष थोरात, राहुल दोरकर, सुनिल पवार यांनी केली.

## १९ वर्षीय मुलावर वार करून १२ हजार रुपये काढून घेतले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट -**

पंढरपूर तालुक्याती खर्डी येथे १९ वर्षिय मुलाला काही तरी खाऊ घालून त्यास उचलून रेल्वे ट्रॅकवर नेऊन त्याच्यावर धारदार शस्त्रांनी वार करून त्याच्याकडील रोख १२ हजार रुपये काढून घेणाऱ्या चौघांवर पंढरपूर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याबाबत बिरूदेव दत्तू पवार (वय ३५, रा. खर्डी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन राजेंद्र कावरे (वय ३५, रा. खर्डी) आणि इतर तीन अनोळखी व्यक्ती यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बिरूदेव पवार यांचा भाचा ओंकार बंडू कावरे (वय १९, रा. खर्डी) हा ८ ऑगस्ट रोजी रात्री बिरूदेव चौधरी यांच्या दुकानातून केस कापून बॅक ऑफ इंडियाच्या पाठीमागील बाजूस डांबरी रोडने घराकडे येत होता. त्यावेळी राजेंद्र कावरे व इतरांनी ओंकार यास काही तरी खाऊ घालून त्यास उपचलून रेल्वे ट्रॅकवर नेले. तिथे ओंकारच्या हातावर, पोटरीवर व पायाच्या टाचेवर धारदार हत्यारांनी मारून जखमी केले. तसेच ओंकार जवळ असलेले १२ हजार रुपये काढून घेतले. म्हणून पंढरपूर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक मुंडे पुढील तपास करीत आहेत.

## शेअर मार्केटच्या नावाखाली अडीच लाखांची फसवणूक




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट -**

शेअर मार्केटच्या नावाखाली महिलेची २ लाख ६० हजारांची फसवणुक करणाऱ्या महिलेविरुध्द अकलूज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अश्विनी दशरथ शहाणे (वय ३९, रा. सुजय नगर, अकलूज, ता. माळशिरस) या महिलेच्या फिर्यादीवरुन स्नेहल संजीव हेंद्रे (वय ३०, रा. यशवंत नगर, ता. माळशिरस) हिच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्नेहल हेंद्रे व अश्विनी शहाणे या दोघी एकमेकींना ओळखतात. २३ नोव्हेंबर २०२३ ते ९ ऑगस्ट २०२५ या कालावधीत स्नेहल हेंद्रे हिने अश्विनी शहाणे यांना शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतविते व मोठा आर्थिक फायदा करून देते असे सांगून शहाणे यांच्याकडून २ लाख ६० हजार रुपये घेतले. ते पैसे शहाणे यांनी परत मागितले असता हेंद्रे हिने उडवाउडवीची उत्तरे दिली. म्हणून अकलूज पोलिस ठाण्यात याबाबत फसवणुक केल्याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार साठे पुढील तपास करीत आहेत.

# तिरंगा रॅलीत २८० विद्यार्थ्यांनी चेतविले स्फुल्लिंग

### ‘हर घर तिरंगा’ अभियानांतर्गत पालिका क्रीडा विभागाचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट -**

‘हर घर तिरंगा’ अभियानांतर्गत महापालिका क्रीडा विभागाच्या वतीने काढण्यात आलेल्या तिरंगा रॅलीने नागरिक आणि विद्यार्थ्यांमध्ये देशाभिमानाचे स्फुल्लिंग चेतविले. भारत माता की जय, वंदे मातरम यासह विविध घोषणांनी वातावरण प्रफुल्लित झाले होते. शहरातील विविध शाळांमधील २८० विद्यार्थ्यांनी या रॅलीत सहभाग नोंदवला होता.

केंद्र शासनाच्या आदेशानुसार २ ते १५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार आणि अतिरिक्त आयुक्त रवि पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ‘हर घर तिरंगा’ अभियानांतर्गत विविध उपक्रम यशस्वीपणे राबवले जात आहेत. या अंतर्गत मनपा क्रीडा विभागाच्या वतीने आज सकाळी तिरंगा जनजागृती रॅली काढण्यात आली.चार हुतात्मा पुतळा चौक येथून या रॅलीस उत्साही वातावरणात प्रारंभ झाला. सुरुवातीला हुतात्मा मल्लप्पा धनशेट्टी, हुतात्मा किसन सारडा, हुतात्मा जगन्नाथ शिंदे, हुतात्मा अ.



रसूल कुर्बान हुसेन व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास महापालिका अतिरिक्त आयुक्त रवि पवार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर अतिरिक्त आयुक्त पवार यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून या रॅलीस शुभारंभ करण्यात आला. यावेळी महापालिकेचे क्रीडाधिकारी श्रीकांत घोलप, ॲथलेटिक्स असोसिएशनचे सचिव राजू प्याटी, हरिभाई देवकरण प्रशालेच्या मुख्याध्यापिका दीपा फाटक आदी मान्यवर उपस्थित होते. दरम्यान, डॉ. आंबेडकर चौक मार्गे पुढे डफरीन चौक येथे या रॅलीचा समारोप करण्यात आला.या रॅलीमध्ये हरिभाई देवकरण प्रशाला, सिद्धेश्वर प्रशाला, छत्रपती शिवाजी प्रशाला, दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला आणि गांधीनाथा स्कूल या शाळांमधील विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी हातात तिरंगा ध्वज व जनजागृती फलक घेऊन शहरवासीयांना देशप्रेमाचा संदेश दिला. देशभक्तीपर विविध घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. रॅलीत क्रीडा शिक्षक मारुती घोडके, प्रसन्न काटकर, शिवानंद सुतार, दादासाहेब म्हमाने, परमेश्वर बेडगे, सुभाष उपासे, संजय पंडित, अंकुशे, माणिक साळसकर, प्रकाश कंपली सहभागी झाले होते.

### देशभक्तीची भावना दृढ करण्यासाठी ‘हर घर तिरंगा’ अभियान : रवी पवार

यात्रसंगी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार म्हणाले, शहरातील नागरिकांमध्ये देशाभिमान, ऐक्य व एकात्मतेचा संदेश देण्यासाठी ही तिरंगा रॅली काढण्यात आली. हर घर तिरंगा अभियानास नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. ‘हर घर तिरंगा’ अभियान हे फक्त ध्वज फडकवण्यापुरते नसून नागरिकांमध्ये देशभक्तीची भावना दृढ करण्याचे साधन असल्याचे सांगितले. राष्ट्रध्वज हा भारताच्या ऐक्याचे, शौर्याचे आणि अभिमानाचे प्रतीक आहे. केसरी (भगवा) रंग शौर्य आणि त्यागाचे, पांढरा रंग शांतता आणि सत्यतेचे तर हिरवा रंग समृद्धी आणि सुपीकतेचे प्रतीक आहे. अशोक चक्र कायद्याचे राज्य आणि प्रगती दर्शवतो, असे ते म्हणाले.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# श्रीमद्भागवत हे भक्तीमय स्तोत्र होय : हभप डॉ. जयवंत बोधले महाराज

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १० ऑगस्ट-**

मानवी जीवनात जर खऱ्या अर्थाने प्रसन्नता, मनःशांती आणि समाधान हवे असेल, तर भगवंताच्या गुणांचे वर्णन हेच सर्वोत्तम साधन आहे. देवर्षी नारदमुनी महर्षी व्यासांना हाच उपदेश देतात. व्यासमुनींनी अनेक वेदांत ग्रंथांची निर्मिती केली, तरी त्यांच्या मनात अस्वस्थता होती. अखेर त्यांनी नम्रतेने नारदमुनींना विचारले- 'अनेक ग्रंथ लिहूनही समाधान का मिळत नाही?' तेव्हा नारदमुनी सांगतात - भगवंताचे सगुण वर्णन हेच सर्व दुःखांवरचे खरे औषध आहे. याच भावनेचा खुलासा श्रीगुरु डॉ. जयवंत महाराज बोधले यांनी श्रीमद्भागवत कथा चिंतन या विषयावर १६ व्या सत्रात केला. महाराज पुढे सांगतात, श्रीमद्भागवताच्या प्रथम स्कंधात नारदमुनींनी आपले जीवनचरित्र स्वतः सांगितले आहे. दासीपुत्र असलेले नारद बालपणी गावात आलेल्या साधूंच्या चातुर्मास सेवेत रत होते. सकाळच्या स्नानापासून रात्रीच्या विश्रांतीपर्यंतची सर्व व्यवस्था ते मनापासून करीत. या सेवेमुळे साधूंचा त्यांच्या जीवनावर गाढा अनुग्रह झाला. साधूंच्या मार्गदर्शनानुसार नारदजी अखंड नामजप करीत प्रवास करीत राहिले. या सातत्यपूर्ण साधनेमुळे त्यांना भगवंताचे दर्शन लाभले. भगवंताकडून प्रसादस्वरुप मिळालेली वीणा आजही त्यांच्या गळ्यात देव-भक्ताच्या मिलनाची साक्ष देते. भक्ताच्या अंत:करणात तीव्र श्रद्धा असेल तर भगवंत स्वत: भक्ताकडे येतात, भक्ताला भगवंताकडे जाण्याची आवश्यकता राहत नाही, असा डॉ. जयवंत महाराज भक्तीचा महिमा विशद करतात. नारदमुनी या अनुभवाचे सार सांगताना व्यासांना म्हणतात - मी केलेली संतांची सेवा आणि त्यांच्या मुखातून ऐकलेली भगवंत कथा हाच माझ्या जीवनातील सर्व बदलाचा मूळ कारण आहे. म्हणून माणसाने सतत सत्संग करावा आणि भगवंत चिंतनात रत राहावे. डॉ. जयवंत महाराज स्पष्ट करतात, सत्संग म्हणजे प्रत्यक्ष संतांचा संग. तो शक्य नसेल, तर संत ज्या क्षेत्रात वास्तव्यास आहेत त्या क्षेत्राचा संगही सत्संग होय. हेही जमत नसेल, तर संतांचे ग्रंथ वाचणे हा सत्संग; आणि तेही शक्य नसेल, तर संतांचे नामस्मरण करणे हाही एक श्रेष्ठ सत्संग आहे. यानंतर महर्षी व्यास सरस्वती नदीच्या काठी एकाग्रचित्ताने चिंतन करुन श्रीमद्भागवत रचतात. ते शुकाचार्यांना कथन करतात, आणि शुकाचार्य राजा परीक्षिताला भागवत सांगतात. आता प्रश्न उरतो - राजा परीक्षित कोण होते? त्यांनी भागवत कुठे ऐकले? त्यांच्या जीवनात काय घडले होते? आणि शुकाचार्यांनी त्यांना भागवत का सांगितले? या सर्व प्रश्नांची उत्तरे प्रवचनाच्या पुढील सत्रात उलगडणार आहेत.



श्रावणमास प्रवचनमाला
भाग - १६

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : सोमवार | दिनविशेष - श्रावणी सोमवार. |
| दि. १२ ऑगस्ट २०२५ | शिवामूळ - मूग |
| विक्रम संवत् २०८२ | शिवपूजन. |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - श्रावण कृ. | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| प्रतिपदा (१२.०९) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वर्षा | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - शततारका (१३.००) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - सुकर्मा (१८.५३) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बव (१९.३९) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** नवीन योजना कार्यान्वित होऊन त्या यशस्वी होतील. कायदेशीर वाद विवादातून योग्य मार्ग निघेल.

**वृषभ :** आगोदर केलेल्या कामाचा आज आपल्याला निश्चितच फायदा होणार असून आर्थिक आवक वाढणार आहे.

**मिथुन :** विचार पूर्वक कामे केली तर आजच दिवस चांगला जाईल. आपल्या कामाची स्तुती होईल. कौटुंबिक संबध सुधारतील. दुसऱ्याची निंदा करण्याचे टाळावे.

**कर्क :** कौटुंबिक समस्या आणि स्थावर मालमत्ता या संबंधीतील समस्या दूर होतील. समाजात प्रतिष्ठा मिळाल्याने आनंदी रहाल.

**सिंह :** व्यवसायामध्ये अनकूल अशी सफलता मिळेल. येणाऱ्या खर्चामुळे चिंतेत रहाल. खर्चामध्ये वाढ होईल.

**कन्या :** देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधपणा ठेवा. मुलांच्या बाबतीत काळजी वाटेल. देवाधर्मावरील विश्वास वाढेल.

**तुळ :** महत्वाचे काम हाती घेतले असेल तर ते पूर्ण होण्याचे योग आहेत. वाईट सवयींपासून दूर रहा. प्रवास यशस्वी होऊन आनंददायी राहील.

**वृश्चिक :** नवीन योजना आखल्यामुळे निश्चितच फायदा होणार आहे. मानसिक शांती मिळेल. सहचरणीची साथ लाभेल. मुलांच्या नौकरीची चिंता राहणार आहे.

**धनु :** आत्मविश्वासामध्ये वाढ झाल्याने कोणतेही काम सहजतेने करू शकाल.

**मकर :** भांडण, वादविवादामुळे मानसिक ताण वाढेल. आर्थिक स्थिती मध्यम राहील. पारिवारीक सहकार्याने कामात यश मिळेल.

**कुंभ :** मुलांच्या प्रगतीमुळे मन प्रसन्न राहील.

**मीन :** कामकाजामध्ये वाढ होईल अनकुल स्थिती राहणार आहे. वेळेचा चांगला उपयोग करून आपल्या आशा आकांक्षा पूर्ण करण्याच्या दृष्टीने काम काजाला सुरूवात करा.

# बसमध्ये चढणाऱ्या महिलेचे मंगळसूत्र चोरीस

**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

अक्कलकोट रेल्वे स्टेशन येथे एस टी बसमध्ये चढणाऱ्या महिलेच्या गळ्यातील ४० हजार रुपये किंमतीचे मंगळसूत्र चोरट्यांनी चोरून नेले. याबाबत श्रीमती सुनिता बाळू जावीर (वय ५०, रा. संगम नगर, तारदा रोड, हिंदुस्थान वॉटर फिल्टरसमोर, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अक्कलकोट दक्षिण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ८ ऑगस्ट रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास श्रीमती सुनिता जावीर या अक्कलकोट रेल्वे स्टेशन येथून एस टी बसमध्ये बसून अक्कलकोटला येत होत्या. त्यावेळी एस टी बसमध्ये चढताना चोरट्याने त्यांच्या गळ्यातील ४० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले. याबाबत अक्कलकोट दक्षिण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार दासरे पुढील तपास करीत आहेत.

# कव्हे गावात भक्ती-संस्कृतीचा उत्साह

## श्रावण महिन्यातील हनुमानाची यात्रा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १० ऑगस्ट-**

तालुक्यातील कव्हे गावात श्रावण महिन्यातील तिसऱ्या शनिवारी श्री हनुमान मंदिरात भरणारी भव्य आणि दिव्य यात्रा भक्ती, संस्कृती आणि उत्साहाचा अनोखा संगम घडवते.

यात्रेच्या पहिल्या दिवशी गुरव पुजारी पारंपरिक पद्धतीने श्री हनुमानाचा अभिषेक, पूजा आणि आरती करतात. मंत्रोच्चार, हनुमान चालिसा आणि भक्तिगीतांनी मंदिर परिसर दुमदुमतो. संध्याकाळी आयोजित 'शीत लागणे' हा अनोखा विधी भाविकांचे लक्ष वेधतो. या विधीत पुजारी पुढील काळातील धनधान्य, पाऊस आणि समृद्धी यांचे अंदाज व्यक्त करतात.संध्याकाळी गावात सांस्कृतिक फेरीचा थाट पाहायला मिळतो. पारंपरिक सोंगे, लोकनाट्यांचे रंगीत प्रसंग आणि बैलगाड्यांमधून सादर होणारे नाट्यदृश्य



गावकऱ्यांचे मन मोहून टाकतात. गावातील प्रत्येक गल्लीत नर्तिका आपल्या गाण्यांच्या सादरीकरणाने वातावरणाला रंगत आणतात. गावकरी आणि लहान मुले या फेरीत उत्साहाने सहभागी होतात. ज्यामुळे यात्रेची शोभा द्विगुणित होते. पोवाडे आणि भारुड यांच्या कार्यक्रमात स्थानिक कलाकार छत्रपती शिवाजी महाराज, संत तुकाराम आणि अन्य ऐतिहासिक व्यक्तींच्या गाथा सादर करतात. हे सादरीकरण भक्ती आणि राष्ट्रप्रेमाची भावना जागवतात. पंचक्रोशीतील मल्ल एकमेकांशी दोन हात करताना प्रेक्षकांचा उत्साह शिगेला पोहोचतो. कुस्त्यांचे सामने पाहण्यासाठी गावकरी आणि परिसरातील लोक मोठ्या संख्येने जमलेले असतात. याशिवाय, यात्रेत खाद्यपदार्थांचे स्टॉल्स, पारंपरिक वस्तूंची दुकाने आणि लहान मुलांसाठी खेळ यामुळे सर्व वयोगटातील लोकांचे मनोरंजन होते. प्रसाद वाटप आणि भजन-कीर्तन यांचा सोहळा या दिवशीही भक्तीची गोडी वाढवतो. यावर्षीही गावकऱ्यांनी स्वच्छता, सुरक्षितता आणि व्यवस्थित नियोजन याची काळजी घेतल्याने यात्रा शांततेत आणि आनंदात पार पडली. मंदिर परिसरात रंगीबेरंगी सजावट, भक्तिमय गीते आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांनी यात्रेला अविस्मरणीय बनवले. श्री हनुमान मंदिराची ही यात्रा केवळ धार्मिक उत्सवच नाही, तर गावकऱ्यांच्या एकजुटीचे, भक्तीचे आणि सांस्कृतिक वैभवाचे प्रतीक आहे. मारुतीरायाच्या कृपेने आणि गावकऱ्यांच्या उत्साहाने हा सोहळा दरवर्षी अधिक भव्य आणि दैदिप्यमान होत आहे.

# ॲट्रासिटी प्रकरणातील ४२० जणांना सव्वासात कोटींचे अनुदान वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

शहर-जिल्ह्यात अनुसूचित जाती-जमाती प्रतिबंधक (ॲट्रॉसिटी) कलमान्वये दाखल झालेल्या गुन्ह्यातील ४२० पीडितांना सात कोटी २८ लाख ७५ हजार रुपयांचे अनुदान वितरित केले आहे. जिल्ह्यात सर्वाधिक गुन्ह्यांचे प्रमाण हे माळशिरस तालुक्यातील आहेत. शहर-जिल्ह्यात गेल्यावर्षी अनुसूचित जाती-जमातीतील ४२० पीडितांची संख्या आहे. यांच्यावर अन्य समाज घटकातील लोकांकडून जातीय द्वेषातून इजा करणे, त्रास, अपमान, नग्न धिंड काढणे, घरास आग लावणे, महिलांचा विनयभंग करणे, महिलांचा लैंगिक छळ करणे आदी प्रकारच्या गुन्ह्यातील पीडितांना शासनाच्या सामाजिक न्याय विभागाकडून आर्थिक सहाय्य दिले जाते. याच प्रकरणातील पीडितांना आर्थिक सहकार्यासाठी अनुदानाची मागणी केली होती. त्यानुसार मागील आर्थिक वर्षात सात कोटी २८ लाख ७५ रुपयांचे अनुदान प्राप्त होताच त्याचे वाटप केले. शहर जिल्ह्यातील या गुन्ह्यातील पीडितांना मुख्यालयाकडून आलेली रक्कम त्यांनी दिलेल्या बँक खात्यात थेट जमा केली जाते.

> ॲट्रॉसिटी दाखल झालेल्या गुन्ह्याचा अहवाल या कार्यालयाला प्राप्त झाला की, त्याची माहिती वरिष्ठ कार्यालयाला दिली जाते. वरिष्ठ कार्यालयाकडून जसे अनुदान प्राप्त होते, तसे संबंधित पीडितांच्या बँक खात्यावर पैसे वर्ग केले जातात.
> **- सुलोचना सोनवणे** महाडिक, सहाय्यक आयुक्त, सामाजिक न्याय विभाग

# कृष्णाली आणि शिवकृपाच्या वतीने इको फ्रेंडली गणेशमूर्ती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**



येथील कृष्णाली आणि शिवकृपा संस्थेच्या वतीने शास्त्रोक्त व पर्यावरणपूरक (इको फ्रेंडली) श्रीगणेश मूर्ती विक्री उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. वृक्षविनायकच्या मूर्ती सुबक, प्रसन्नता देणारी व मांगल्य आणणाऱ्या या मूर्ती वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

विविध मातीच्या मिश्रणापासून बनवलेली या मूर्ती बनवल्या आहेत. या मूर्ती घरच्या घरी विसर्जन करता येण्यासारख्या आहेत. तसेच या मूर्ती पाण्यामध्ये पूर्णपणे विरघळतात. या विरघळलेल्या मूर्तीची माती झाडांसाठी वापरता येते. पूर्णपणे नैसर्गिक रंगद्रव्यांनी रंगवलेली ही मूर्ती असणार आहे. विविध प्रकाराच्या मूर्ती बाळीवेस परिसरातील काडादी हॉस्पिटल जवळ या पाहण्यास उपलब्ध करण्यात आल्या आहेत. या मूर्तीच्या विक्रीतून होणाऱ्या नफ्यातून सामाजिक उपक्रमास मदत केली जाते. मूर्तीच्या नोंदणीसाठी ८२३७६७४६८९ (आनंदी विभूते), ९८९०९५५३४३ (वैशाली गुंड) या क्रमांकावर संपर्क साधावेत. दरम्यान उद्योजक जगदेवी संदिप कारंजे यांच्या हस्ते गणेश मूर्ती प्रदर्शन आणि विक्री केंद्राचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी वैशाली गुंड, शोभा मार्कंडेय, श्रीदेवी पाटील, पुष्पा छपरे, राजलक्ष्मी छपरे, आनंदी विभूते, समृद्धी गुंड, आभा विभूते, रेखा जाधव, अक्षय पिसे, प्रतीक छपरे उपस्थित होते.

# कथामालेतर्फे शिक्षक पुरस्कारासाठी आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

साने गुरुजी कथामालेतर्फे २५-२६ या वर्षासाठी गुणवंत शिक्षक पुरस्कारासाठी परिचय पत्र मागविण्यात येत आहेत.किमान दहा वर्षे अध्यापन अनुभव असणाऱ्या शिक्षकांनी आपली परिचय पत्रे व दोन फोटो पाठवावेत. सोलापूर जिल्ह्यातील प्राथमिक,माध्यमिक,व उच्च माध्यमिक विभागातील शिक्षकांना परिचय पत्रे पाठविता येतील. कथामालेच्या कोणत्या उपक्रमात सहभागी होता? याची नोंद त्या परिचयपत्रात असणे आवश्यक आहे. पात्र शिक्षकांनी येत्या २० ऑगस्ट पर्यंत डॉ.रामचंद्र नामदेव धर्मसाले ६१९/२० आदित्यनगर, विजापूर रोड सोलापूर ४१३००४, ९९२२८८३४४१ या पत्त्यावर आपले परिचय पत्र पाठवावे, असे आवाहन कथामाला अध्यक्ष अशोक खानापुरे यांनी केले आहे.




# वाचन चळवळीचे कार्य काळाची गरज

## अय्यूब अहमद; नूर ट्रस्टतर्फे पुस्तक वाटप कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

सर्वत्र मोबाईलचा बोलबाला आहे. त्यातून लहान मुलां-मुलींना मुक्त करायचे असेल तर वाचन चळवळ हा एक उपायकारक प्रयाय आहे ही चळवळ काळाची गरज आहे, असे मत उर्दू-मराठीचे ज्येष्ठ साहित्यिक अय्यूब अहमद नल्लामंदू यांनी व्यक्त केले.

नूर सोशल वेल्फेर ट्रस्टच्या माध्यमातून बेनजीर वाचन चळवळच्या वतीने जिल्हा परिषद व खासगी शाळांच्या मुला-मुलींमध्ये वाचनाची गोडी लावण्यासाठी उर्दू साहित्यातील विविध प्रकारच्या मोफत पुस्तकाचे वाटप उर्दू घर येथे संपन्न झाला, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर शहर काझी मुफ्ती अमजद अली, विस्तार अधिकारी दौलतबी शेख, शब्बीर शेख, निलोफर सय्यद, नूर टस्टचे नजीर मुन्शी, इक्बाल अन्सारी, डॉ. शफी चोबदार, डॉ. जैनोद्दीन पटेल, महेमूद नवाज, मुनाफ शेख हे उपस्थित होते. बेनजीर तहरीके मुतालेआचे पोस्टरचे प्रकाशन करत कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले प्रारंभी अ. मन्नान शेख यांनी कुराण पठण केले. प्रा. डॉ. शफी चोबदार, प्रा. महेमूद नवाज यांनी सर्व पाहुण्यांचे शाल बुके देऊन स्वागत केले. प्रमुख पाहुणे शहर काझी अमजद अली म्हणाले, सु-संस्कृत समाज व पिढी घडविण्यासाठी वाचन संस्कृतीशी विद्यार्थ्यांना जोडण्याचे कार्य नूर ट्रस्टच्या माध्यमातून होत आहे हे कार्य कौतुकास्पद आहे. यावेळी शफी कॅप्टन, मजहर अल्लोळी, बशीर बागबान, इम्रान जमादार, अबुबकर नल्लामंदू, मजीद शेख, साहीर नदाफ, सुहेल नाईक, जुबेर जनवाडकर, मसूद सिद्दीकी, अश्रफ पटेल, अख्तर शेख, कलीम भाटगर, अली नल्लामंदू, रिजवान शेख उपस्थित होते. सुत्रसंचलन फहीम बाटघर यांनी केले तर आभार डॉ. शफी चोबदार यांनी मानले.

# युनिक स्कूलमध्ये चित्रकला स्पर्धेस प्रतिसाद

## ५०० विद्यार्थ्यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

डी. एस. टी. एस. मंडळ संचालित युनिक इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये कै. वि. गु. शिवदारे अण्णा यांच्या स्मृती समारोह निमित्त चित्रकला व रंगभरण स्पर्धा शाळेच्या प्रांगणात आयोजित करण्यात आली. त्यात चांगला प्रतिसाद मिळाला.



स्पर्धेचे प्रमुख पाहुणे कर्मयोगी आप्पासाहेब काडादी चित्रकला महाविद्यालयाचे प्राचार्य सचिन गायकवाड यांच्या हस्ते चित्रकला स्पर्धेचे उद्घघाटन करण्यात आले.अध्यक्षांच्या हस्ते वृक्षारोपण, आकाशात फुगे उडवून उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे विश्वस्त भीमाशंकर शेटे यांनी मनोगत व्यक्त केले. या स्पर्धेमध्ये सोलापूर मधील २० शाळेमधून ५०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. संस्थेचे संस्थापक राजशेखर शिवदारे विद्यार्थ्यांचे कौतुक केले. शाळेच्या शैक्षणिक सल्लागार अंजली तिवारी शाळेच्या सदस्या डॉ. शुभदा उपासे, सिद्धेश्वर सहकारी बँकेचे अध्यक्ष नरेंद्र गंभीरे, सिद्धाराम जोडभावी, सुभाष मुनाळे, डॉ. सुत्रावे, कापसे, श्रुती गायकवाड, आर.वाय. पाटील उपस्थित होते.

मुख्याध्यापिका पूजा बाजपाई या सर्वांनी कार्यक्रमासाठी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन शाळेच्या विद्यार्थ्यांनी गायत्री जंम्बगी व शुभ्रा चव्हाण, कुमार तन्मय वनवे यांनी आभार मानले.



# व्हॅलेंटाईन स्कूलमध्ये खेळाडूंचा रक्षाबंधन सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मिडीयम स्कूल मध्ये खेळाडूंचा रक्षाबंधन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापिका जी. एच. कल्याणी, उपमुख्याध्यापिका मिना दुधनीकर, पर्यवेक्षिका सुनिता मंद्रुपकर व नागमणी पेगडा उपस्थित होते. इयत्ता ९ वी व १० वीच्या खेळाडू विद्यार्थ्यांना व क्रीडा शिक्षकांना राखी बांधली. विद्यार्थ्यांनी त्यांच्या बहिणीना चॉकलेट व जिलेबी व गिफ्ट देऊन सर्वांचे आभार मानले. यावेळेस क्रीडा विभाग प्रमुख संतोष पाटील व मोनिका जाधव व सहशिक्षक भगतलाल सुतार उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष उमाकांत मेंढापूरे उपाध्यक्ष यमुना दिड्डी, सचिव संतोष गड्डम व सहसचिव नागेश शेंडगे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

# लॉटरी पध्दतीने कृषी औजारांची उद्या निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ ऑगस्ट-**

जिल्हा परिषद सोलापूर कृषी विभाग यांचे मार्फत जि.प.सेस फंडातुन मंगळवार, दि. १२ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वाजता मुख्य कार्यकारी अधिकारी, व अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. सोलापूर यांचे उपस्थितीत औजारासाठी बाबनिहाय लक्षांकानुसार लॉटरी पध्दतीने शाळकरी मुलांकडून लाभार्थ्यांची निवड चिठ्ठी काढण्यात येणार आहे.

पिक संरक्षण औजारे/उपकरणे (श्री पिस्टन स्प्रे पंप, पॉवर स्प्रेपंप, नॅपसॅक बेटरी ऑपरेटेड स्प्रेपंप, ब्रश कटर, सोलार इन्सॅक्ट ट्रॅप), ट्रॅक्टर चलित औजारे ( रोटाव्हेटर, पल्टी नांगर, रोटरी टिलर/विडर, पेरणी यंत्र ), कृषि सिंचनासाठी सुधारित औजारे साधने पुरविणे. (५ एच पी सबमर्सिबल विदयुत पंपसंच, डिझेल इंजिन) कृषि सिंचनासाठी सुधारित औजारे साधने पुरविणे कडबाकुटटी, ताडपत्री, मधुमक्षीका पेटी (२५ टक्के), स्लरी फिल्टर) सेंद्रीय शेती (हिरवळीचे खतबियाणे, ताग, धेचा, गांडूळ, कल्चर व बेड) ५० टक्के मर्यादित अनुदानावर उ्हढ तत्त्वावर देण्यात येणार आहेत. वरील औजारासाठी शेतक-यांना पंचायत समिती स्तरावर अर्ज करण्यासाठी दि.३० जून २०२५ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आलेली होती. सदर योजनेकरिता तालुकानिहाय एकुण उदिष्ट २ हजार ४५९ असुन प्राप्त अर्जाची संख्या २१ हजार ५५४ इतकी आहे. यावेळी शेतक-यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन अति. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. सोलापूर व कृषी विकास अधिकारी जि.प. सोलापूर यांनी केले आहे.



# एसटी कामगार व आश्रमातील आजोबांना राखी बांधत बहिणींनी दिल्या शुभेच्छा

**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

रक्षाबंधन हा भाऊ-बहिणीच्या प्रेम, आपुलकी आणि जिव्हाळ्याचा सण. या निमित्ताने आस्था रोटी बँक व आस्था फाऊंडेशन संस्थापक विजय छंचुरेतर्फे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे एसटी कामगार आणि आश्रमामधील आजोबांना राखी बांधत शुभेच्छा देण्यात आल्या. एसटी कामगार हे राज्याच्या कानाकोपऱ्यातील प्रवाशांना सुरक्षितपणे व वेळेत त्यांच्या गंतव्यस्थानी पोहोचविण्यासाठी दिवस-रात्र अविरत सेवा देतात. त्यांचे हे योगदान समाजासाठी मोलाचे आहे. तसेच, आश्रमातील ज्येष्ठ नागरिक आपले अनुभव, संस्कार आणि माया पुढील पिढीकडे पोहोचविणारे अमूल्य ठेवे आहेत. एसटी महामंडळ यांना कुठले सणवार माहीत नसतात ते सकाळी उठले की ड्युटीला येतात आणि त्यांना ते सणवार माहित पडत नाहीत म्हणून आस्था रोटी बँक यंदाची राखी पौर्णिमा एसटी महामंडळ मधील कंडक्टर ड्रायव्हर वर्कशॉप मधील काम करणारे कामगार व तसेच प्रवाशांना सुद्धा राखी बांधण्यात आले आहे. यावेळी एसटी महामंडळाचे सोलापूर डिव्हिजनचे जिनदोडे कांबळे उपस्थित होते. आस्था रोटी बँकेचे नीलिमा हिरेमठ, छाया गंगणे, स्नेहा मेहता, नेता आकुडे, संगीता छंचुरे, विजयालक्ष्मी शिंदगी, विद्या स्वामी, अर्चना कांबळे, सपना कांबळे, अरुण गवळी या सर्वांनी रक्षाबंधनानिमित्त सर्व बांधवांना राखी बांधल्या तसेच आस्था रोटी बँकेचे कार्यकर्ते प्रकाश डोंगरे व पुष्कर पुकाळे यांनी मोलाचे कार्य केले आहे.

# 'हर्र बोला हर्र' च्या जयघोषात ६८ लिंग पदयात्रा

## महिला व मुलींच्या संरक्षणाबरोबरच सुख, शांती आणि एकात्मतेसाठी साकडे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

तिसऱ्या श्रावणी रविवारचे औचित्य साधून ६८ लिंग भक्त मंडळ आणि वीरशैव व्हिजनच्या संयुक्त विद्यमाने ग्रामदैवत शिवयोगी श्री सिध्दरामेश्वरांनी पंचक्रोशीत स्थापन केलेल्या ६८ लिंग पदयात्रा 'हर्र बोला हर्र...' च्या जयघोषात काढण्यात आली. राज्यातील महिला व मुलींच्या संरक्षणाबरोबरच सोलापूरच्या सुख, शांती आणि एकात्मतेसाठी साकडे घालण्यात आले.



सकाळी ७ वाजता ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर यांची आरती व पूजन करून पदयात्रेचा शुभारंभ करण्यात आला तर पदयात्रेचा समारोप दुपारी ३ वाजता श्री मल्लिकार्जुन मंदिर येथे आरती व पूजन करून करण्यात आला. पदयात्रेच्या मध्यंतरात चाटी गल्ली येथील बुबणे जैन मंदिर येथे आस्था सामाजिक संस्थेचे अध्यक्ष आनंद तालिकोटी यांच्यातर्फे फराळ व चहापान देण्यात आले. पदयात्रा समारोपाच्या ठिकाणी शांतविर भजन मंडळाचे अध्यक्ष मल्लेश पेद्दी यांच्या वतीने फराळ देण्यात आले.

यावेळी बसवराज सावळगी, अध्यक्ष शिवानंद सावळगी, राजशेखर बुरकुले, संजय साखरे, विजयकुमार बिराजदार, अरुण पाटील, मन्मथ कपाळे, अमित चव्हाण, गंगाधर झुरळे, आनंद जाधव, श्रीनिवास बल्ला, रमेश अलकुंटे, संजय फुले, एकनाथ पवार, सिद्धाराम वच्चे, संजय विजापुरे महेश माळगे-स्वामी, बसवराज बेऊर, धानेश सावळगी, मल्लिनाथ सोड्डे, महेश गुड्डद, दीपक पटणे, महादेव कलशेट्टी, प्रिया शेटे, श्वेता दोडमनी, स्नेहा दोडमणी, अंजली जाधव, श्रुती इगडे, अर्पिता गंगदे, अश्विनी यादवाड, ऐश्वर्या कालदीप, गायत्री गुंजले आदी उपस्थित होते.

# विभागीय आयुक्तांच्या आदेशाने येणकीच्या सरपंचास दणका

## बोगस ग्रामसभा दाखवत बियरबारला प्रमाणपत्र देणे भोवले

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.१० ऑगस्ट-**

बोगस ग्रामसभा दाखवून बियरबारला ना-हरकत प्रमाणपत्र देणाऱ्या येणकी (ता. मोहोळ)चे सरपंच पोपट केशव जाधव यांना विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी थेट सरपंच व सदस्यपदावरून काढून टाकण्याचा आदेश काढला.

विभागीय आयुक्तांनी या सरपंचाला घरी बसवल्याने हा मोहोळ तालुक्यातील प्रस्थापित नेत्यांना एक प्रकारचा धक्का मानला जात आहे. येणकी गावचे उपसरपंच आकाश खरात यांनी याबाबत तक्रार केली होती. माजी सरपंच ज्येष्ठ नेते हरिभाऊ घुले यांनी ही हे प्रकरण लावून धरले होते. सदर प्रकरणात यापूर्वी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी ग्रामसेवक एन व्ही काशीद यांना निलंबित केले आहे.

सरपंच आणि ग्रामसेवकाने संगणमताने ११ एप्रिल २० २२ रोजी बोगस ग्रामसभा दाखवून राजरत्न बियर बार साठी ना हरकत प्रमाणपत्र दिले होते. त्या विरोधात उपसरपंच खरात यांनी गटविकास अधिकाऱ्यांकडे तक्रार केली होती. हे प्रकरण नंतर ग्रामपंचायत उपमुख्य कार्यकारी अधिकारी त्यानंतर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे जाऊन या प्रकरणाची चौकशी झाली. ग्रामसभेची दवंडी देणारे शिवाजी संभा वाघमारे यांनी दोन वेळा दिलेले प्रतिज्ञापत्र यामध्ये सुद्धा तफावत दिसून आली.त्याचबरोबर ग्रामसभेला हजर आहेत असे ज्यांचे रेकॉर्ड केले त्यापैकी २९ जणांनी शंभर रुपयांच्या प्रतिज्ञा पत्रावर बॉण्ड करून देऊन सांगितले की आम्ही या सभेला हजर नव्हतो त्यामुळे हा एक भक्कम पुरावा पोपट जाधव यांची हकालपट्टी करण्यासाठी उपलब्ध झाला. या प्रकरणात ग्रामपंचायतीने ग्रामसभा ठराव, ग्रामसभा अजेंडा, ग्रामसभा उपस्थिती पत्रक, ग्रामसभा दवंडी रजिस्टर हे प्रत्येक वर्षी नवीन तयार करणे, ग्राम सभेबाबतचे व्हिडीओ चित्रीकरण करावे असे निर्देश असताना ११ एप्रिल २०२२ रोजीच्या ग्रामसभेचे व्हिडीओ चित्रीकरण न करणे, शिस्तभंगाचे कारवाईस पात्र असल्याचे कारण पुढे करीत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ग्रामसेवक काशीद यांना निलंबन केले होते.

सरपंच जाधव यांच्याविरुद्धचे प्रकरण विभागीय आयुक्त यांच्यासमोर चालू होते त्यांनी ५ ऑगस्ट रोजी या प्रकरणात निकाल दिला. या निकालात पोपट केशव जाधव, सरपंच, ग्रामपंचायत येणकी, ता. मोहोळ, जि. सोलापूर यांना ग्रामपंचायतीचे उर्वरित कालावधीसाठी ग्रामपंचायतीचे सरपंच व सदस्य पदावरुन काढून टाकणेत आले असे म्हटले आहे.



## 'ओंकार'चे इथेनॉल टँकर मध्यप्रदेश गुजरातकडे पहिले पाच टँकर रवाना

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. १० ऑगस्ट**

चांदापुरी (ता.माळशिरस) येथील ओंकार साखर कारखान्यात इथेनॉल या उपपदार्थाची निर्मीती सुरु करणयात आली आहे. ओंकार परिवाराचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील, संचालीका रेखाताई बोत्रे पाटील व संचालक प्रशांत बोत्रे पाटील यांच्या संकल्पनेतून हा प्रकल्प उभारण्यात आला आहे. यामुळे शेतकऱ्यांना चांगला दर देणे शक्य आहे. चांदापुरी येथील ओंकार कारखान्यात नुकताच १५० लाख के.एल.पीचा इथेनॉल प्रकल्प कार्यान्वित झाला असुन यामधुन तयार झालेले इथेनॉलचे पहील्या पाच टँकर रिलायन्स इंडस्ट्रीज मध्यप्रदेश व नायरा ग्रुप गुजरात येथील पेट्रोलियम कंपन्याकडे संचालक प्रशातराव बोत्रे पाटील यांच्या हस्ते पुजन करुन पाठविणयात आले .यामुळे ओंकार परिवारासध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. यावेळी कारखान्याचे जनरल मॅनेजर भिम राव वाघमोडे, डिस्लरी मॅनेजर पि डी पाटील, संजय देशमुख, सावता शिंदे ,मेजर मोहन घोडके उपस्थित होते.

## सावळेश्वर येथे साडेपाच कोटींच्या विकासकामांचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. १० ऑगस्ट-**

सावळेश्वर (ता. मोहोळ) येथे साडेपाच कोटींच्या विविध विकासकामांचे उद्धाटन भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष तथा अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याण शेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी माजी आमदार राजन पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) चे सोलापूर शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार, सरपंच सखाराम साठे आदीसह मान्यवर उपस्थित होते. यावेळी आमदार कल्याणशेट्टी म्हणाले, तालुक्याच्या तसेच गावच्या राजकारणात मला काही रस नाही. मी पक्षाचा आदेश मानणारा कार्यकर्ता आहे. मोहोळच्या विकासासाठी मी तत्पर आहे. जिल्ह्याच्या राजकारणात आजही राजन पाटील यांचा शब्द प्रमाण मानला जातो. त्यामुळे माजी आमदार पाटील यांच्या पाठीशी राहून तालुक्यात विकास निधी देणार आहे. यावेळी माजी आमदार पाटील यांनी केवळ अनगरकरांना विरोधासाठी विरोध म्हणून अपप्रचार करून निगेटिव्ह मतदान झाल्यामुळे लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत आमचा पराभव झाला. मात्र अशा विरोधकांना उत्तर देण्याएवढा मी मोठा नेता नाही अशी खोचक टीका केली. शहर जिल्हाध्यक्ष पवार याचेही भाषण झाले. सरपंच साठे यांनी जल सुविधा, स्मशानभूमी, पाणंद रस्ता, रस्ता मुर्मीकरण, ग्रामपंचायत कार्यालय, देवस्थान विकास, दलित वस्ती सुधार, तांडा योजना अशी साडे पाच कोटी रुपयांच्या गावच्या विकासाची गंगा चालू ठेवण्यासोबत सामाजिक सलोखा असल्याची परंपरा कायम ठेवणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमास परिसरातील राजकीय पदाधिकारी नागरिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बार्शीत बाल संरक्षण कक्षातर्फे कार्यशाळा यशस्वी



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१० ऑगस्ट-**

जिल्हा महिला व बालविकास विभाग सोलापूर, बाल संरक्षण कक्ष आणि महात्मा गांधी प्रशिक्षण संस्था पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने बार्शी तालुक्यातील अंगणवाडी सेविका, ग्रामसेवक आणि पोलीस पाटील यांच्यासाठी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. ही कार्यशाळा यशवंतराव चव्हाण सभागृह, बार्शी येथे संपन्न झाली.

कार्यशाळेचे उद्घाटन बार्शी ग्रामीण प्रकल्पाच्या बालविकास प्रकल्प अधिकारी प्रतिभा साखरे व भुजंग चिंताकोठे यांच्या हस्ते तर पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी बाल कल्याण समितीच्या सदस्य सुवर्णा कोकरे, जिल्हा बालसंरक्षण अधिकारी रेश्मा गायकवाड, संरक्षण अधिकारी अमोल जमदाडे, ॲड. श्वेता भादुले, सुजाता अंधारे तसेच बार्शी तालुका पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीप ढेरे हे मान्यवर उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात प्रतिभा साखरे यांनी बालकांवर कोणताही अन्याय होणार नाही याची जबाबदारी अंगणवाडी सेविकांवर असून, एक सुदृढ समाज घडवण्यासाठी बालकांचे संरक्षण अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले. पोलीस निरीक्षक कुकडे यांनी बार्शी तालुक्यात बालविवाहाचे प्रमाण अधिक असल्याची माहिती दिली.

या कार्यशाळेत बाल न्याय (काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५, बाल लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण कायदा २०१२ (POCSO), आणि बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. ॲड. श्वेता भादुले ॲड. सुवर्णा कोकरे यांनीही मार्गदर्शन स्पष्ट केले. नियोजन बाल संरक्षण कक्षातील पल्लवी वटाणे व प्रसाद बलकुरमठ, जगन्नाथ जाधव यांनी केले.

## कल्याणशेट्टी महाविद्यालयात क्रांती दिनानिमित्त अभिवादन



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१० ऑगस्ट-**

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयात इतिहास अभ्यास मंडळ व प्राध्यापक प्रबोधिनीच्यावतीने ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. स्वातंत्र्य चळवळीस गती देण्यासाठी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी १९४२ मध्ये चले जाव अशी घोषणा देऊन ब्रिटिश सत्तेला शेवटचा इशारा दिला. त्यामुळे इंग्रजांची सत्ता अखेरचा श्वास घेऊ लागली असे यावेळी इतिहास अभ्यास मंडळाच्या चेअरमन प्राध्यापिका मधुबाला लोणारी यांनी आपल्या भाषणातून सांगितले. कार्यक्रमाचे प्रस्तावित प्राध्यापक प्रबोधिनीचे चेअरमन प्रा. डॉ. बाळासाहेब पाटील यांनी केले आभार प्रा. विद्याश्री वाले यांनी मानले कार्यक्रमास प्रा. सौरभ भस्मे, प्रा. विद्या बिराजदार, प्रा. शीतल फुटाणे व बालाजी कांबळे उपस्थित होते. या उपक्रमाबद्दल संस्थेचे अध्यक्ष विद्यमान आमदार सचिन कल्याणशेट्टी, संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसुती, ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्राचार्य डॉ. एस आर. लोखंडे, पूनम कोकळगी, रूपाली शहा व मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी कौतुक केले.

## शिक्षक संतोष कमळे यांच्यावर कारवाई करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळ संचलित जीवन विकास प्रशाला भंडारकवठे येथील सहशिक्षक संतोष महादेव कमळे यांची शिक्षक मान्यता बनावट व बेकायदेशीर असल्याने त्यांची सन २०१८ मध्ये चौकशी झाली होती. त्या चौकशी अहवालामध्ये त्यांची मान्यता बेकायदेशीर असल्याने मान्यता रद्द करण्यासाठी तत्कालीन शिक्षण अधिकारी सत्यवान सोनवणे यांनी पुढील निर्णयास्तव विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालय पुणे येथे पाठवले. परंतु आजपर्यंत कारवाई न झाल्याने सामाजिक कार्यकर्ते सोनाली सुपेकर यांनी शिक्षणाधिकार्यांकडे तक्रार केली आहे.

याच शिक्षण संस्थेतील जीवन ज्योत प्रशाला कंदलगाव येथील मुख्याध्यापक पिरप्पा मारुती कमळे त्यांची नियुक्ती सन २०१६ मध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गातून मुख्याध्यापकपदी जात वैधता प्रमाणपत्र एक वर्षाच्या सादर करण्याच्या अटीवरती मुख्याध्यापक कमळे यांना नियुक्ती दिली होती.

कमळे यांनी आजपर्यंत जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही. त्यामुळे शिक्षणाधिकार्यांनी संतोष कमळे व पिरप्पा कमळे यांच्यावर कारवाई करावे. अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालया समोर आत्मदहन करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्त्या सोनाली सुपेकर यांनी दिला आहे.

## प्राध्यापिकांनी बांधल्या स्वामी भक्तांना राख्या

**कल्याणशेट्टी महाविद्यालयातील प्राध्यापक प्रबोधिनी विभागाचा उपक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १० ऑगस्ट-**

कल्याणशेट्टी महाविद्यालयातील प्राध्यापक प्रबोधिनी विभागाच्या वतीने श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांना प्राध्यापिकांनी राखी बांधून त्यांचा आनंद द्विगुणित केला. स्वामी समर्थ समाधी मठ परिसरात राखी पौर्णिमेनिमित्त रक्षाबंधनाचा उपक्रम प्राध्यापक प्रबोधिनीच्या वतीने आयोजित करण्यात आला होता.

यावेळी प्रबोधिनीचे चेअरमन प्रा डॉ बाळासाहेब पाटील, प्रा सौरभ भस्मे, प्रा मधुबाला लोणारी, प्रा शीतल फुटाणे,बालाजी कांबळे उपस्थित होते. स्वामी भक्तांना प्रा विद्याश्री वाले, प्रा विद्या बिराजदार यांनी राख्या बांधल्या. आज खरंच आम्हाला आमची बहीणच भेटली आहे, अशी भावना स्वामीभक्तांनी व्यक्त केल्या. या उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष विद्यमान आमदार सचिन कल्याणशेट्टी, संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसुती, प्राचार्य डॉ. एस आर लोखंडे, जूनियर महाविद्यालय विज्ञान विभाग प्रमुख पुनम कोकळगी सेमी इंग्लिश विभाग प्रमुख रूपाली शहा, मुख्याध्यापक मलकप्पा भरम शेट्टी यांनी कौतुक केले.



### मुंबई, पुणे, रोहा व नाशिकच्या भाविकांना राख्या

कल्याणशेट्टी महाविद्यालयातील प्राध्यापिकांकडून स्वामी समर्थ समाधी मठ परिसरात दर्शनासाठी आलेल्या मुंबई, पुणे, रोहा व नाशिक येथील भाविकांनी आवर्जून प्राध्यापिकांकडून राख्या बांधून घेतल्या. त्यावेळी त्यांच्या चेहऱ्यावर कृतार्थतेचे भाव दिसत होते.

### भाविकांनी केले प्राध्यापिकांचे कौतुक

उच्चशिक्षित प्राध्यापिका राखी बांधण्यासाठी आवर्जून आल्या हे पाहून उपस्थित भाविकांनी कल्याणशेट्टी महाविद्यालयातील प्राध्यापिकांचे कौतुक केले. आम्हाला राखी पौर्णिमेनिमित्त बहिणी मिळाल्या अशा भावना एका भाविकांने व्यक्त केल्या.

## महत्वाचे...



### मंद्रूपच्या तायक्कांदो ॲकॅडमीत रक्षाबंधन सण उत्साहात

**सोलापूर, दि. १० ऑगस्ट -**

बहीण भावाच्या अतूट नात्याची व प्रेमाची जपणूक करणारा सण म्हणजे रक्षाबंधन मंद्रूप येथील दक्षिण सोलापूर तायक्कांदो अकॅडमीच्या खेळाडूंनी साजरा केला. यावेळी मुलींनी आपल्या हाताने फुले, लोकर, रेशमी धागे, कापूस, रंगीत तांदूळ, मनी अशा गृहपयोगी वस्तूंचा वापर करून बनवलेल्या राख्या ॲकॅडमीमधील खेळाडू भावांना लाडूने तोंड गोड करुन मनगटावर राखी बांधल्या. तेव्हा भावांनी ही आपल्या बहिणींसाठी चॉकलेट्स, पेन्सिल, पेन, वही अशा वेगवेगळ्या भेट वस्तू देऊन भावाचे कर्तव्य बजावण्याची परंपरा जोपासली. या उपक्रमामुळे मुलींच्या चेहर्यांवर एक वेगळाच आनंद दिसत होता. हा उपक्रम राबविण्यासाठी दक्षिण सोलापूर तायक्कांदो अकॅडमी मुख्य प्रशिक्षक शिवराज मुगळे, राष्ट्रीय खेळाडू सुमित पवार, मयुरेश भागवत यांनी परिश्रम घेतले.



### बार्शी शहर पोलीस ठाण्यात रक्षाबंधन; बंधुभावाचा अनोखा संदेश

**बार्शी, दि.१० ऑगस्ट-**

बार्शी शहर पोलीस ठाण्यात योगवेदांत सेवा समिती महिला मंडळ यांच्यावतीने पारंपरिक स्नेहबंधनाचा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. रक्षा बंधनाच्यानिमित्ताने महिला मंडळाच्या सदस्यांनी पोलीस बांधवांच्या मनगटावर प्रेम, विश्वास आणि आपुलकीचे प्रतीक असलेली राखी बांधून बंधुभावाचा संदेश दिला. कर्तव्याच्या कठीण परिस्थितीतही नागरिकांच्या सुरक्षेसाठी सतत तत्पर असलेल्या पोलीस बांधवांना बहिणींनी सदैव निरोगी, सुरक्षित राहण्याच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी पोलिसांनीही बहिणींना सुरक्षिततेचे आश्वासन देत सणाचा आनंद साजरा केला. संपूर्ण कार्यक्रमात स्नेह, आपुलकी आणि परस्पर आदराचा सुगंध दरवळत होता.

### शिक्षक बदली प्रक्रियेमुळे शिक्षकांमध्ये अस्वस्थता; गुणवत्तेवर परिणाम

**पिलीव, दि. १० ऑगस्ट-**

शिक्षक बदल्यासंदर्भातील ठोस धोरण नसल्यामुळे सध्या शिक्षकांमध्ये प्रचंड अस्वस्थता आहे. यामध्ये अन्यायकारक शिक्षक संच मान्यता, न्यायालयीन प्रक्रिया व इतर किचकट प्रक्रियेमुळे शिक्षक बदल्या संदर्भात सध्या मोठे संभ्रमाचे वातावरण आहे. मार्च महीन्यापासुन शिक्षक बदली प्रक्रिया तसेच शासनाचे किचकट संच मान्यता धोरण यामुळेच शिक्षक चांगलेच मानसिक दबावाखाली शाळेत काम करीत आहेत. गेल्या सहा महीन्यापासुन आपली बदली होणार की नाही असा संभ्रम शिक्षकांमध्ये आहे. संच मान्यता नवीन धोरणानुसार होणार की जुन्या याबाबत ही शिक्षकात प्रचंड संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. याचा परिणाम विद्यार्थी पटसंख्या व गुणवत्तेवर झाला आहे. शासनाने अन्यायकारक नवीन संच मान्यता रद्द करावी अशी भुमीका शिक्षक संघटनाची आहे. ऑनलाईन बदली पोर्टल प्रक्रियेबाबत शिक्षक समाधानी आहेत पण काय होणार कस होणार हे प्रश्न मात्र अदयापही अनुत्तरीतच आहेत.बदली पोर्टलवर शाळा भरताना शिक्षकांना अनेक अडचणी येत आहेत, बदली पोर्टल व्यवस्थीत चालतच नाही यामुळे शिक्षक अक्षरशः रात्र जागुन काढीत आहेत पण पोर्टल काही केल्या चालतच नाही. यामुळे शिक्षकांमध्ये सध्या प्रचंड नाराजीचा सुर पाहवयास मिळत आहे. एकंदरीत सध्या तरी बदली प्रक्रिया व संच मान्यता धोरण याबाबत मोठे संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असुन शासनाने याबाबत ठोस निर्णय घेणे आवश्यक आहे. संवर्ग चार मधील शिक्षकांना बदली पोर्टल भरताना अडचणी येत आहेत यामुळे तातडीने किमान दोन दिवसाची मुदतवाढ देण्यात यावी व अन्यायकारक शिक्षक संच मान्यता ताबडतोब रद्द करावी अशी मागणी तालुका प्राथमिक शिक्षक पतसंस्थेचे संचालक सचिन गाटे यांनी केली आहे.

### होळकर संस्थान व्यवस्थापकपदी फत्तेपूरकर

**पंढरपूर, दि. १० ऑगस्ट-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर खाजगी संस्थान यांच्याकडून पंढरपूरच्या आदित्य फत्तेपूरकर यांची चौंडी - होल मुरूम, वाफगाव, गोकर्ण आणि पंढरपूर येथील होळकर यांच्या खाजगी मालमत्तांच्या व्यवस्थापकपदी नुकतीच इंदोर येथून नियुक्ती करण्यात आली आहे. पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांनी संपूर्ण देशभरामध्ये खास करून तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी यात्रेकरूंना राहण्यासाठी आणि तीर्थक्षेत्रे असणाऱ्या देवी देवतांचा सेवेसाठी मठ, मंदिरे, वाडे यांची उभारणी केली. यातच अहिल्यादेवी होळकर यांचे जन्मस्थान असणाऱ्या चौंडी या ठिकाणी होळकर संस्थानाचा मोठा वाडा आहे. तसेच होळकरांचे मूळस्थान असणाऱ्या होल मुरूम व वाफगाव या ठिकाणच्या वाड्यांची देखभाल दुरुस्ती आणि संगोपनाची जबाबदारी आता आदित्य फत्तेपूरकर यांच्यावर सोपवण्यात आली आहे. पंढरपुरातही पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी मोठा टोलेजंग वाडा वारकरी भक्तांसाठी उभा केला. या वाड्याची जबाबदारी ही सद्यस्थितीत फत्तेपूरकर यांच्याकडे होती. यामध्येच आता चौंडी, होल मुरूम व वाफगाव अशा तीन संस्थानासह कर्नाटकातील गोकर्ण महाबळेश्वर या तीर्थक्षेत्र असणाऱ्या होळकर वाड्याची जबाबदारी देखील फत्तेपुरकर यांच्यावर इंदोर येथील खाजगी देवी आहिल्याबाई होळकर चारिटी ट्रस्टने सोपवली आहे. आदित्य फत्तेपूरकर यांचे या निवडीबद्दल इतिहास प्रेमी, तसेच धनगर समाज, आणि सामाजिक संघटनातील कार्यकर्त्यांकडून अभिनंदन होत आहे.



# प्रभूरामचंद्र यांच्या पदस्पर्शाने पावन झालेले 'उत्पतीनगर'

**श्रावण विशेष**

**तभा वृत्तसेवा । रामदास पवार**
**वैराग, दि. १० ऑगस्ट-**

श्री प्रभूरामचंद्र यांच्या पदस्पर्शाने पावन झालेले व उपलव्य ऋषीच्या वास्तव्यावरून 'उत्पतीनगर' म्हणून नावारूपास आलेले गाव सध्या उपळे (दुमाला) नावाने ओळखले जाते. बार्शी तालुक्यातील पौराणीक, धार्मिक वारसा लाभलेले हे गाव श्रावणात भक्तांसाठी पर्वणीच असते.

या गावाला फार मोठा पौराणिक इतिहास आहे. भोगावती नदीच्या काठावर चिरेबंदी भला मोठा दगडी घाट, घाटाच्या पायऱ्या व भोगावती नदीचे खळ खळ वाहणारे पाणी, सर्वत्र प्रसन्न असणारे वातावरणामूळे मन अगदी आनंदी होते. या घाटालगत श्री रामेश्वराचे संपूर्ण दगडाचे हेमाडपंथी मंदीर आहे. सुर्योदयाचा वेळी सूर्याची पिवळसर किरणे मंदिरातील पिंडीवर पडतात. मंदिराच्या सभोवतालचा परिसर हिरव्या गर्द चिंचेच्या झाडांनी व्यापला आहे. मंदिराच्या दक्षिणेस ८० ते ९० वर्षापूर्वी अल्लू बुआ नावाचा गोसावी रहात होता. त्याच अल्लू बुआची समाधी सध्या सभामंडपाच्या डाव्या बाजूस आहे. रामेश्वर मंदिराच्या पुढे सकळेश्वराचे हेमाडपंथी मंदिर आहे, या मंदिराचा गाभा खोल व आकर्षक गोल दगडाचे कोरीव काम केलेले पहायला मिळते.रामेश्वर मंदीराच्या अगदी समोर भूई देऊळ आहे. याचे वैशिष्टये म्हणजे ते भूयारात असून नक्षीदार दगडी गाभारा आहे. हा गाभारा, कुणालाही दिसू शकत नाही, कारण तिथे गर्द अंधार आहे. गाभाऱ्यात पाच पिंडी आहेत.



या भूई देवळाच्या गाभा-यात सोडलेले लिंबू किंवा नारळ भोगावती नदीपात्रात येतो, याचे रहस्य अद्याप कोणास ठाऊक नाही.नदीपात्रातील पाणी कमी -जास्त झाले की देवळातीलही पाणी कमी-जास्त होते. भोगावती रात्री १२ वाजता स्त्री रूपाने येऊन भगवंत रामेश्वराची पूजा करते याची सत्यता भाविकांनी घेतली असता त्यांना रामेश्वराच्या पिंडीवर ताजी फुले, अक्षता, गंध पहायला मिळाला अशी दंतकथा आहे. तसेच हा दंडकारण्याचा भाग असल्याने श्री प्रभू रामचंद्र वनवासात असताना त्यांनी राजा दशरथाचे श्राद्ध येथे घातले असे पुराणात आढळते. त्या प्रसंगी ऋषीमुनींच्या पंगती जेवताना त्यांना पिण्यासाठी पाणी प्रभू रामचंद्रानी जमिनीत बाण मारून उपलब्ध केले अशी अख्यायिका आहे. या गावात अनेक जुनी हेमाडपंथी व नविन मंदीरे आहेत. यामध्ये प्रामुख्याने महादेवाचे मंदिर असून गाभाऱ्यात महादेवाची पिंड आहे. दरवर्षी चैत्र शुद्ध एकादशीला महादेवाची मोठी यात्रा असते. गावच्या दक्षिण पूर्व भागात महाद बुआचे मदिर आहे. या मंदिरासमोर हेमाडपंथी दगडाचे अंबाबाई देवीचे मंदिर आहे.रामेश्वर मंदिराच्या पाठीमागे उपळेश्वराचे मंदिर, नदीकाठी दक्षिणमुखी हनुमान मंदीर, वखारिया विदयालयाच्या प्रांगणात दत्ताचे मंदीर, निसर्गरम्य वातावरणात हिंगणी तळ्याकाठी गणपतीचे मंदीर, राममंदीर, सकळेश्वर मंदीर अशी अन्य मंदीरे असल्याने जणू हे गाव मंदीराचे गाव आहे असे वाटते. येथील लोक पूर्वी रामेश्वर, काशीला जात असत. सध्या श्रावण महिन्यात दर सोमवारी रामेश्वराचे दर्शनासाठी भाविक मोठया संख्येने येतात.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



दैनिक तरुण भारतच्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा देताना संपदा जोशी, अर्चना कांबळे, अनिता कुलकर्णी.



## महत्त्वाचे



### स्वामी समर्थ रुग्णालयातील होमिओपॅथिक शिबिराचा ३२१ दिव्यांगांनी घेतला लाभ

**अक्कलकोट, दि. १० ऑगस्ट-**

मैंदर्गी-गाणगापूर रोडवरील श्री. स्वामी समर्थ रुग्णालयात २० वर्षांखालील दिव्यांग रुग्ण मुलांसाठी आयोजित करण्यात आलेले होमिओपॅथिक शिबिर संपन्न झाले. शिबीराचा शुभारंभ मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते डॉ.प्रफुल्ल विजयकर, डॉ. अपर्णा सामल व वैद्यकीय पथकांच्या उपस्थितीत करण्यात आला. या होमिओपॅथिक शिबिरात डॉ. प्रफुल्ल विजयकर व वैद्यकीय पथकाच्या वतीने २० वर्षांखालील दिव्यांग मुलांची शारिरीक, मानसिक, बौद्धीक तपासणी करून मोफत औषधोपचार देण्यात आले. ३२१ दिव्यांग मुलांनी या मोफत शिबिराचा लाभ घेतला. याकामी डॉ. प्रफुल्ल विजयकर, डॉ. अपर्णा सामल, डॉ. प्रदीप विजयकर, डॉ. तन्मय विजयकर, डॉ. निशांत गांधी, डॉ.विनय मिश्रा, डॉ.श्वेताली बाळेकर, रवी मलवे, श्रीकांत मलवे, भीमा मिनगले आदींनी परिश्रम घेतले. प्रारंभी प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते श्री स्वामी समर्थांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून या आरोग्य शिबिराची सुरुवात करण्यात आली. यावेळी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीकांत मलवे, मनोज काटगांव, रवी मलवे, सुनील नायकोडी, श्रीशैल गवंडी, संजय पाठक, दर्शन घाटगे, आदीत्य गवंडी, धनराज स्वामी उपस्थित होते.





### आदर्श सैनिक स्कूलची दिल्लीच्या संस्थेकडून तपासणी

**कुर्डूवाडी, दि.१० ऑगस्ट-**

येथील आदर्श सैनिक स्कूलची शाळेतील शैक्षणिक, प्रशासकीय व लष्करी प्रशिक्षण व्यवस्थेची दिल्लीच्या सैनिक स्कूल्स सोसायटीकडून अधिकृत तपासणी करण्यात आली. या तपासणीचे नेतृत्व कॉमोडोर राजेश शर्मा यांनी केले. त्यांच्यासोबत कॅप्टन के. श्रीनिवासन उपस्थित होते. यावेळी त्यांनी वर्गखोल्या, प्रयोगशाळा, वसतिगृह, मेस, क्रीडांगण, अडथळा प्रशिक्षण क्षेत्र व ग्रंथालय यांचा सविस्तर आढावा घेतला. शाळेतील शिस्त, पायाभूत सुविधा, अध्यापन पद्धती आणि कॅडेट्सची दिनचर्या यांचा त्यांनी बारकाईने अभ्यास केला. नव्याने बांधलेले छत्रपती शिवाजी महाराज मुलांचे वसतिगृह यांचे उद्घाटन यावेळी त्यांच्या हस्ते झाले. तपासणी समितीने कॅडेट्स, शिक्षक आणि पालकांशी संवाद साधला, त्यांच्याशी थेट चर्चा केली आणि शाळेच्या कार्यप्रणालीबद्दल कौतुक व्यक्त करत अमूल्य मार्गदर्शन दिले.

### पंढरपूर-पुणे-वल्लभनगर मार्गावर नवीन बस सोडाव्यात; ग्राहक पंचायतीची मागणी

**पंढरपूर, दि.१० ऑगस्ट-**

पंढरपूर-पुणे-वल्लभनगर या मार्गावर नविन लालपरी व ई-बससेवा सुरू करावी अशी मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने एसटीचे विभाग नियंत्रक व आगार प्रमुख यांच्याकडे केली असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली. पंढरपूर आगाराकडे नविन लालपरी दहा, तसेच ईलेक्ट्रिक सहा बस धावताना दिसत आहेत. तथापि पंढरपूर-पुणे या गर्दीच्या मार्गावर एकही नविन लालपरी अथवा ईलेक्ट्रिक बस सुरू केलेली नाही. अद्यापही या मार्गावर जुन्याच बस धावत आहेत. या मार्गावर पंढरपूरहून निगडीपर्यंत जाणाऱ्या पहाटे व सायंकाळी सुमारे पंधरा ट्रॅव्हल्स चालू आहेत. मात्र एसटी महामंडळाने दिवसभरात महामंडळाकडे इलेक्ट्रिक बस येऊनही या मार्गावर बस दिलेली नाही. प्रवाशांना चांगली सेवा मिळण्यासाठी पंढरपूर टेंभुर्णी इंदापूर मार्गे पुणे -वल्लभनगर पर्यंत इलेक्ट्रिक बस व लालपरी तसेच पंढरपूर फलटण पुणे मार्गावर लालपरी बससेवा सुरू करतील, अशी अपेक्षा ग्राहक पंचायतीचे प्रांत सहसचिव दीपक इरकल, सदस्य विनोद भरते, जिल्हा सचिव सुहास निकते, पालक सुभाष सरदेशमुख, जिल्हा उपाध्यक्ष विनय उपाध्ये,सदस्य अण्णा ऐतवाडकर,तालुका उपाध्यक्ष नंदकुमार देशपांडे, सदस्य सागर शिंदे यांनी व्यक्त केली आहे.





### विकास देशपांडे बेस्ट प्रेसिडेंट गोल्डन अवॉर्डने सन्मानित

**सांगोला, दि. १० ऑगस्ट-**

रोटरी क्लबचे अध्यक्ष विकास देशपांडे यांना रोटरी वर्ष २०२४-२५ मधील बेस्ट प्रेसिडेंट गोल्डन अवॉर्डने प्रांत पातळीवरील विजयोत्सव या बक्षीस वितरण कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले. सोहळ्यामध्ये डॉ. सुरेश साबू, निर्मला साबू, डिस्ट्रिक्ट गव्हर्नर सुधीर लातूरे, डी.जी.इ.जयेश पटेल, डी.जी. न. क्षितिज झावरे उपस्थित होते. विकास देशपांडे यांच्या उपस्थितीत गौरव करण्यात आला. सचिव विलास बिले व सर्व सदस्य यांची साथ मिळाली.

## विठ्ठल मंदिरात हिंदी भाषेत पूजा

- भाविक राहुल सातपुते यांची तक्रार
- व्हायरल तक्रारीबाबत मंदिर समितीचा खुलासा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१० ऑगस्ट -**

येथील विठ्ठल मंदिरात ९ ऑगस्ट रोजी मंदिर समितीच्या गुरुजींनी तुळशी पुजा हिंदी सांगितल्याची तक्रार राहुल सातपुते यांनी मंदिर समितीकडे केली आहे. दरम्यान सातपुते यांनी या बाबत सोशल मिडीयावर देखील घडलेल्या प्रकाराची सविस्तर माहिती देवून हिंदी मध्ये पूजेबाबत आक्षेप घेतला आहे. दरम्यान रविवारी (ता.१०) सातपुते यांच्या तक्रारी संदर्भात



येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी हिंदी भाषेत पूजा केल्याच्या व्हायरल झालेली तक्रार व प्रसार माध्यमांत येत असलेल्या बातम्यां बाबत खुलासा देखील केलेला आहे.

या संदर्भात माहिती देताना कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले की, श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीच्या वतीने भाविकांना श्रींच्या विविध प्रकारच्या पूजा उपलब्ध करून देण्यात येतात. त्यामध्ये श्रींच्या तुळशीपूजेचा समावेश आहे. पूजा बुकींगसाठी संगणक प्रणाली विकसित करण्यात आली असून, ही पूजा देशभरातील भाविक घरबसल्या बुकींग करून पुजेसाठी येत असतात. या भाविकांना पूजेची माहिती व्हावी व पुजेच्या अनुषंगाने सुचना देण्यासाठी प्राधान्याने मराठी व आवश्यक भासल्यास हिंदी भाषेतूनही माहिती / सुचना देण्यात येतात. मात्र, पूजेचे मंत्र हे मराठी व संस्कृत भाषेतून पठण करण्यात येते. यामध्ये पूजा करण्यासाठी इतर कोणत्याही भाषेचा वापर करण्यात येत नाही.

सदरच्या तुळशी पुजेवेळी श्री संत तुकाराम भवन येथे आचमन करून व संकल्प करण्यात येतो. त्यानंतर श्री गणपतीचे स्मरण, श्री विठ्ठल रूक्मिणी मातेचे स्मरण व विष्णूसस्त्रनाम पठण करून पुजा करण्यात येते. यासाठी मराठी व संस्कृत भाषेचा वापर करण्यात येतो. तथापि, पूजेसंबंधी माहिती सर्व भाविकांना व्हावी या उद्देशाने प्राधान्याने मराठी व आवश्यकता भासल्यास हिंदी व इतर भाषेतून माहिती देण्यात येते. राहूल सातपुते या भाविकांने केलेल्या तक्रारीची गंभीर दखल घेण्यात आली असून, संबंधितांना आवश्यक त्या सुचना देण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.



### निर्धार फाउंडेशनचे राकेश दड्डणावर यांची आपुलकीच्या कार्यालयास भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १० ऑगस्ट-**

स्वच्छता त्याचबरोबर इतर सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या निर्धार फौंडेशन, सांगली या संस्थेचे संस्थापक राकेश दड्डणावर यांनी सांगोल्यातील आपुलकी प्रतिष्ठानच्या कार्यालयास भेट दिली.

आपल्या कार्यास पांडुरंग आणखी बळ देवो असे मनोगत राकेश दड्डणावर यांनी यावेळी व्यक्त केले. आपुलकी प्रतिष्ठानच्या वतीने राकेश दड्डणावर यांचा सन्मान करण्यात आला. अध्यक्ष राजेंद्र यादव यांनी आपुलकीच्या कार्याविषयी माहिती दिली. यावेळी सदस्य दीपक बंदरे, सुरेश चौगुले, अरविंद डोंबे, प्रसन्न कदम, दादा खडतरे, शिवदास राऊत उपस्थित होते.



### रक्षाबंधनातून घडले राष्ट्रीय एकात्मतेचा दर्शन आणि जाती सलोख्याचे दर्शन

**तभा वृत्तसेवा**
**माळीनगर, दि.१० ऑगस्ट-**

रक्षाबंधन हा सण फक्त भावाबहिणीच्या नात्याचा उत्सव नसून तो संरक्षण,आपुलकी आणि नातेसंबंधातील बंध दृढ करण्याचा दिवस असतो. याच भावनेतून सामाजिक कार्यकर्त्या व पत्रकार नूरजहाँ शेख यांनी तांबवे गावात सुट्टीसाठी आलेल्या भारतीय सैन्यातील जवान विकास हनुमंत जगदाळे यांना राखी बांधून बंधुत्वाचा आणि राष्ट्रीय एकतेचा अनोखा संदेश दिला.

याप्रसंगी नूरजहाँ शेख म्हणाल्या, आपल्या सीमांवर दिवस-रात्र जागून देशाचे रक्षण करणारे जवान हे आपले खरे आपले बंधू आहेत.त्याग,शौर्य आणि सेवाभावामुळेच आपण आज सुरक्षित आहोत.धर्म किंवा जातीपेक्षा मानवी मूल्यं आणि देशभक्ती हीच खरी ओळख आहे. जवान विकास जगदाळे यांनी सांगितले की, जनतेचे हे प्रेम आणि विश्वासच हिच आमची खरी ताकद आहे.अशा प्रेमळ भावनेमुळे देशसेवेसाठी प्रेरणा अधिक दृढ होते. स्थानिक ग्रामस्थांनीही या उपक्रमाचे स्वागत करत याला धार्मिक सलोखा,सामाजिक ऐक्य आणि देशभक्तीचे प्रेरणादायी

### बस आणि दुचाकीचा अपघात; युवकाचा मृत्यू

**बार्शी, दि ऑगस्ट**

कुर्दुवाडी रोडवर २ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास स्कूल बस व दुचाकी यांच्यात झालेल्या अपघातात २० वर्षीय युवकाचा मृत्यू झाला. या अपघातप्रकरणी स्कूल बस चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

इब्राहीम अशफाक शेख (रा. बालाजी कॉलनी, सोलापूर रोड, बार्शी) असे मृत युवकाचे नाव आहे. इब्राहीम हा आपली मोटारसायकल घेवून कुर्डुवाडी रोडवरुन बार्शीकडे येत



होता. खांडवीकडे जाणाऱ्या एका स्कूल बसने इब्राहीमला समोरुन जोरदार धडक दिली. यात तो गंभीर जखमी झाला. अपघातानंतर बसचा चालक ज्योतीराम तानाजी कानगुडे (रा. भोईंजे, ता. बार्शी) याने इब्राहीमला जखमी रुग्णालयामध्ये नेले. मात्र, डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

या घटनेनंतर इब्राहीमचा भाऊ अहमद अशफाक शेख यांनी बार्शी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. बसचालक ज्योतीराम कानगुडे याने निष्काळजी पणे वाहन चालविल्याने हा अपघात झाला, असा आरोप त्यांनी केला आहे. पोलीस या घटनेचा तपास करत आहेत.

## क्रांतीसूर्य केसरी हे राज्यातील पहिले कुस्ती मैदान

### वैराग यात्रेतील कुस्ती मैदानाचे पालकमंत्री गोरे यांच्या हस्ते उद्घाटन

- महाराष्ट्र केसरी पैलवानांस दोन लाखाचे बक्षिस

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग दि १० ऑगस्ट-**



कुस्तीपटूंसाठी वैरागचे क्रांतीसूर्य केसरी मैदान पावसाळ्यातील वॉटरप्रुफ असणारे राज्यातील पहिले भव्य कुस्ती मैदान आहे. बार्शीच्या बाबतीत देवाभाऊचं कायम प्रेम आहे. फक्त डीपीडीसीच्या माध्यमातून नव्हे तर ग्रामविकास खात्याच्या माध्यमातून बार्शीला विकास निधी देण्याचे आश्वासन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

श्री संतनाथ महाराज यात्रेनिमित्त शारदादेवी प्रशाला येथे शनिवारी ९ ऑगस्ट रोजी क्रांतीसूर्य केसरी कुस्त्यांच्या आखाड्यात उद्घाटनाप्रसंगी त्यांनी बोलताना व्यक्त केले. महाराष्ट्र केसरी पैलवान पृथ्वीराज मोहोळ व माजी महाराष्ट्र केसरी पैलवान पृथ्वीराज पाटील यांना विभागून दोन-दोन लाखांचे बक्षिस देवून मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

सध्याचं राजकारण हे वेगळ्या पद्धतीने चाललं आहे. नानांच्या व डॉक्टर साहेबांच्या काळातील राजकारणी व तेव्हाचे राजकारण याविषयी सांगून निंबाळकर व पाटील घराण्याचा जवळचा संबंध असल्याचा दाखला देत त्यांनी या भागातील प्रश्नासाठी मी बार्शीला संपर्क ठेवणार असे आश्वासन तुळजापूरचे आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी दिले. संतोष निंबाळकर म्हणाले, संतनाथ यात्रेनिमित्त ६१ वर्ष झाले कुस्ती फड चालवण्याची परंपरा चालु ठेवली आहे. क्रांतीसूर्य कुस्ती आखाड्याच्या माध्यमातून महाराष्ट्रातील अनेक ठिकाणाहून पैलवान येथे हजेरी लावतात. त्यामुळे लाल मातीचा मान राखण्याचे काम आम्ही करत आहोत. क्रांतिसूर्य केसरी कुस्ती मैदानाचे उद्घाटन पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी आमदार राजेंद्र राऊत, आमदार राणा जगजितसिंह पाटील, आमदार देवेंद्र कोठे, माजी जिल्हा परिषद सदस्य संतोष निंबाळकर या मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी चेअरमन रणवीर राऊत, नगरसेवक शाहूराजे निंबाळकर, बाबासाहेब रेड्डी, मोहन घोडके, रमेश पाटील, केशव घोगरे, विलास रेणके, अरुण कापसे, भाजपाचे धाराशिव जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी, नितीन काळे आदी मान्यवर उपस्थित होते. मेजर जगन्नाथ आदमाने ,नाना धायगुडे ,वैजिनाथ आदमाने, महेश पन्हाळे, ज्ञानेश्वर माने, जिन्नस उमाप, अजित मुळे, महेश गुंजाळ, भाऊसो जाधव यांनी यावेळी परिश्रम घेतले .कुस्ती सामन्यांचे समालोचन धनाजी मदने यांनी केले. तर पंच म्हणून गणेश वाघमोडे, मारुती डोईफोडे, जुनेद शेख, संदीप गुंजाळ, ज्ञानेश्वर माने, बापू करंडे , छगन बचुटे, बिभीषण माने, नागनाथ नवले, मारुती पवार, भाऊ माने यांनी काम पाहिले.

## जिल्ह्यात २ लाख ५९ हजार शेतकऱ्यांनी भरला पीकविमा

- हप्ता वाढल्याने अनेकांचे दुर्लक्ष
- पीकविमा भरण्याची १४ ऑगस्टपर्यंत मुदत

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

खरीप हंगामासाठी यंदा नवीन पीकविमा योजना सुरू झाली आहे. शेतकऱ्यांनी या योजनेत सहभागी होऊन आपल्या पिकांचे संरक्षण करावे, असे आवाहन शासनाकडून वारंवार करण्यात येत आहे. मात्र यंदा १ रूपयात पीकविमा उतरता येत नसल्याने जिल्ह्यातील अवघ्या २ लाख ५९ हजार शेतकऱ्यांनी पीकविमा भरला आहे. शेतकऱ्यांसाठी पीकविमा योजनेत सहभागी होण्याची अंतिम मुदत १४ ऑगस्ट असून, त्यामुळे उर्वरित शेतकऱ्यांनी आपल्या पिकांचा लवकरात लवकर पीकविमा भरावा, असे आवाहन जिल्हा कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

या योजनेत, नैसर्गिक आपत्ती, कीड आणि रोगराईमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक मदत दिली जाते. शेतकरी ऑफलाइन किंवा ऑनलाइन पद्धतीने या योजनेत अर्ज करू शकतात. अधिक माहितीसाठी, तुम्ही कृषी विभागाच्या वेबसाइटला भेट देऊ शकता किंवा तुमच्या जवळच्या कृषी कार्यालयात संपर्क साधू शकता. पिकविमा योजना शेतकऱ्यांसाठी खूप फायद्याची आहे. त्यामुळे, जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेत सहभागी होऊन आपल्या पिकांचे संरक्षण करावे, असे आवाहन शासनाकडून करण्यात येत आहे. महाराष्ट्र सरकारनं शेतकऱ्यांसाठी आणलेली सर्वसमावेशक म्हणजेच १ रुपयात पीकविमा योजना बंद केली आहे. दोन वर्ष सुरू ठेवल्यानंतर सरकारकडून ही योजना बंद करण्याचा निर्णय घेण्यात आलाय. महाराष्ट्रात २०१६ च्या खरिप हंगामापासून 'प्रधानमंत्री पीक विमा योजना' राबवण्यात येते. १ रुपयात पीक विमा योजनेत अनेक घोटाळे पाहायला मिळाले. १ रुपयात पीक विमा योजना सुरू केल्यानंतर लाखो बोगस अर्ज देखील पाहायला मिळाले. हजारो कोटी रुपयांचा अपव्यय होतो आहे. त्यामुळे गरजू शेतकरी वंचित राहतील अशी अवस्था येऊ नये हा विचार करुन सुधारित पद्धतीनं ही योजना लागू केली आहे.

२०२४ च्या खरिप-रबी हंगामात पीक विमा योजनेसाठी ५ लाख ८२ हजारांहून अधिक बोगस अर्ज दाखल झाले. या अर्जांद्वारे, खोट्या व बनावट कागदपत्रांद्वारे सरकारी, गायरान, मंदिर-मशिदींच्या जमिनी आणि पडीक जमिनींवर शेती केल्याचं दाखवून विमा उतरवण्यात आला. आता १ रुपयाऐवजी शेतकऱ्यांना पूर्वीप्रमाणे खरिप हंगामासाठी विमा संरक्षित रकमेच्या २ %, रबी हंगामासाठी १.५% आणि दोन्ही हंगामातील नगदी पिकांसाठी विमा संरक्षित रकमेच्या ५ % एवढा हप्ता भरावा लागणार आहे. उदाहरणार्थ, समजा तुम्हाला खरिप हंगामात १ हेक्टर क्षेत्रावरील सोयाबीन पिकाचा विमा उतरवायचा आहे आणि सोयाबीनला हेक्टरी विमा संरक्षण ३५,००० रुपये आहे. तर ३५,००० रुपयांच्या २ % म्हणजे प्रती हेक्टर ७०० रुपये शेतकऱ्याला द्यावे लागणार आहेत.

### 'या' बाबींसाठी मिळणार भरपाई

सुधारित पीक विमा योजनेसाठी जोखमीच्या बाबी निश्चित करण्यात आल्या आहेत. या बाबींमुळे उत्पादनात घट झाल्यास योजनेचा लाभ दिला जाणार आहे. यामध्ये, पीक पेरणीपासून ते काढणीच्या कालावधीपर्यंत वीज कोसळणे, गारपीट, वादळ, चक्रीवादळ यामुळे लागलेली नैसर्गिक आग, पूर, क्षेत्र जलमय होणं, भूस्खलन, अतिवृष्टी, दुष्काळ, पावसातील खंड, कीड व रोग यामुळे उत्पादनात होणारी घट विचारात घेतली जाणार आहे.

### पीकविमा मिळतच नसल्याने अनेक शेतकऱ्यांनी मानसिकता खचली

अनेक शेतकऱ्यांना गेल्या काही वर्षांपासून पीकविमा भरूनही विम्याचा एक रुपयाही येत नाही. यामुळे आता विमा योजनेत पैसे भरण्याची शेतकऱ्यांची मानसिकता कमी होत आहे. मोबाईल ॲपवरून ई-पीक पाहणी केली आणि विमा कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी स्पॉट पाहणी करूनही आमच्या खात्यावर पैसेच येत नसतील तर शेतकरी विनाकारण पिकविम्याचे पैसे भरून का विमा उतरतील? असाही सवाल अनेक शेतकरी करू लागले आहेत.

### सोयाबीनला सर्वाधीक हप्ता रक्कम

केंद्र सरकार आणि महाराष्ट्र शासन यांच्या समवेत सुधारित पीक विमा योजना लागू करण्यात आली आहे. यामध्ये बाजरीसाठी हेक्टरी ७६ रूपये असून, याची संरक्षित रक्कम ३० हजार ५३८ इतकी आहे. मुग ७० रू.-२८,००० रू., ख. ज्वारी ७०-२८,१७५ भुईमूग, ९५-३८,०९८, कापूस १२७-५१०००, उडीद ५००-२५०००, मका ५४०-३६०००, कांदा ६८०- ६८०००, तूर ७४४-३७२१८, तर सोयाबीन पिकाला सर्वाधीक १००० रूपये हप्ता असून, या पिकाची संरक्षित रक्कम ५० हजार रूपये आहे.

### तालुकानिहाय खालील शेतकऱ्यांनी भरला पीकविमा

जिल्ह्यातील १ लाख ९७ हजार ३५८.४९ हेक्टरवर २ लाख ५९ हजार ५७ शेतकऱ्यांनी पीकविमा भरला आहे. यामध्ये अक्कलकोट ५४ हजार ४५३ शेतकऱ्यांनी ४० हजार ४९४.१७ हेक्करसाठी पिकविमा भरला आहे. तर बार्शी ७७,२९२-६६५८२.२७, करमाळा २४२७५-१३२२८.३०, माढा २१५५९-१३१९१.६२, माळशिरस २९२३-१५७३.०६, मंगळवेढा २३४९०-१७२९८.०६, मोहोळ ७६३५-७११९.८३, पंढरपूर ७०३-४९२.२६, सांगोला १९७४४-१२३७०.७६, उत्तर सोलापूर १२६५३-१२२४५.८७ अशा एकूण जिल्ह्यातील १ लाख ९७ हजार ३५८.४९ हेक्टरवर २ लाख ५९ हजार ५७ शेतकऱ्यांनी पीकविमा भरला आहे.